

इ- दिवाळी विशेषांक

# स्पंदन

तिसरी आवृती २०२१

‘मुखपृष्ठ छायाचित्र
अनिता राठोड
मिसेस साऊथ आफ्रिका
जागतिक सुंदरी २०१९’

‘उपासाच्या निवडक पाककृती
लेखन पल्लवी कुलकर्णी आणि
संसारिका फूड्स’

‘स्वप्ननगरी कासची सफर
लेखिका वैशाली चाटे
यांच्यासोबत ‘

‘विशेष भयकथा कातरवेळ
सिद्धी चव्हाण’

शब्दांश

# अर्पणपत्रिका

दिव्यांची आरास म्हणजे दिवाळी,
मांगल्याचा प्रकाश म्हणजे दिवाळी,
धनधान्याची रास म्हणजे दिवाळी...

सर्वत्र उत्साह आणि भरभराटी घेऊन , शरद ऋतूच्या ऐन मध्यभागी, आश्विन व कार्तिक या महिन्यांच्या संधिकालात हा सण येतो.

याचे औचित्य साधून खास तुमच्यासाठी साहित्यरूपी मेजवानी घेऊन येत आहे आमचा दिवाळी अंक-**स्पंदन दिवाळी इ-अंक २०२१**, यंदाचे तिसरे वर्ष.

निवडक लेखकांच्या लेखणीतून उतरलेले उकृष्ट साहित्य आम्ही आपल्यासाठी घेऊन आलो आहे. मनाचा ठाव घेणाऱ्या कथा, वाचनाची गोडी वाढवणाऱ्या कविता, जिभेची रुची वाढवणाऱ्या पाककृती आहेतच, पण सोबत आहेत खास कलाविष्कार... कॅमेरातून टिपलेले अविस्मरणीय क्षण, हाताने रेखाटलेले उत्तम कलाकौशल्य, आणि बोटांवरून थेट पानांवर उमटलेले सुबक नक्षीकाम.

ह्रदयाची कंपने म्हणजेच स्पंदन. मनाच्या तारा झंकारतात आणि जीवनाला एक नवी उमेद देतात. अशाच अगणिक मनांच्या तारा जोडण्यासाठी दरवर्षी न चुकता आपल्या भेटीला येतो हा आमचा दिवाळी अंक.

दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील अंक आपल्या पसंतीस उतरेल अशी आशा आहे.

वाचुन आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवा.

★ ★ ★ ★ ★

## - स्पंदन दिवाळी इ-अंक २०२१

sevasahitya@gmail.com

शब्दांश प्रकाशन, संपादक मंडळ.

शब्दांश

# अनुक्रमणिका

## कथा


| कथा | |
|---|---|
| एक अनपेक्षित भेट - भूषण सहदेव तांबे | [2] |
| चला जाऊया भाजीबाजारात! - नागेश सू. शेवाळकर | [3] |
| गृहलक्ष्मी - धनश्री सचिन देसाई | [13] |
| 'कही कही से...'- जाई सरवणकर | [15] |
| पुन्हा भेटशील वाटल नव्हतं - मानसी मंगेश सावर्डेकर | [18] |
| सीमोल्लंघन - धनश्री सचिन देसाई | [38] |
| हृता – अस्मिता | [40] |
| प्यारवाली लव्हस्टोरी - अक्षय दुधाळ | [44] |
| होते कुरूप वेडे पिल्लू... - सीमंतिनी | [53] |
| कातरवेळ - सिद्धी चव्हाण | [55] |
| नमन - मेघना आंबेकर | [57] |


## कविता


| कविता | |
|---|---|
| प्रश्न... - आशिष निनगुरकर | [61] |
| बळीचे राज्य येऊ दे.. - रामकृष्ण पांडुरंग पाटील | [61] |
| तू म्हणजे... - सुनील दौलत खोडके | [62] |
| आरसा - माधवी मिलींद खडक्कार | [62] |
| परतीचा पाऊस- दत्ता वालेकर | [63] |
| माझी कविता...! - ज्योत्स्ना देवराम गवारी | [63] |
| डस्टबिन - अमोल पाटील | [64] |
| वार्धक्य - निशा सचिन भोसले | [64] |
| हे डोंगरकड्या - बिपीन सांगळे | [65] |
| तूर - शाम लाटकर | [66] |
| श्रावण - अदिती काळमेख | [66] |

| | |
|---|---|
| गझल-सांगा एक सुत्र - यतीन शशिकांत कुलकर्णी | [67] |


## ललितलेखन


| ललितलेखन | |
|---|---|
| एक पाऊल टाकू .....- आशिष निनगुरकर | [69] |
| कोरोंना आणि मुंबई - भूषण सहदेव तांबे | [72] |
| सह्याद्रीच्या माळरानाची स्वप्ननगरी -वैशाली चाटे | [77] |
| प्रामाणिकपणा - माधवी मिलींद खडक्कार | [80] |
| पंचम- तुषार शाम वैद्य | [81] |
| पोलिसदादा - लता अनिल बहाकर(तळोकार) | [82] |
| आठवणीतला दसरा - शिवानी मेहेत्रे | [84] |

| | |
|---|---|
| पाककला- साबुदाणा लाडू रेसिपी -संसारिका फूड्स | [86] |
| उपासाच्या शेवयांची खीर- पल्लवी कुलकर्णी | [87] |


## कलाकौशल्य [88-91]


| कलाकौशल्य [88-91] |
|---|
| शरयू नाईक - हस्तचित्र |
| स्नेहा ढगे- हस्तचित्र |
| प्रीती कुलकर्णी -हस्तचित्र |
| वैभव सारंग - छायाचित्र |
| अक्षय मलमकार -छायाचित्र |
| पार्थ चाटे- छायाचित्र |
| उज्वला म्हस्के - डुबे- छायाचित्र |
| वैशाली चाटे - मांडला आर्ट |
| श्वेता चिन्नपुरकर - मांडला आर्टस |
| शिवानी मेहेत्रे - रंगकाम |
| स्नेहल देशपांडे - रांगोळी |
| रश्मी देशपांडे – रांगोळी |
| ज्योती दिंडकर - मेहेंदी - रांगोळी |

| | |
|---|---|
| साहित्य अभिवाचन | [92] |


sevasahitya@gmail.com

शब्दांश प्रकाशन, संपादक मंडळ

# निवडक लेखकांच्या उत्कृष्ट कथा



*आली दिवाळी उजळला देव्हारा..*
*अंधारात या पणत्यांचा पहारा..*
*प्रेमाचा संदेश मनात रुजावा..*
*आनंदी आनंद दिवसागणिक वाढावा...*
*दिवाळीच्या शुभेच्छा!*

## एक अनपेक्षित भेट - भूषण सहदेव तांबे

सुमननगर शहरातील हा एक किस्सा... रमेश नावाचा इसम रेल्वे प्रवास करत होता ज्या गाडीत रमेश प्रवास करत होता, त्याच गाडीत एक गरीब मुलगा आत येतो आणि पैसे मागतो सर्वांकडे पण कोणीही त्याला मदत करत नाही मात्र रमेश पुढे जाऊन त्याच्याशी संवाद करतो, व त्याला काही पैसे देतो एवढेच नाही तर त्याला संध्याकाळी त्याच ठिकाणी भेटायला सांगतो. रमेश त्याला बूट पॉलिशचे काही साहित्य देतो व त्याला बूट पॉलिश चा व्यवसाय करण्यास सांगतो. भिक मागण्या पेक्षा स्वतःचा व्यवसाय करणे कदापिही खुप उत्तम असे रमेश त्याला सांगतो आणि त्या गरीब मुलालाहि ते मान्य होते. तो मुलगा दुसऱ्या दिवसां पासून भिक मागणे सोडतो आणि  बूट पॉलिश करतो या सोबतच तो शिक्षण पण घेत असतो. काही दिवसांनी हा मुलगा पुन्हा रमेशला भेटतो आणि पेंड्यांचा बॉक्स समोर करतो व अभिमाने सांगतो कि मी पास झालो. हि आनंदाची बातमी ऐकून रमेशलाही खुप आनंद होतो, त्याच्या त्या मदतीचे त्या क्षणी खरे सार्थक झाल्यासारखे वाटते. तो मुलगा रमेशला सांगतो कि मी दगडाच्या मूर्तीत देव नाही पहिला पण तो तुमच्या रूपात पहिला...!!! माझ्या जिवनाला दिलेले हे एक वळण मी कधीच विसरणार नाही. तुम्हाला खुप खुप धन्यवाद...!!!

तात्पर्य: देव दगडाच्या मूर्तीत नसून तो प्रत्येक माणसात आहे.

*****



## चला जाऊया भाजीबाजारात! - नागेश सू. शेवाळकर

नुकतीच दादासाहेबांची पूजा आटोपली होती. कथा वर्तमानपत्रं मधूनच भ्रमणध्वनी यांचा समाचार घेता घेता ते सकाळच्या नाष्ट्यावरही ताव मारत होते. त्यांच्याशेजारी बसलेली त्यांची पत्नी कमलाकडेही ते अधून-मधून कटाक्ष टाकत असताना बायकोने विचारले,

"अहो, मी काय म्हणते?"

"हां. बोला. काय म्हणतात राणीसरकार?" भ्रमणध्वनीशी चाळा करत तात्यांनी विचारले.

"थोड ते डबडं बाजूला ठेवून माझ्याशी बोलले तर ठीक होईल?"

"ठीक आहे. परंतु या समस्येवर एक छान विनोद आलाय, या डबड्यात! तो ऐक... 'मोबाइलवर खेळत असताना बायको नि चार्जर दोघंही जळतात. फरक एवढाच की, चार्जर रागारागाने डिस्चार्ज होते तर बायको संतापाने फुल्ल चार्ज होते.."

"पुरे झाला चावटपणा. मारोतीच्या दर्शनाला जाणारच आहात तर बँकेमध्ये जाऊन लवकर काम करून या."

"होय. जाणारच होतो. पूजा झाल्याबरोबर दागिन्यांची पिशवी..."

"अहो, हळू! दागिन्यांची पिशवी हे जर कुणी ऐकलं तर उगाच गैरसमज होईल आणि तात्यांकडे 'पिशवीभर दागिने' आहेत ही बातमी लगेच फेसबुकवर जाईल..."

"मला पर्स म्हणायचे होते पण पिशवी तोंडातून आले..."

"बरं-बरं! बाहेर जात आहातच तर भाज्याही घेऊन या संपत आल्यात."

"याचा अर्थ अजून संपल्या नाहीत. तुम्हा बायकांचे गणित ना पुरुषांच्या डोक्याबाहेरचे असते. डब्यात आठ दिवस पुरेल एवढे पीठ असतानाही 'दळण आणा'चा सारखा तगाजा सुरु असतो. चार दिवस पुरतील एवढ्या भाज्या फ्रीजमध्ये असतानाही.."

"आम्ही लकडा लावतो म्हणून कधी काही पडत नाही. उद्या भाजी किंवा पीठ संपणार अशी स्थिती आल्यावर तुम्हाला सांगितले तर आठवडाभराचे फाके पडतील."

"ठीक आहे. तुझेच खरे! भाज्या आणतो, नीट पाहून, निवडून, भाव करून आणतो. भाजीवालीबाईकडे साधा कटाक्षही टाकणार नाही. ह्या तुझ्या सूचना तोंडपाठ झाल्यात.."

"तोंडपाठ होऊन काय फायदा? वर्षानुवर्षे जडलेली सवय का जाणार आहे?"

"तुझा हा भाजीपाठ सुरु झालाय. तो ऐकत बसलो तर उशीर होईल. निघतो. मारोती दर्शन, लॉकर आणि शेवटी भाजीवालीबाई..." म्हणताना हसत-हसत तात्या बाहेर पडले. पाठोपाठ कमलाबाईचे मधाळ हसणेही त्यांच्या सोबत आले....

मारोतीचे दर्शन घेऊन तात्यासाहेब बँकत पोहचले. पावणे अकरा वाजत होते. दोन दिवसांच्या सुट्टीनंतर बँक उघडली होती. त्यामुळे बरीच गर्दी होती. तात्या सरळव्यवस्थापकांच्या दालनात गेले. त्यांना पाहताच व्यवस्थापक म्हणाले, " या. तात्यासाहेब, लॉकरचे काम आहे का? पंधरा-वीस मिनिटे थांबावे लागेल. दोन दिवस सुट्ट्या झाल्या आणि पुन्हा उद्यापासून तीन दिवसांच्या सुट्टया आहेत. आजची सुट्टी टाकून दोघांनी सहा दिवसांची 'टूर' काढली आहे. त्यामुळे प्लीज..."

"ठीक आहे. काही हरकत नाही. मी भाजी घेऊन येतो.." म्हणत तात्यासाहेब बँकतून निघाले....

काही क्षणात ते भाजीबाजारात पोहचले. नेहमीच्या दुकानाकडे जात असताना काही वेळेपूर्वी कमलाशी झालेला संवाद त्यांना आठवला आणि ते स्वतःशीच खुदकन हसले. एका वेगळ्याच स्फूर्तीने त्यांची पावले नेहमीच्या भाजीच्या... भाजीवालीच्या दुकानाची वाट चालू लागली. मात्र, काही क्षणातच त्यांचा सारा उत्साह मावळला. कारण दुकान नेहमीचेच असले तरी हसून स्वागत करणारी, तऱ्हेतऱ्हेच्या अदांनी गिऱ्हाईकाला घायाळ करणारी दुकानाची स्वामिनी दुकानात नव्हती तर कळकट चेहऱ्याचा, मळकट कपड्याचा तिचा स्वामी दुकानात होता. तात्यांना पाहताच तो पचकन पिक मारत म्हणाला, "या, काका, या. काय देऊ?" त्याच्या त्या आवाजाने आणि बोलता-बोलता मध्येच पिक मारण्याच्या कृतीमुळे तात्यांना शिसारी आली.

"काय झाले काका? उदास दिसताय? काकुंशी भांडण झाले?" त्याच्या त्या प्रश्नाला 'तसे नाही' असे हाताने खुणावणारे तात्या स्वगत म्हणाले, 'अरे, माझ्या नाराजीचे कारण माझी बायको नाही तर तुझी बायको आहे. जाऊ दे. तुला काय सांगू?' भाजी घेताना तात्यांनी त्याला विचारले,

"आज एकटेच?"

"हो ना. कारभारीन गेलीय गावाला. चार-पाच दिवस नाही."

"चार-पाच दिवस? मग खाण्याचे वांधे होतील ना?"

"नाही.तसे नाही. ती असली तरी दोनदाचा सैपाक मीच करतो."

"व्वा! छानच आहे.." म्हणत तात्यांनी दो-मनाने बटाटे, बटाटे, पालक, मेथी, कोथिंबीर, फुलकोबी इत्यादी भाज्या घेतल्या आणि ते निघाले..

तात्यासाहेब बँकेत पोहचले. गर्दी बरीच वाढली होती. ते सरळ व्यवस्थापकांकडे गेले. त्यांच्यासमोरही पाच-सहा माणसे बसलेलीच होती.

"तात्यासाहेब दोनच मिनिट हं. आत एक जण आहेत. ते बाहेर.." व्यवस्थापक बोलत असताना लॉकररुममधून एक महिला बाहेर आली. व्यवस्थापकांनी तात्यांची रजिस्टर स्वाक्षरी घेतली.

शिपायासोबत ते लॉकररुममध्ये प्रवेश करत असताना त्यांचा भ्रमणध्वनी वाजला. त्यावर 'होम' नाव पाहताच कपाळावरील आठ्यांचे जाळे घट्ट करून तात्यांनी तो सुरु केला.

"अहो, कुठे आहात? किती वेळ झाला जाऊन? एक फोन तर करावा. माणसाने कित्ती वाट पाहावी? काळजी वाटते.सोबत दागिने असल्यामुळे जास्तच चिंता वाटते हो.सारे ठीक आहे ना?...” कमला 'विनाथांबा' सुसाट सुटलेली पाहून तात्यासाहेब मध्येच म्हणाले,

"थ-थ- थांब. थोडा श्वास घे. नाही तर वरचा श्वास वर आणि खालचा खाली राहील. ऐक. मी बँकेत लॉकररुममध्ये आहे. घरी आल्यावर बोलू. ठीक?.." म्हणत तात्यांनी फोन केला. तसा मंद-मंद हसत शिपाई लॉकरला दोघांच्या चाव्या लावून बाहेर पडताच तात्यांनी लॉकर उघडले. आत ठेवायचे होते ते सारे त्यांनी आत ठेवले. लॉकर व्यवस्थित बंद केले. चार पाच वेळा लॉकर बंद झाल्याची खात्री करून ते लॉकररुमच्या बाहेर पडले. व्यस्थापकाकडे आणि बँकेत खुपच गर्दी झाली होती...

तात्या घरी पोहचले. त्यांची वाट पाहून कमलाबाईंनी जेवण आटोपले होते. त्या आराम करत असल्याचे पाहून तात्यांनी विचारले,

"झाले वाटते जेवण? मला येऊही दिले नाही?"

"तुमच्या येण्याचा काय भरवसा? बसता आपले जो भेटेल त्याच्याशी गप्पा मारत. मला सांगा, मारोतीचे मंदिर घरातून दिसेल एवढ्या अंतरावर, तिथून बँक दहा मिनिटांच्या अंतरावर! बँकेचे काम आटोपायला फार तर पंधरा मिनिटे, तिथून भाजी घेऊन यायला वीस मिनिटे! सारा फार तर एक तासाचा खेळ आणि तुम्हाला लागले तब्बल दोन तास! माणसाने किती वाट पाहावी? सकाळी उठल्यापासून दम नसतो, काम करून भूक लागते आणि वाट... "

"अग ..अग, थांब. सहज म्हणालो तर तू आपले..."

"मला काही बडबड करायची हौस नाही हो. स्वतःचे..."

"पुरे झाले ग! चावीच्या खेळण्याला चाबी द्यावी लागते. जितने चावी दी रामने, उतना चले खिलौना.."

"म्हणजे तुमच्या दृष्टीने मी खिलौना तर। व्वा ! काय किंमत केलीत हो माझी! तुमचे तरी काय चुकले म्हणा, जगातल्या एकूण एक पुरुषांसाठी स्त्री म्हणजे निव्वळ खेळणेच!"

"तु आराम कर. मी जेवतो..." म्हणत म्हणत स्वयंपाकघरात जाऊन तात्यांनी ताट वाढून

घेतले. सोफ्यावर बसून भ्रमणध्वनीवरील संदेश तोडी लावत त्यांनी जेवण केले...

सायंकाळ झाली. कमलाबाईनी देवाजवळ, तुळशीजवळ दिवा लावला. दिवाणखान्यात तात्यासाहेब टीव्हीगरील विविध वाहिन्यांच्या बातम्यांचा आस्वाद घेत असताना तिथे कमलाबाई आलेल्या पाहून तात्यांनी आवाज 'म्युट' केला

"का हो,आवाज का बंद केला?"

"सवयच झाली. तू आल्यावर टीव्हीचाच काय पण माझाही आवाज 'म्युट' होतो ग...आपोआप!"

"काही तरी खरे बोलावे माणसाने, कुणी ऐकले तर त्याला वाटेल, तात्या बायकोच्या धाकात आहेत..."

"खोटे आहे का ते? वर्षानुवर्षे तू बोलावे आणि मी पामराने ऐकावे हा एक कलमी कार्यक्रम चालू आहे."

"मोठे आले ऐकणारे. जाऊ देत. तुमच्या नादी लागले तर माझी कामे तशीच पडून राहतील. आठ वाजले न वाजले, की भूक भूक कराल. अरे, बाप रे! अहो, सकाळी भाज्या सांगितल्या होत्या. आणल्यात का? पालेभाज्या, कोथिंबीर निसून ठेवाव्या लागतात. आधीच नासक्या, कुजक्या भाज्या घेऊन येता. जास्तच सडतील.."

"आणल्यात! एक नंबर भाज्या आहेत. आज आणलेल्या भाज्यांचे कौतुक करायला तुला शब्द कमी पडतील."

"वा! बघू या तर काय दिवे लावलेत ते..." म्हणत-म्हणत कमलाबाईंनी आत जाऊन फ्रीज उघडले. पाहतात तर काय फ्रीजमध्ये नवीन एकही भाजी नव्हती.

"अहो, भाज्या आणल्यात ना? कुठे ठेवल्यात? इथे तर एकही भाजी दिसत नाही..." कमलाबाई बोलत असताना तात्यासाहेब लगबगीने स्वयंपाकघरात पोहचले. त्यांनी स्वतः फ्रीजमध्ये डोकावले.

"अरे, असे कसे झाले? मी तर भाज्या घेतल्या होत्या. हो नक्की घेतल्या होत्या..." म्हणत तात्या बाहेर आले. त्यांनी दिवाणखाना, शयनगृह सर्वत्र शोध घेतला. परंतु, त्यांना कुठेही भाजीची पिशवी दिसली नाही.

"अहो,खरेच भाज्या घेतल्या होत्या?"

"अग, होऽऽ! मला आठवते.. एकशे अठ्ठावन रुपये दिले.."

"कुणाकडे घेतल्या? मी पण हा निरर्थक प्रश्न का विचारते? त्या बाईकडेच घेतल्या असतील. भाज्या घेऊनच पैसे दिलेत की तिच्याकडे पाहत-पाहत. तिच्याशी बोलताना नुसते पैसे देऊन

आलात?"
कमलाबाईंनी हसत विचारले.
"नाही ग.आज ती नव्हतीच गं..."
"म्हणून आल्यापासून डिसमूड आहात ना? ती भेटली नाही म्हणून नैराश्यग्रस्त होऊन वण-वण भटकून आलात? आता मला समजले, तुम्हाला उशीर का झाला ते..."
"काहीही बरळू नकोस हं. खरेच सांगतो, त्या माणसाकडून मी स्वतः भाज्या घेतल्या, पैसे दिले, स्कुटीला बॅग..हां..हां स्कुटीला बॅग..थांब आलोच..." म्हणत तात्या लगबगीने बाहेर आले. स्कुटीजवळ गेले. परंतु, स्कुटीला बॅग नव्हती.
'अरे, इथेही भाज्यांची पिशवी नाही. मग असे तर झाले नाही. ना की आपण बँकेत गेलो तेव्हा पिशवी स्कुटीलाच राहिली असावी. बँकेत काम करून बाहेर येईपर्यंत कुणी तरी पिशवी लांबवली.
नक्कीच तसे झाले असणार..' असा विचार करत तात्यासाहेब घरात आले.
"काय झाले? नाही ना पिशवी? कुठे विसरलात? काय हा वेंधळेपणा? भाजी घेऊन येताना कुणा-कुणाला भेटलात ते आठवा जरा. नेहमीची बाई भेटली नाही म्हणून टाइम-पास करायला अजून दुसरीकडे..."
"छट् ! मी काय तसा आहे का?"
"ताऽत्या, तुम्हाला माझ्यापेक्षा अधिक चांगलं कोण ओळखते ते सांगा बरे."
"हे बघ, मजाक सोड... पण भाजीची पिशवी गेलो कुठे?"
"राहू देत. तुम्ही भाजी घ्यायलाच विसरलात. तसे सांगून माझी बडबड ऐकायला नको म्हणून उगीच फंट्या मारु नका. राहू द्या. आहे तीच भाजी उकडून खाऊ... " असे म्हणत कमलाबाई आत गेल्या.

जेवणे वगैरे झाली. परंतु, तात्यांसमोर 'पिशवी गेली कुठे?'हा प्रश्न होताच. त्यांचे जेवणात लक्ष नाही हे पाहून कमलाबाई म्हणाल्या,
“जाऊ द्या. नाही तरी आजकाल तुम्हाला विसरायला होतेय. आपण 'म्हातारे' होतोय हे मान्य करायलाही काळीज लागते..."
"मला सांगतेस? तू म्हातारी होतेय हे तुला कबूल आहे? दर आठव्या दिवशी केसाला काळे फासतेस? कुणाकडे सत्यानारायणाच्या प्रसादाला जायचे झाले तरी आधी तासभर ब्युटीपार्लरला जाऊन 'ब्युटी' दिसण्याचा केविलवाणा प्रयत्न करतेस आणि माशे काळीज काढतेस? अजून ही छप्पन ईंचाची छाती आहे म्हटलं..."

"उगीच मोठ्या-मोठ्या व्यक्तीचे डायलॉग मारु नका. छातीचे माप सांगतानाही बघा कसा दम लागलाय.." कमलाबाई हसत-हसत म्हणाल्या आणि वातावरणातील विशेषतः तात्यांच्या मनावरचा ताण निवळला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तात्यासाहेब देवपूजा करत असताना कमलाबाई म्हणाल्या,
"अहो, आत्ता कामाला बाई.." त्यांचे वाक्य मध्येच तोडून तात्या म्हणाले,
"वाहवा! बहुत खुब! कामाला बाई... कमलाबाई केवळ दोन कान्याचा फरक पण एकीला मालकीण तर दुसरीला मोलकरीण बनवतो."
"तो अक्षरांचा खेळ थांवबा. कपडे आहेत का धुवायचे?"
"काल घातलेले कपडे दे ना."
"हे बघा. मला....'नो टाइम।' असले कपडे तर उठा आणि काढा..."
"कपडे तर काढलेलेच आहेत... " खट्याळ आवाजात म्हणत तात्यासाहेब पूजा अर्धवट सोडून उठले. दारामागे टांगलेल्या कपड्यातील वस्तू काढन घेऊन कपडे न्हाणीमध्ये टाकले...

काही वेळातच कामवालीबाई आली. तिने कपडे धुवायला घेतले. दोन-चार कपडे धुऊन होतात न होतात तोच न्हाणीघरात काही तरी पडल्याचा आवाज आला. कमलाबाई प्रश्नार्थक नजरेने तात्यांकडे पाहत असताना कामवालीबाई...
'काकू,...काकू..' असे ओरडत स्वयंपाकघरात आली.
हातातली चावी कमलाबाईंना दाखवत म्हणाली, "काकांच्या पँटमधून पडली..."
"अग बाई, अहो, हे काय? लॉकरची चावी? बँकेतून आल्यावर पँटमधून काढली नाहीत का? बरे, झाले. तू पाहिलीस म्हणून. नाही तर..." कमलाबाई बोलत असताना ती बाई न्हाणीघरात निघून जाताच त्या दिवाणखान्यात गेल्या आणि तात्यांनी सुटकेचा श्वास सोडला. मात्र, काही क्षणात जणू वादळ घोंघावत आल्याप्रमाणे कामवाली बाई घाबरलेल्या अवस्थेत पळत बाहेर आली. हातातील छोटी पर्स कमलाबाईंना दाखवून म्हणाली,
"काकू, पर्स पण काकांच्या पँटच्या खिशात होती..."
"काय? ही ही... म्हणजे? अहो, ही तर दागिन्यांची पर्स! म-म-म्हणजे? तुम्ही लॉकरमध्ये ठेवलीच नाही..."
"बापरे! काकू, बघून घ्या हो बाई. मी आत काय आहे ते उघडून पाहिलेपण नाही बरं का. ती--ती किल्ली पडली ना यासाठी पँटचे खिसे बघत असताना हाताला ही पर्स लागली आणि ती जशीच्या तशी घेऊन आले..." घाबरलेली बाई सांगत असताना कमलाबाई म्हणलाल्या, "अग, तू का अशी घाबरतेस? माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. बघ..." असे म्हणत कमलाबाईंनी

ती पर्स उघडली. त्यात ठेवलेले सारे नग बघितले आणि त्या समाधानाने म्हणाल्या,

"सगळे जशाला तस्से आहे. तू टेंन्शन घेऊ नको..."

"काकू, देवाची कृपाच झाली हो..." म्हणत ती बाई पुन्हा कामाला लागली आणि संतापाने फुललेल्या कमलाबाईंनी एक जळजळीत कटाक्ष तात्यांकडे टाकला आणि कडाडल्या,

"तुमच्या वेंधळेपणाची, विसरभोळेपणाची आता मात्र कमाल झाली हो. बाईने न पाहता कपडे धुतले असते आणि ते कपडे तसेच इस्त्रीला गेले असते म्हणजे? अहो, केवढे मोठ्ठे नुकसान झाले असते? असे हो कसे..."

मात्र, तात्यासाहेबांनी त्या क्षणी 'मौनम सर्वार्थ साधनम' हा मंत्र उपयोगात आणला आणि आरती सुरु केली...

तीन दिवसानंतरची सकाळ, कमलाबाई सकाळी सकाळी म्हणाल्या, "अहो, आज तर बँकला सुट्टी नाही ना? आज आठवणीने, न विसरता लॉकरचे काम करा..."

"मी तोच विचार करतोय, पण आज तीन दिवसांच्या सुट्टीनंतर बँक उघडणार. गर्दी खूप असणार ग. उद्या जावे की काय असा विचार करतोय.."

"ते काही नाही. दागिन्यांच्या काळजीने तीन रात्री माझ्या डोळ्याला डोळा लागला नाही. तुम्ही रात्रभर मस्त घोरत..."

"जातो. बाई, जातो. आज बँकत जातो. मग तर झाले?" म्हणत तात्यासाहेबांनी घड्याळाकडे पाहिले. साडेदहा वाजत होते. तयार होऊन दागिन्यांची पर्स घेऊन निघत असताना कमलाबाई म्हणाल्या,

"अहो, भाज्यापण आणायच्या आहेत. त्या दिवशीच्या भाज्या सापडणार नाहीतच. परवाच्या दिवशी दारावर आलेल्या दोन भाज्या घेतल्या होत्या. फार तर आजचे होईल आणि हो, तुमच्या त्या भाजीवालीची सुट्टीही संपली असणार तीही ताजीतवानी होऊन आली असणार. तेव्हा तिला..."

"सारखं...सारखं भाजीवाली-भाजीवाली करु नकोस असं काय सोनं लागलय तिला...."

"आता ते मी कसे सांगणार? जो कुणी तिच्याकडे वारंवार जातो.... भाजी घ्यायला....तीच व्यक्ती सांगू शकेल..."

"तुला बोलण्यात कुणी हरवू शकेल का? आता मी निघतो. करतो करतो. सारी कामे व्यवस्थित करतो." म्हणत तात्या निघाले...

मारोतीचे दर्शन घेऊन तात्या बँकेत पोहचले. पाहतात तर तिथे बँकेसमोर प्रचंड गर्दी. बँकेचे दार पूर्णपणे उघडले नव्हते. सारे कर्मचारी नाकाला रुमाल लावून बाहेरच उभे होते.

"काय झाले हो? बँक उघडली नाही का? सुट्टी तर नाही?" तात्यासाहेबांनी एका इसमाला विचारले..

"आज कशाची सुट्टी आलीय? तीन दिवसांच्या सुट्टीनंतर आत्ता सकाळी कर्मचाऱ्याने बँकेचे दार उघडले. काय झाले कुणास ठाऊक... आतमध्ये गेला न गेला तोच पळत बाहेर आला आणि भडाभडा ओकला." त्या इसमाने माहिती दिली.

"तीन दिवस खाय खाय खाल्ले असणार अजीर्ण झाले असेल. दुसरे काय?" तात्या म्हणाले.

"नाही हो. बँकेतच कशाचा तरी वास येतोय. बँक उघडल्याबरोबर आतला वास इथपर्यंत येत होता. इथे उभे राहणेही मुश्कील झाले होते."

"असे काय झाले असेल बुवा." तात्यांनी विचारले.

"काही तरी वेगळीच भानगड...खुनाचा वगैरे प्रकार असेल.."

"काऽय? बँकेत खून कसे शक्य आहे? तीन दिवसांपूर्वी बँक सुरु होती. बँक बंद करताना लक्षात यायला हवे होते."

"अहो, आपण लॉकरमध्ये काय ठेवतो है कुणाला माहिती असते?"

"म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की कुणाला तरी मारून, तुकडे करून लॉकरमध्ये ठेवले? अहो, लॉकर असे केवढे दीड-दोन फुटी., त्याच्यामध्ये पाच सहा फुटाचा..."

"काका, अहो, गर्भातल्या.नको असलेल्या स्त्री भ्रुणाची हत्या करून लॉकरमध्ये ठेवले असेल तर?"

"बाप रे। केवढे भयानक कौर्य हे! पण ज्या लॉकर हे भ्रुण ठेवले असणार त्याचा शोध लागेल ना? म्हणजे येणारा वास त्या सडलेल्या..."

"अर्थातच! त्या लॉकरचा आणि माणसाचा शोध लागेलच.!"

"आधी तो वास दूर करण्याचा प्रयत्न होतोय उदबत्ती, धूप, राळ जाळून..."

"काय? धूप, राळ यांनी त्या सडलेल्या मांसाला ओवाळणार की काय?" त्या दोघांची चर्चा ऐकणाऱ्या एका इसमाने विचारले.

"तसे नाही हो, तो घाण वास दूर करण्यासाठी एक-एक उपाय करत आहेत."

"मी बँकेच्या दारापर्यंत जाऊन आलो. असा घाण वास आला म्हणता मी पळतच आलो." तो इसम म्हणाला.

"ह्या फवारण्या, धूप हे तात्पुरते उपाय आहेत. काही क्षणानी तो डोकेवर काढणारच. ज्या लॉकरमधून वास येतोय ते लॉकर शोधणे महत्वाचे आहे..."

"पण ते लॉकर उघडण्यासाठी तो माणूस समोर पाहिजे हो. त्याच्याजवळची चाबी

लावल्याशिवाय लॉकर उघडणार कसे?"

"बँकेजवळ मास्टर की असेल ना?"

"कशी असू शकेल? कदाचित असेलही किंवा नसेलही. तसेच लॉकर फोडताही येईल.."

तात्यासाहेब असाच बोलत असताना त्यांच्या खिशातला भ्रमणध्वनी वाजू लागला. 'घरचाच फोन' असणार या शंकेने तात्यांनी खिशातल्या खिशात तो बंद केला. परंतु काही क्षणांनी तो पुन्हा गुरगुरु लागला. त्यांनी खिशातून फोन बाहेर काढला. त्यावर अनोळखी कमांक पाहून त्यांनी तो उचलला,

"तात्यासाहेब का?"

"होय, मीच बोलतोय."

"आपण तीन दिवसांपूर्वी बँकेत आला होतात ना? आपण आपले लॉकर उघडले होते का?"

"हो हो. उघडले होते. पण काय झाले?"

"काही नाही. रूटीन तपासणी आहे. तुम्हाला बँकेत यावे लागेल."

"अहो, मी बँकेसमोरच आहे. दोन मिनिटात येतो..." तात्या बोलत असताना तिकडून फोन बंद झाला. खिशातला रुमाल काढून नाकावर बांधत तात्यासाहेब बँकेत शिरले. त्यांना पाहताच व्यवस्थापक म्हणाले,

"या. तात्यासाहेब, या. परवा आपण लॉकर उघडले. तेंव्हा त्यात काय ठेवले? खरे तर मी हा प्रश्न विचार नये..."

"अहो, ती एक गंमतच झाली. काय झाले, दागिन्यांची ही पर्स घेऊन मी बँकेत आलो. लॉकर उघडले परंतु पर्स लॉकरमध्ये न ठेवताच निघून गेलो. म्हणुन तर आज पुन्हा यावे लागले..." खिश्यातली पर्स दाखवुन तात्या म्हणाले.

"चला तर मग. तुमची पर्स ठेवताही येईल आणि आमची पडताळणीही होईल..." म्हणतव्यवस्थापक उठले.

"म-म-म्हणजे? तो-तो-वास...."

"चला तर. बघू या..." व्यवस्थापकाच्या शेजारी बसलेले फौजदार म्हणाले.

काही क्षणातच तात्या, व्यवस्थापक, फौजदार सारे लॉकर रुममध्ये पोहचले. व्यवस्थापकांनी तात्या साहेबांची चाबी घेऊन स्वत: जवळची बँकेची चावी लावून लॉकर उघडले ना उघडले तोच एखाद्या वादळाप्रमाणे एक वेगळाच दर्प बाहेर घोंघावत आला. तात्यासाहेबांसह सारे बाहेर पळत आले. दारात उभ्या असलेल्या शिपायाने लॉकररूमचे दार लावून घेतले परंतु, त्या कमी कालावधीत बाहेर पडलेल्या वासाने सारी बँक व्यापून टाकली

फौजदाराने तात्यांच्या हाताला धरून त्यांना व्यवस्थापकाच्या दालनात आणले. पाठोपाठ व्यवस्थापक होते. सारे खुर्च्यांवर बसताच फौजदारांनी तात्यांना विचारले.

"एक गोष्ट खरी-खरी सांगा. तुम्ही लॉकरमध्ये असे काय ठेवले होते?"

त्या प्रश्नाने तात्यांचे अवसान गळाले. एक क्षणात त्यांच्या लक्षात सारी स्थिती आली. आपणास गुन्हेगार ठरवून गुन्हा वदवून घेतला जाणार. भीतीची एक थंड लहर त्यांच्या शरीरात पोहचली. त्यांचे अंग थरथर कापू लागले. भर हिवाळ्यात, वातानुकुलीत दालनात बसलेले असतानाही त्यांचे शरीर घामाने डबडबले. तात्या शांत बसलेले पाहून फौजदारंनी पुन्हा तोच प्रश्न विचारला.

"म-म-मी क-काहीच नाही ठेवले हो, खरे सांगतो..."

"तुम्ही फार पोहचलेले दिसता हो. कुणाचा गर्भ पाडून तो लॉकरमध्ये ठेवलात?" फौजदार आवाज चढवून विचारत असताना अग्निशामक दलाचे शिपाई तिथे आलेले पाहून फौजदार व्यवस्थापकांना म्हणाले,

"या शिपायांना आधी यांचेच लॉकर दाखवा. समजेल सारे यांचा खोटारडेपणा काही क्षणात समोर येईल..."

व्यवस्थापकांपाठोपाठ अग्निशामकदलाचे कर्मचारी लॉकर रुममध्ये पोहचले.व्यवस्थापकांनी दार उघडून दुरूनच तात्यांचे लॉकर दाखवले. अग्निशामकदलाच्या शिपायांनी आत प्रवेश केला. हातातल्या काठ्यांनी त्यांनी लॉकरमध्ये साहित्य बाहेर काढले. त्यावर पाईपमधून पाण्याचा फवारा मारला. बाहेर पडलेल्या वस्तूंवर नजर टाकून एकमेकांना इशारे करताच एक शिपाई व्यवस्थापकांच्या दालनाजवळ गेला. तो आत शिरत असताना फौजदारांनी तात्यासाहेबांना दरडावून विचारले, "म्हाताऱ्या, खरे सांग. कोणाला मारुन तू लॉकरमध्ये..." तितक्यात आत शिरलेला तो शिपाई म्हणाला, "साहेब.तसे काही नाही.लॉकरमध्ये भाज्या होत्या."

"काय? भाज्या?" फौजदारासह व्यवस्थापकांनी विचारले.

"हो. हो. भाज्याच! आत्ता आले लक्षात. लॉकरमध्ये ठेवण्यासाठी ही दागिन्यांची पर्स घेऊन आलो होतो. बँकेत गर्दी होती म्हणून बाजारात जाऊन भाज्या घेऊन पुन्हा बँकेत आलो. लॉकर उघडले आतमध्ये ही पर्स ठेवण्याऐवजी भाज्यांची पिशवीच ठेवली. हो. हो. आले लक्षात. साहेब, कसे आहे ना, लोक लॉकरमध्ये पैसे ठेवतात, दागिने ठेवतात. महत्वाची कागदपत्रं ठेवतात. पण मी मात्र भाज्या ठेवल्या.... भाज्या...." तात्यासाहेबांना तसे बडबडताना पाहून फौजदार एका शिपायास म्हणाले, "अरे, तात्यासाहेबांना घेऊन जा.... त्यांच्या घरी...!"

*****

## गृहलक्ष्मी - धनश्री सचिन देसाई

ट्रिंग ट्रिंग ......

सकाळच्या धावपळीत फोनची बेल वाजली एकीकडे डब्बे भरत भरत रेवाने फोन उचलला सासुबाई चा फोन होता यावेळेस आमचे गणपती महालक्ष्मी ला येणे होणार नाही तेव्हा तुम्ही करून घ्या आणि रेवाच्या पायाखालून जमिनच सरकल्यासारखे झाले फोन तसाच ठेवून तिथेच खाली बसली तिला काहीच सुचत नव्हते.

लग्न झाल्यापासून 16 17 वर्ष हा सण तीसासू-सासरे यांच्या देखरेखीखाली करत होती ;आणि अचानक आलेल्या फोन ने ती जरा बावचळून गेली, महालक्ष्मी हा सण त्यांच्यासाठी दिवाळीपेक्षा मोठा सोवळ्या ओवळ्याचा सगळं कसं व्यवस्थित झालं पाहिजे.

तिने दिर्घ श्वास घेतला ,मन घट्ट केले अजून पंधरा वीस दिवस अवकाश होता त्यातच तिच्या दोन्ही मुलींच्या परीक्षा व तिचे स्वतःचे ऑनलाईन क्लासेस करोनाच्या संकटामुळे घरकामाला बाई नव्हती अशा अनेक प्रश्न मधून वाट काढून तिला तो सण-समारंभ करायचा होता.

पण स्त्रीने जर मनात आणलं तर ती एव्हरेस्ट पण सहज पार करू शकते, आणि अशा तिच्या मनातल्या विश्वासाने रेवा उभी राहिली नवऱ्याचा डबा भरून त्याला ऑफिसला पाठवलं ;मुलींना ब्रेकफास्ट देऊन त्यांना शाळेला बसवलं; आणि मग हातात पेन आणि डायरी घेऊन ती बसली प्लॅनिंग करायला तिने सगळी पूर्वतयारी ची यादी तर केलीच शिवाय पूजेच्या दिवशी ची तयारी सामानाची यादी स्वयंपाकाची पूर्वतयारी महालक्ष्मीचा मेनू हे सारं काही तिने लिहून काढलं काही विसरायला नको म्हणून.

दुकान बंद म्हणून कापूस निवडून वस्त्रमाळा पासून सुरुवात होती सासुबाई मुळे कधी तिने कापूस
हातात ही घेतला नव्हता; पण इट्स ओके! असं म्हणत वळवट ,मालत्या, वस्त्रमाळा हे सारं तिला करायचं होतं
सगळी कामे आटपून मुलांना अभ्यास देऊन दुपारी ती पूर्व तयारी करायची बघता बघता हरितालिका गणपती हे सगळे सण तिने थाटात केले. महालक्ष्मी बसणार त्याच्या आदल्या दिवशी सगळी फुलोऱ्याची तयारी झाली सगळ्या प्रकारचे कूट ,पुडी तिने करून ठेवल्या होत्या त्यामुळे तिचे निम्मे काम सोपे झाले मुखोटे रंगवण्यात तिच्या मुली देखील सहभागी झाल्या.

दुसऱ्या दिवशी महालक्ष्मीला आणण्यासाठी घरासोबत ती व तिच्या मुली देखील सजल्या होत्या त्यांच्यासाठी केलेली सगळी खरेदी साड्या दागिने बाळांचे कपडे व महालक्ष्मी यांचे थाटात पूजा करून दुसऱ्या दिवशी चे आमंत्रण दिले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच लवकर सगळं आटपून स्वयंपाक व एकीकडे पूजेची तयारी तातू काढणे ,आघाडा केना ,पाळणा वाती फुलवाती भिजवणे ,ओटी ची तयारी आणि सोवळ्यातला स्वयंपाक अशी एका वेळेस अनेक कामे ती करत होती जणू अष्टभुजा दुर्गेचे रूप तिने धारण केले होते, पण तिच्या दोन्ही मुली तिला खूप खंबीरपणे साथ देत होत्या तर डेकोरेशनची धुरा तिच्या नवऱ्याने सांभाळली होती. संध्याकाळच्या वेळेस ती देखील गौरी प्रमाणे नटून पूजा नैवेद्य आरती सारे काही वेळेत केलं. दुसरे दिवशीची उत्तर पूजा नैवेद्य गाठी पडणे संध्याकाळी जेमतेम चार-पाच बायकांना हळदीकुंकू करून हा सण पार पाडला.

या सणाच्या निमित्ताने युनिटी ऑफ स्ट्रेंथ हे पुन्हा सिद्ध झाले होते पण प्लॅनिंग आणि टाईम मॅनेजमेंट त्यामुळे कितीही कठीण गोष्टीला आपण सहज पार पाडू याचे मानसिक समाधानाचे तेज तिच्या चेहऱ्यावर दिसत होते कारण तिच्या महालक्ष्मी अगदी समाधानाने तृप्त होऊन तिला आशीर्वाद देऊन परत येण्याचा निरोप त्यांनी घेतला होता.

गोष्ट साधीच पण स्त्रीच्या कर्तृत्वाला खरी उतरणारी कसअसतं वर्किंग वुमन बाहेर कार्यरत असतात ,टारगेट पूर्ण करतात ,प्रोजेक्ट सक्सेसफुली लॉन्च करतात, तेव्हा त्यांच्य भरभरून कौतुक होतं पण घरातली स्त्री जेव्हा सक्षम पणे एखादं कार्य पार पडते तेव्हा तिला गृहीत न धरता तिच्या पाठीवर कौतुकाची थाप जर दिली तर तिचा उत्साह द्विगुणित होतो व तिला परत स्फूर्ती मिळते कारण घरच्या लक्ष्मी चे मोल हे कशातच तोलता न येण्यासारखे आहे.

आकाशात सूर्य असतो तो दिवसभर काय करतो तर तो फक्त असतो त्याच्या असण्यानेच खूप काही होत असतं, तशीच ही फेमिनाइन स्त्री ऊर्जा आहे स्त्रीचं अस्तित्व घरात स्नेह, ओलावा, चैतन्य, उत्साह, सौंदर्य तिच असणच  एक समाज देणे व घरासाठी वरदान आहे. हे प्रत्येकाने जाणून तिचा आदर हा केलाच पाहिजे......!!!

*****

## 'कही कही से...'- जाई सरवणकर

"हाय दोस्तो , वेलकम टू ९२.५ म्युझिक एफ एम. मैं हु आपकी दोस्त शिरीन ! शिरीन द ग्रेट. व्हॉट अ वंडरफुल डे ! क्या मौसम है , क्या नजारा है . तो चलो इसी बात पे we are now move further part of our favorite show . जैसे की आप सब लोग जानते है की शो का नाम है "आपकी पसंद " तो चलो चलते है नेक्स्ट कॉलर की रिक्वेस्ट की और. जो की सुनना चाहते है ये ब्युटीफुल गाना . आय एम शुअर आपको भी ये गाना पसंद आयेगा . So enjoy and keep listening.

कहीं-कहीं से हर चेहरा तुम जैसा लगता है
तुम को भूल न पायेंगे हम, ऐसा लगता है

---------------------------------------------------------------------------

ट्रेन सटासट धावत होती. झाडामागून झाडे, घरामागून घरे मागे पडत होती. अश्यातच कोण्याच्या तरी हलवण्यामुळे विशालला जाग आली. डोळे चोळत त्याने समोर पाहिलं तर समोरचे निळे डोळे त्याला जाग करत होते.

" अंकल , प्लिज मुझे विंडो सीट चाहीये.क्या आप मुझे बैठने देंगे ? मेरे सीटपर बैठेये. प्लिज !!!"

निळाई आर्जव करत होती. विशालने नजरेला नजर भिडवली. त्या नजरेत तो बघता बघता डुंबून गेला.

सानिका ! पहिल्यांदा कुठे भेटली बरं. हा कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये. तिचा ग्रुप तेव्हा परफॉर्म करत होता. ग्रूपची कोओरडीनेटर म्हणून सगळी काम अगदी कमी तिथे आम्ही कामही पार पाडत होती. आपण मात्र या गोष्टीपासून लांब होतो. पहिल्यापासून आर्मीच आकर्षण होतं आणि तेच वेड डोक्यात घेतलेलं. अमितने ओढत नेलं म्हणून गॅदरिंगला गेलो आणि तिथेच सानिकाशी ओळख झाली. आयत्या वेळेस कोरस चमूतील एक जण कमी पडला आणि मी ते काम करावं म्हणून तिने आर्जव सुरू केलं. अगदी ही समोरची निळाई करतेय तसच.

पहिल्यांदा सानिकाला बघितलं तेव्हा काय बरं आवडलेलं आपल्याला ? तिचे डोळे! ते शांत निळेशार गर्द डोहासारखे . अगदीच खेचून घेतलं त्यांनी. मग पुढील सिलसिला.

आता ५ वर्षांनी जातोय परत ते त्यांच्यासाठीच. आजही तसेच आहेत . शांतवून घेणारे. न बोलता ५ वर्षे वाट पाहणारे.

"अंकल , प्लिज मुझे सीट दोगे ? " विशाल भानावर आला. समोरच्या प्रश्नाकीत पण शांतपणे आर्जव करत असलेल्या निळाईकडे त्याने पाहून घेतलं आणि स्वतःशीच हसला तो...

ऐसा भी इक रंग है जो करता है बातें भी
जो भी इसको पहन ले वो अपना-सा लगता है

---------------------------------------------------------------------

और तो सब कुछ ठीक है लेकिन कभी-कभी यूँ ही
चलता-फिरता शहर अचानक तनहा लगता है

घड्याळन टोले देताच प्रो. डिसोझा भानावर आले. "अरे आज कुमारकडे जायला हवं , त्याने आग्रहाने बोलावलं आहे. २५ वी अनिव्हर्सरी आहे त्याच्या लग्नाची. जायला तर लागेलच" ते स्वतःशीच पुटपुटत राहिले. 'काय गिफ्ट द्यायला हवं बरं! आपण असेच वेंधळे. नॅन्सी असायला हवी होती, तिने काहीतरी मार्ग काढला असता. याबाबतीत तिचं खरी हुशार. जगविख्यात शास्त्रज्ञ असून फुकट आपण असे ती गमतीने म्हणायची तेच खरं. हे सगळं सांभाळून घेतलेलं ,सजवलेलं  मोठं घर ही तिची धडपड. आपण आपल्याच प्रयोग विश्वात रममाण सगळं काही तिच्यावर सोपवून. अगदी विल्सनझाल्यावरही !
ती गेल्यावर मात्र आपण उघडे पडलो. विल्सनपेक्षाही पोरके झालो. नॅन्सीची गरज तेव्हा तीव्रतेने जाणवली. अस का होतं? माणूस जवळ असतो तेव्हा गृहीत धरलं जातं आणि गेल्यावरच त्याची किंमत कळते. एवढे शोध लावलेले पण तिचा कॅन्सरही काही वेळेवर शोधू शकलो नाही. पाहता पाहता निघून गेली. वाळूसारखी निसटून. त्यानंतर हे असेच होतेय. सैरभैरसारखं. विल्सन सगळी व्यवस्था लावून गेलाय पण नाही जमतंय आता . आज सीमेट्रीत जायलाच हवं. त्याशिवाय बरं वाटणार नाही.
डिसोझानी हळूच ओलसर झालेला चष्मा पुसला. ड्रायव्हरला हाक मारून गाडी काढायला सांगितली .

--------------------------------

"गौरव चल ! स्कुलबस आलीये, उशीर होईल"  शलाकाची गडबड चालूच होती. दर सकाळचा हा कार्यक्रम होता. शेखरची तिच्या नवऱ्याची तयारी, गौरवची धांदल यातच तिची सकाळ संपे. आताही तेच झालं. गौरवला गेटपाशी सोडून ती परत आली तर पुन्हा तो भास झाला. आताशा हे फार होऊ लागलंय. चित्त थऱ्यावर ठेवायलाच हवं. काय होतंय हे! अस मनोमन पुटपुटतच ती आत आली. एक चिमटा काढून बघितला स्वतःलाच आणि पुन्हा खिडकीबाहेर नजर टाकली तर हो! तोच होता . अभिजित.. फोनवर बोलत असलेला. गाडीला सिग्नल मिळायची वाट पाहत.

"हा !इथे कसा ? कसा काय पोचला. माहितेय का त्याला मी इथे राहते ते ? सगळं मागे ठेवून आलोय की आपण इथे १० वर्षांपूर्वी . आता परत ते सगळं!!! " शलाकाने डोळे घट्ट मिटून घेतले..

अभिजित आणि शलाका . कॉलेजमध्ये फेमस लव्हबर्ड कपल. आख्या गृपने त्यांना मनोमन वॉकओव्हर दिलेला दोघांचंही शिक्षण पूर्ण होताच घरी सांगायच ठरलेलं. आणि झालेही तसेच. पण इथेही " पण" आलाच. शलाकाच्या वडिलांना हे लग्न मान्य नव्हतं. जाती वेगळ्या असल्याने. खूप वादावादी , भांडण , रुसवे फुगवे झाले. पण मान तुकवावीच लागली तिला वडिलांसमोर.
शेवटचा निरोप घेतानाच अभिजीतचा दुखरा चेहरा तिला आताही जश्याच्या तसा आठवला. ओढलेला, प्रचंड वेदना असलेला. नजरेला नजर भिडवायची तिची हिंमत नव्हतीच. कसेतरी करून निरोप घेतला पण मग तो चेहरा सतत पाठलाग करत राहिला का अस करतेस म्हणून काकुळतीने प्रश्न विचारणारा. इतकी वर्षे झाली पण तो चेहरा अजूनही जश्याच्या तसा आठवतोय ! काय करू मी ? शलाकाने डोळे पुसले.

"अब भी यूँ मिलते हैं हमसे फूल चमेली के
जैसे इनसे अपना कोई रिश्ता लगता है"

तुम क्या बिछड़े भूल गये रिश्तों की शराफ़त हम
जो भी मिलता है कुछ दिन ही अच्छा लगता है

कुठेतरी रेडिओवर निदा फाजलींच गाणं वाजत होतं...

*****



## पुन्हा भेटशील वाटल नव्हतं - मानसी मंगेश सावर्डेकर

ती एक प्रसिद्ध लेखिका आवडतं क्षेत्र तिने निवडलेल त्यामुळे त्यात तिथे झोकून देत होते तिला अचानक एक दिवस फोन येतो अबोली बोलते नमस्कार मी श्रीमणी जोशी बोलते आहे आकांक्षा आश्रमातून आकांक्षा अबोली विचार करते

तेवढ्यात

श्रीमणी: अहो मॅडम मी साताऱ्याहून बोलते आहे मला थोडं बोलायचं होतं तुमच्याशी

अबोली: हा हा बोला ना

श्रीमणी: मॅडम मला आश्रमाबद्दल सविस्तर रीत्या  बोलायचं आहे जेणे करुन आमच्या आश्रमाला त्याचा फायदा होईल

अबोली: ठीक आहे मी माझ्या ओळखीच्या एका लेखिकेला तुमच्याकडे पाठवते तुम्ही तिला सविस्तर माहिती द्या

श्रीमणी: एक बोलू का मॅडम

अबोली: बोला ना

श्रीमणी: तुम्हीच आला तर......

अबोली: ते शक्य नाही  खूप काम आहेत इथे मी चांगल्या लेखिकेला पाठवते ना तुमच्याकडे

श्रीमणी: प्लीज मॅडम प्लीज तुम्ही या ना त्या निमित्ताने तुमची आणि माझी ओळख पण होईल आणि आमचा आश्रम पण पावन होईल

अबोली: अहो असं काय म्हणता पावन वगैरे बरं येते पण तिथे राहण्याची सोय होईल का माझी??

श्रीमणी: हो हो अवश्य तुम्ही या मी सगळी सोय करून ठेवते धन्यवाद मॅडम

अबोली: बरं बरं धन्यवाद नको उद्या सकाळी मी पोहोचत पत्ता व्हाट्सअप करता मला?

श्रीमणी: हो धन्यवाद

अबोली फोन ठेवते आणि बेल वाजवून मावशींना बोलावते

अबोली :- मावशी मी चार दिवसांसाठी साताऱ्याला जात आहे माझ्या घरी फोन करून आईला बॅग भरायला सांगा आणि हो मी आज रात्रीच निघणार आहे असेही नक्की सांगा म्हणजे ती नेहमीप्रमाणे त्यात थोडा खायलाही ठेवेल

मावशी हो म्हणून निघून जातात

अबोली तयारीला लागते

तिथे काय बोलायचे कोणते प्रश्न त्यांना विचारायचे हे तिला नेहमीच असलं तरी ती निघण्याच्या आधी दरवेळी तयारीत जाते  ड्रायव्हर जवळ येऊन

अबोली: दादा मी सातारला जाते आहे

दादा :- मग मी माझी बॅग घेऊन येतो घरून

अबोली: नाही नाही दादा मी एकटीच जाते आहे गाडी घेऊन तुम्ही आईजवळ थांबा तिला काही हवं नको ते बघा जाईन मी

अबोली घरी येते

अबोली: आई मला निघायचं आहे माझी बॅग......

आई: - तयार आहे

अबोली: - आणि माझा डबा....

आई:- तो पण तयार आहे

डबा उघडत

अबोली: - आई तू आत्ता लाडू केलेस??

आई: - माझ्या लेकीला चार दिवस बाहेरगावी जायचं म्हटलं तर आई दिमतीला तयार नको का?

बरं नीट जा गाडी हळू चालव गाडीत पेट्रोल भरल आहे का बघ दोन तासांनी थोडा आराम कर म्हणजे झोप यायची नाही

अबोली: हो गं किती सूचना करतेस साडेअकरा वाजता निघते मी म्हणजे रात्रीचा ट्राफिक लागणार नाही आणि सहा सात तासात पोहोचेल पहाटे पोहोचले की कामालाही लवकर सुरुवात करता येईल

जेवण झाल्यावर थोडावेळ अबोली झोप काढते रात्रीचा प्रवास करायचा असतो ना म्हणून अकरा वाजता उठून आंघोळ करून कॉटनचा कुडता आणि जीन्स घालून साडेअकराला निघते गाडी पेट्रोल बऱ्यापैकी असल्याची खात्री करून घेते आणि गाडी सुरू करते हायवेला पेट्रोल भरून गाडीची टाकी फुल करते दोन सव्वा दोन तासांनी थांबून तोंडावर पाणी मारते आणि पुढे जाते खेड शिवापूर जवळ ट्रक भरपूर असल्याने ट्राफिक लागतो पण तो मूविंग असतो

साडेपाच ला आश्रमाच्या गेट जवळ पोचते आणि दोन वेळा गाडीचा हॉर्न वाचवते शिपाई च्या वेशात असलेले जाधव काका दार उघडतात आणि गाडी आत येते काका दार पुन्हा बंद करतात काका गाडीचं दार उघडतात आणि गुलाबाचा नाजूक फूल अबोली ला देऊन प्रसन्न चेहऱ्याने गुड मॉर्निंग म्हणतात

कबुलीही फुल हातात घेऊन गुड मॉर्निंग म्हणते साडी नेसलेला नेमाडे ताई त्यांना गुड मॉर्निंग म्हणून आत येण्याची विनंती करतात अबोली बॅग घ्यायला गाडीकडे वळते आणि नेमाडे ताई तिला थांबवून गाडीतून बॅग स्वतःच्या हातात घेतात आणि तिच्याबरोबर चालू लागतात तिकडे असा म्हणत अबोलीला त्या उजव्या बाजूला असलेल्या ऑफिसमध्ये बसायला सांगतात तेवढ्यात एक ताई वाफाळलेला चहा व बिस्कीट घेऊन येतात

नेमाडे ताई:- मॅडम तुम्ही बसा चहा घ्या श्रीमणी ताई येतीलच एवढ्यात

अबोली: - त्या काही कामात आहेत का?

नेमाडे ताई:,- हो त्या आणि बाकी सगळे कर्मचारी विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या हॉलमध्ये प्रार्थना चालू आहे तिथे आहेत

अबोली :- बरं

नेमाडे ताई जायला निघतात तेवढ्यात अबोली त्यांना विचारते एक मिनिट मी पण हॉलमध्ये आले तर चालेल का??

नेमाडे ताई:- हो हो काहीच हरकत नाही पण तुम्ही प्रवासातून आलात दमला असाल म्हणून येथे बसा असं म्हटलं मी पण तुम्हाला यायचं असेल तर या तुम्ही . तुम्ही चहा घ्या मी तुम्हाला घेऊन जाते हॉलमध्ये अबोली पटकन चहा संपवते आणि नेमाडे ताईंना म्हणते चला!

हॉलमध्ये प्रवेश करायच्या आधी पासूनच तिला प्रार्थनेचे सूर ऐकू येतात सगळे तालासुरात प्रार्थना म्हणत असतात हॉलमध्ये मधोमध गणपती आणि सरस्वतीची मूर्ती असते महिला कर्मचारी व पुरुष कर्मचारी हे गणवेश परिधान करून व विद्यार्थी विद्यार्थिनी पण गणवेशात एकामागोमाग एक असे उभे राहून डोळे

मिटून प्रार्थना म्हणत असतात एक महिला पेटी वादन करत असते तर एक पुरुष तबलावादन करत असतो दोन महिला त्यांच्यापुढे डोळे मिटून विद्यार्थ्यांकडे तोंड करून उभ्या असतात तर दोन मुली व दोन मुले यांच्याही पुढे डोळे मिटून प्रार्थना म्हणत असतात हे दृश्य खूपच छान असतं

अबोली आत येऊन एका कोपऱ्यात हात जोडून उभी राहते प्रार्थना संपल्यावर जनगणमन होतं सगळ्यांना सूचना दिली जाते आपल्या वर्गाचा विद्यार्थी विद्यार्थिनी रांगेत हात मागे घेऊन वर्गाकडे वळतात एक एक रांग पुढे सरकत असते एक मध्यम वयाची स्त्री पांढरीशुभ्र साडी डोळ्यावर चष्मा केस व्यवस्थित विंचरलेले चेहऱ्यावर हास्य भाव व कमालीची तेज पुढे येते अबोलीला नमस्कार म्हणते नमस्कार मॅडम मी श्रीमणी जोशी

अबोली: ओ हो नमस्कार मी अबोली

श्रीमणी ऑफिस कडे जाण्याची विनंती करते तेवढ्यात अबोली त्यांना म्हणते आपण ऑफिसमध्ये न जाता मला आश्रम दाखवता का??

श्रीमणी: हो हो काहीच हरकत नाही पण तेवढ्यात नेमाने मॅडम निरोप घेऊन येतात मॅडम अंघोळीचे पाणी काढले आहे

श्रीमणी :- तुम्ही तुमची  आंघोळ आटपून घ्या फ्रेश होऊन आपण ऑफिसमध्ये भेटू अबोली मानेनेच हो म्हणते

अबोली: माझी बॅग

नेमाडे ताई : मी तुमच्या रूममध्ये ठेवली आहे या दाखवते रूम अबोली त्यांच्यामागे जाते एका रुमचं दार उघडून त्या दोघी आत जातात

नेमाडे ताई: ही तुमची रूम बाथरूम आहे काही लागलं तर तिथे बेल आहे ती वाजवा कुणीतरी लगेच येईलच

अबोली: चालेल धन्यवाद

नेमाणे ताईबाहेर गेल्यावर अबोली  दार लावून घेते आणि बेडवर आडवी होती तेव्हा तिच्या लक्षात येतं आई काळजीत असेल फोन नाही केला खिशातून फोन बाहेर काढते तेव्हा तिच्या लक्षात येतं आपण प्रार्थना हॉलमध्ये जाताना फोन सायलेंटवर टाकला होता बारा मिस कॉल ती पटकन आईला कॉल लावते

अबोली: आई सॉरी फोन सायलेंट सायलेंटवर होता ग  मी निट पोहोचले आता आंघोळ वगैरे आटोपते आणि कामाला लागते

आई: - बर काळजी घे आणि रात्री आठवणीने कॉल कर

अबोली: होय काळजी करू नकोस मी रात्री नक्की कॉल करते

अबोली ऑफिसमध्ये फोन करते आणि प्रकाश ला कॉल करून आधीच कादंबरीचे काम कुठपर्यंत आले आहे याचा एक आढावा घेते आणि काही लागलं तर कॉल कर असेही सांगते

खोलीकडे एक नजर लागते एका बाजूला बेड बेडच्या एका बाजूला पंख्याची बटन बेडच्या एका बाजूला छोटे टेबल व खुर्ची त्यावर तांब्या भांडे कागद-पेन पेपरवेट टेबल लॅम्प समोरच्या बाजूला बाथरूम व वॉशरूम दाराच्या बाजूला छोटेसे कपाट एका शोकेस मध्ये वेगवेगळया लेखकांची पुस्तकं शोकेस मध्ये असलेल्या पुस्तकांची यादी व लेखक लेखिकांची नावे लिहिलेली होती दोन व्यवस्थित असलेले आणि पंखा अत्यंत स्वच्छ अस सगळं.

अबोली अंघोळ करून पंजाबी ड्रेस परिधान करून ऑफिसमध्ये येते दाराबाहेर चप्पल काढून आत प्रवेश करते एवढ्यात श्रीमणी या मॅडम स्वागत आहे तुमचं आमच्या आश्रमात.

अबोल खुर्चीवर बसते आणि धन्यवाद म्हणते

आपण आश्रम बघायला सुरुवात करूया का

श्रीमणी: हो हो काहीच हरकत नाही  टॅब काढून तयार होते मी तुम्हाला काही प्रश्न विचारते आणि मग आपण बघायला जाऊ

श्रीमणी : हो काहीच हरकत नाही पण काही प्रश्नांची उत्तरं आश्रम बघताना मिळतील चालेल ना?

अबोली : हो चालेल की

बरं माझा पहिला प्रश्न आश्रम कोणी आणि कधी सुरू केला?

श्रीमणी: हा आश्रम काढण्याची इच्छा माझ्या सासू-सासऱ्यांची होती श्रीमणी एका फोटो कडे बोट दाखवून सांगते

श्री. दत्तात्रय जोशी व सौ . मंगला जोशी खरंतर आमच्या लग्नानंतर चार वर्षांनी हा आश्रम सुरु झाला आमचं लग्न झालं 1996 आणि आश्रम सुरू झाला ३ डिसेंबर 2000 ला वेगळीच कहाणी आहे आमचा संसार सुखाचा चालू होता टूर्स अँड ट्रॅव्हल्स चा बिजनेस त्यावर त्यांचा चांगला जम बसला होता पण काही तरी हवं ना दुःख म्हणून की काय आम्ही दोघं एकदा फिरायला म्हणून बाहेर पडलो आणि आमच्या दोघांचा अपघात झाला त्यात मला जास्त मार लागला आणि डॉक्टरांनी  तेव्हा सांगितलं की यांना यापुढे मुलं होऊ शकणार नाही आमच्या पायाखालची जमीन हादरली मी हॉस्पिटल मधून घरी आले पण मला असं जाणवू दिला नाही की आपल्याला एवढा मोठा दुःख पेलायच आहे घरी आल्यावर सासू-सासरे माझ्याशी पूर्वीपेक्षा प्रेमाने वागू

होते सासुबाई तर बसल्याजागी सगळ आणून देत होत्या सासरे गप्पा मारत होते. सासुबाई , हे , सासरे सगळे गप्पा मारायचे पण कोणीच मुल न होण्याचा विषयही काढत नव्हतं मी हळूहळू रिकव्हर होत होते एकदा आम्ही सगळे रात्री जेवण झाल्यावर अंगणात गप्पा मारत होतो मिच विषय काढला सासूबाई तुम्हाला मला मूल होणार नाही हे माहीत असून तुम्ही सगळे माझ्याशी इतकं प्रेमाने का वागत आहात?

सासरे: अगं सुनबाई बरं झालं तूच विषय काढलास मी हिला आणि श्रीकांतला किती दिवस सांगतोय की आपण सुनबाई शी बोलून घेऊ पण हे हे दोघेही माझं ऐकायला तयार नव्हते अजून ती अशक्त आहे तिला थोडं बरं वाटू दे असंच नेहमी म्हणणं असायचं

श्रीमणी: बोला बाबा काय बोलायचं आहे तुम्हाला

सासरे: हे बघ बेटा आम्हाला तिघांना तुझी खूप काळजी वाटते आता जे झालं ते झालं पण पुढे तर जायलाच हवं अजून तुझ्यापुढे पूर्ण आयुष्य पडला आहे आमचं काय आज आहोत तर उद्या नाही

श्रीमणी: असं काय बोलता बाबा

सासरे: बरं पुढे ऐक आम्ही तिघे बोललो तुझ्याबद्दल आमच्या दोन कल्पना आहेत बघ पडल्या तर पुढे जाऊ नाही पडल्या तर सोडून देऊ

१) आपण तुमच्यासाठी दत्तक मूल घ्यायचं

२) आणि आपण अनाथ मुलांसाठी आश्रम सुरू करायचा तू आणि श्रीकांत विचार करा आणि मला सांगा तुम्ही काहीही निर्णय घेतला तरी आमची दोघांची काही हरकत राहणार नाही आम्ही जे आत्तापर्यंत कमावले ते तुमच्यासाठीच आहे आपल्याकडे घर गाडी शेती पैसा भरपूर आहे तुम्ही जो निर्णय घ्याल तो मान्य करून चांगल्या चार पिढ्या बसून खाऊ इतका आपल्याकडे नक्कीच पैसा आहे.

रात्री झोपताना मी त्यांच्या मनाचा कौल घेतला तर मला जे सांगत होतं ते त्यांच्या मनात आहे हे मला जाणवलं की एका मुलाला दत्तक घेण्यापेक्षा आपण आश्रम सुरू केला तर गावातल्या महिला व पुरुषांना ही कामे मिळतील आणि आपलं पण मन रुळेल सगळं करण्यात तसेच अनाथांना सहारा पण मिळेल तरी हे म्हणाले तू अजून थोडे दिवस विचार कर मी विचार करता करता माहिति गोळा करायला सुरुवात केली सासू-सासरे यांच्याशी आश्रमा बाबत चर्चा करत होते एकीकडे सर्व सर्च करून गावोगाव जाऊन माहिति गोळा करतही होते काही दिवसात आम्ही चौघांनी बसून ठरवले की आपले शेताची जागा आहे तिथे आपण आश्रम सुरु करु शकतो माझे यजमान आधी मुंबईला होते त्यांचा शिक्षण मुंबईत झालं नंतर ते इथे आले त्यांच्या कॉलेजचा एक मित्र आर्किटेक्चर आहे त्याला संपर्क करून आम्ही त्याला सगळी कल्पना दिली ड्रॉईंग मागवून घेतले आम्हाला काय कोठे आहे हे सांगितले काम जोरात चालू होते एकीकडे आश्रमाला लागणाऱ्या सामानाची यादी तयार होत होती तर दुसरीकडे गावातील बहुतांशी लोक आम्हाला यासाठी मदत करीत होते गावातल्या लोकांना रोजगार मिळाला यासाठी ते पण आनंदात होते आम्ही अशा आश्रमांना भेटी देत होतो तेव्हा लक्षात आलं की ती मुलांना त्यांचे पालक असेच सोडून निघून जातात आमच्या आश्रमात काम पूर्ण झालं खरं पण

मुलं कशी येणार हा मोठा प्रश्न होता पण सासऱ्यांनी त्यावर तोडगा काढला कोणत्याही आश्रमातून मुलं आपल्याकडे येता कामा नये आपल्या दारात येतील तिथून सुरुवात करायची आश्रमाचे नाव काय ठेवायचं हा पण प्रश्न होतात ते आम्ही आधीच ठरवलं होतं आकांक्षा आम्हाला आमच्या मुलीचं नाव ठेवायचं होतं पण काय करणार नशीब  आम्ही शेवटी तेच नाव आश्रमाला दिलं आमच्याकडे पहिलीच दोन जुळी मुलं कोणीतरी दारात ठेवून गेले ती तारीख होती 3 डिसेंबर 2000 आणि आमचा आश्रम सुरू झाला.

अबोली:- खुपच छान माहिती दिली तुम्ही या वर्षी २१ वर्ष पूर्ण होतील तुमच्या आश्रमाला अभिनंदन मी भेटू शकते का त्यांना आणि तुमचे यजमान.....

श्रीमणी: नाही सासू सासरे 2004 मध्ये गेले मार्चमध्ये सासरे गेले आणि मे मध्ये सासुबाई गेल्या असं म्हणतात की ज्यांचा एकमेकांवर खूप प्रेम असतं ते वर एकत्र जातात

अबोली: - हो हो आणि यजमान??

श्रीमणी: - यजमान आश्रमाच्या कामानिमित्त पुण्याला गेले आहेत येथील उद्या परवा तेव्हा भेट होईलच

अबोली: निश्चित, आपण आश्रम बघायला सुरुवात करूया??

दोघीजणी आश्रम बघायला सुरुवात करतात आमच्या आश्रमात पहिली ते दहावीचे मुलं शिक्षण घेतात आणि त्या मुलांना आम्ही इतर प्रशिक्षणही देतो जसे भरत काम विणकाम शेतकाम आणि ज्याला जे शिकायचं असेल ते आम्ही इथे शिकवतो बाहेरचे शिक्षक येऊन मुलांना शिकवतात नृत्य चित्रकला याचेही प्रशिक्षण आम्ही देतो मुलांना इथं पंधरा दिवसातून एकदा डॉक्टरांची टीम येते आणि सगळ्या विद्यार्थ्यांची आणि कर्मचारी वर्गाची वैद्यकीय तपासणी होते मुलांना कम्प्युटर ज्ञान आम्ही देतो

अबोली: एकूण विद्यार्थी-विद्यार्थिनी किती आहेत

श्रीमणी: एकूण विद्यार्थी-विद्यार्थिनी पंधराशे आहेत त्यात पहिली ते दहावी आणि त्याहून लहान सगळेच

अबोली : आणि कर्मचारी

श्रीमणी: मी आणि माझे यजमान धरून एकूण 55 जणआहोत कोणी गरजू शिक्षक आले तर आम्ही त्यांना सामावून घेतो त्यात सफाई कामगार दहाजण आहेत सफाई कामगार वर्ग त्यांच्या खोल्या सगळ साफ करतात चार आया आहेत त्या लहान मुलांची देखरेख करतात स्वयंपाकी त्यांच्या हाताखाली काम करणारे आठ जण आहेत बाकी सगळे शिक्षक आणि आम्ही दोघं.

आमच शाळेत सारखं नाही एका वर्गात खूप मुलं आम्ही एका वर्गात तीन इयत्ता पण घेतो शाळेला मान्यता मिळाली आहे आमच्या. एका वर्गात मुली नृत्य करताना दिसतात वर्गात प्रवेश करते अशा सगळ्या मुली गुड

मॉर्निंग टीचर म्हणतात अबोली पण त्यांना प्रतिसाद देते आणि तुम्ही तुमचं चालू ठेवा म्हणते त्या मुली पुन्हा नृत्य चालू करतात तशी अबोली ही त्यांच्याबरोबर ताल धरते थोडं थांबते आणि निघते.

श्रीमणी: तुम्ही तर फार छान नृत्य करता मॅडम

अबोली: हो धन्यवाद पण प्लीज तुम्ही मला मॅडम नका म्हणून मला अबोली म्हणा

श्रीमणी: मग तुम्ही तर मला मॅडम म्हणू नका म्हणून नुसतं श्रीमणी म्हणा

अबोली: श्रीमणी ती थांबते

श्रीमणी : काय झालं अबोली

अबोली : अ काही नाही ग असच

श्रीमणी : बरं!

श्रीमणी : इथे आम्ही मुला-मुलींना कराटेचे प्रशिक्षण देतो सध्या सेल्फ डिफेन्स खूप महत्वाचा आहे ना

अबोली : अरे वा

श्रीमणी: हे आमचं किचन तिथे काही बायका पोळ्या करत असतात तर काही पाणी भरत असतात तर काही भाजी चिरतअसतात तिकडून एक ८ वी/ ९ वी तील मुलगी हातात डिश घेऊन येते आणि म्हणते मोठी आई आज मी गोडाचा शिरा केला खाऊन बघते का ग?

श्रीमणी हातात घेऊन शिरा चाखून बघते छान झालाय ग सुगंधा

श्रीमणी: अबोली मलाही मुलं मोठी आई म्हणतात

अबोली : हो ऐकला मी आत्ताच

श्रीमणी: ही पण कल्पना माझ्या सासूबाईची मला मोठे आई म्हणायचं ह्यांना मोठेबाबा म्हणायचं आणि सासूबाई आणि सासऱ्यांना आजी आजोबा म्हणायचं या सगळ्या महिला आहेत ना त्यांना ही मुलं मावशी म्हणतात आणि पुरुषांना मामा म्हणतात

अबोली : खुपच छान कल्पना आहे

श्रीमणी: चंदा कॉलेजच्या मुलांची तयारी झाली का ग??

चंदा: हो ताई आताच त्यांना डबे  नेऊन दिले मी

श्रीमणी :इथे कॉलेजला जाणारी 16 जण आहेत काही अकरावीत तर काही बारावीत ती सगळी मुलं 2000 सालची आहेत  इथली इथे राहतात मग कॉलेज नाही त्यांना फी माफ केली आहे मग ती मुलं घरी आश्रमात आली की बाकी सगळ्यांना गोष्टी सांगतात काही खेळ घेतात संध्याकाळी कळेलच तुला

आपण आश्रमाच्या आतील बाजू बघितली आता बाहेर जाऊ त्या दोघी बाहेर येतात एका बाजूला दोन शिक्षक विद्यार्थ्यांना शेतीचे काम शिकवत असतात तेवढ्यात मोठी घंटा वाजते

श्रीमणी :- अबोली ही जेवणाची घंटा आहे आपण आज जाऊन जेवू आणि मगच पुढचं सगळं बघू

इथे जेवणाची जागा ठरलेली आहे सगळी मुलं एकाच वेळी जेवायला बसतात चल दाखवते तुला दोघीजणी जेवणाच्या खोलीत जातात मुलं-मुली एका रांगेत हात-पाय धुऊन घातलेल्या सतरंजीवर बसतात मुलं आली पानं वाढली गेली वदनी कवळ घेता हा श्लोक सुरू करतात वाढताना सुद्धा कर्मचाऱ्यांच्या हातात ग्लोज आणि डोक्याला कॅप आहे हे आम्ही नीट बघत असतो

जेवण करताना प्रत्येकाकडे व्यवस्थित लक्ष दिले जाते हे वाढू का ते वाढू का असे विचारले जाते येथे रविवारी मुलं स्वयंपाक करतात मग मुलांनी काही बनवा त्यांचे छोटे छोटे ग्रुप तयार केलेले आहेत येईल त्याने त्या रविवारी स्वयंपाक करून इथं सगळं आवरून ठेवायचं मुलं खूप छान छान पदार्थ बनवतात वेगवेगळे बनवतात त्यांना मजा येते त्याची तयारी आधीपासूनच करतात त्याच्यासाठी त्यांना जे जिन्नस लागतील त्याची लिस्ट ते शुक्रवारी सकाळी नेमाडे मावशींकडे देतात  नेमाडे मावशी त्यांना लागणारे जिन्नस शनिवारी संध्याकाळपर्यंत आणून देतात

रविवारी सकाळी तो ग्रुप सकाळच्या चहापासून रात्री सगळं आवरे पर्यंत सगळं करतो कधीकधी अन्न शिजला आहे की नाही हे त्यांना कळत नाही मग मोठी आई आहेच की असं म्हणत श्रीमणीला हसू येतं

मुलांची जेवण आटोपून सगळे कर्मचारी गोल करून जेवायला बसतात अबोली आपणही त्यांच्यातच जेवायला बसायचं आहे चालेल ना??

अबोली: हो हो अगदी आनंदाने चालेल

श्रीमणी : मुक्ता आज मुलांजवळ कोण आहे?

मुक्ता: ताई आज पाटील काका सोयराबाई आणि सूर्यवंशी भाऊ आहेत मुलांजवळ

श्रीमणी: बरं

श्रीमणी: इथं मुलांचा आता थोडावेळ खेळण्याचा आहे तुम्हाला हवं ते करा त्यांच्यावर तीन जण  लक्ष ठेवतात त्या तीन जणांची जेवण मुलांबरोबर होतात दररोज वेगवेगळे तीन जण असतात काही मुलांना खेळायचा कंटाळा येतो मग हे मुलांना गोष्टी सांगतात काहीतरी शिकवतात कधीतरी त्यांच्यातलेच होऊन खेळतात ही

अबोली: वा छान कल्पना आहे

श्रीमणी : ती सुगंधा आली होती मघाशी शिरा घेऊन तिला शेफ व्हायचा आहे दररोज त्यांना मदत करते आम्ही मुलांना पुढे कसे नेता येईल हे बघतो तिच्यासारखी आवड असणाऱ्या मुलांना आम्ही रेसिपी सारखे कार्यक्रम दाखवतो मग ही मुलं तिकडे येऊन ते करतात

अबोली: बरं माझं जेवण झालेल आहे मी उठू का?

श्रीमणी: अगं किती थोडं जेवलीस तू थोडा शिरा तरी घे

अबोली: नाही नाही नको मला नाही जाणार आता

श्रीमणी: बर ठीक आहे तु ऑफिसमध्ये बस मी येतेच

अबोली: ठीक आहे मला पण दोन-तीन फोन करायचे आहेत ते करून घेते आणि येते

अबोली दोन-तीन जणांशी फोनवर बोलून श्रीमणी च्या ऑफिसमध्ये येऊन बसते.

श्रीमणी च्याऑफिसमध्ये ती निरीक्षण करते. दार उघडल्यावर समोर टेबल-खुर्ची टेबलावर छोटा फ्लॉवर पॉट त्यात ताजी गुलाबाची फुलं पेन पेपर 2/3 फाईल बेल टेलिफोन तांब्या भांडे टेबलासमोर तीन खुर्च्या दारा शेजारी एक सोफा दुसऱ्या बाजूला दोन खुर्च्या  श्रीमणी बसते त्याच्यामागे बक्षीस व प्रमाणपत्र. प्रमाणपत्र ती नीटबघू लागते .

श्रीमणी श्रीकांत जोशी

अबोली मानेनेच स्वतःशी नाही म्हणते. तेवढ्यात श्रीमणी येते.

श्रीमणी :-  झालंय का? जायचं का आपण बाहेर? की तुला आराम करायचा थोडा वेळ  संध्याकाळी दाखवते तुला बाकीचा आश्रम थकली असशील?

अबोली :- नाही नाही आत्ताच बघू आपण आम्ही कधीच थकत नसतो ग आणि पटकन उठून   टॅब घेऊन निघते श्रीमणी  तिला आश्रमाच्या मागच्या बाजूला घेऊन जाते तिथे सगळ्या प्रकारच्या भाज्या लावलेल्या होत्या काही फळझाडे हि होती तिथे काही मुलं-मुली काम करताना श्रीमणी आणि अबोलीला दिसतात.

श्रीमणी :- आम्ही दररोज ताजी भाजी वापरतो जेवणात.

अबोलीने काही फोटो टॅब मध्ये कॅप्चर केले तिथे काम करणाऱ्या एका मुलाने दोन चिकू आणून दिले त्यातला एक अबोलीने घेतला आणि जवळ असलेल्या नळाकडे जाऊ लागली

श्रीमणी :- अगं कुठे चाललीस?

अबोली :- चिकू धुवून येते.

श्रीमणी :- अगं काही गरज नाही त्याची आम्ही फक्त शेणखत वापरतो या झाडांसाठी त्यामुळे तो असा डायरेक्ट झाडावरून काढल्या काढल्या खायचा असतो आणि श्रीमणी चिकूची एक फोन तोंडात टाकते आणि दोघी हसू लागतात ते एक शिपाई सांगत येतो ताई श्रीकांत दादांचा फोन आला आहे तुमच्याशी बोलायचे आहे त्यांना.

श्रीमणी :- बर मी आलेच ह अबोली तोवर तू फिर इथे.

अबोली:- हो चालेल

श्रीमणी :- हॅलो श्री बोल

श्रीकांत :-अगं कुठे होतीस तू कोण आलं आहे आपल्याकडे. शांताराम म्हणत होता कोणत्यातरी ताई आल्या आहेत त्यांना घेऊन शेतात आहेत कोण आहेत त्या काय काम आहे त्यांचं

श्रीमणी:- अरे हो हो किती प्रश्न थांबतो का जरा मला बोलु देतोस का?

श्रीकांत:- ह बोल

श्रीमणी :- अरे मी तुला म्हटलं नव्हतं का एक लेखिका आहेत त्यांच्याशी बोलले त्या येणार आहेत

श्रीकांत :- हो हो विसरलोच मी

श्रीमणी :- त्याच त्या प्रसिद्ध लेखिका आलेल्या आहेत

श्रीकांत :- बरं मग काय म्हणाल्या त्या? त्या आपल्या आश्रमाच्या पुस्तकाचं प्रकाशन करणार आहेत का?

श्रीमणी :- मी अजून त्यांना त्याबद्दल काहीच बोलले नाही आज सकाळी त्या आल्या मुंबईहून आता त्यांना सगळे दाखवते मी आणि मग विषय काढते बर तू कधी यायला निघणार आहेस? तुझं काम झालं का?

श्रीकांत :- माझं थोडं काम अजून बाकी आहे मी उद्या सकाळी पुर्ण होईल उद्या संध्याकाळपर्यंत येतोच मी म्हणजे त्या मॅडमची पण ओळख होईलच

श्रीमणी :- होय  चल बाय काळजी घे

श्रीकांत :- हो बाय

श्रीमणी आश्रमाच्या मागच्या बाजूला येते अबोली त्या मुलांचे फुलांचे भाज्यांचे फोटो काढण्यात दंग असते

अबोली :- माझ्या मनात मघापासून एक प्रश्न रेंगाळत आहे तुम्ही एवढ्या मुलांना सुखसोयी दिल्या आहेत त्यांना दररोज चांगलं जेवण चांगला नाष्टा हे सगळं करायला पैसा तर लागत असेलच ना मग हे सगळं तुम्ही कसं मॅनेज करता?

श्रीमणी :- चांगला आणि मुद्द्याचा प्रश्न विचारलास बघ आम्ही जेव्हा आश्रम स्थापन करायचं ठरवलं तेव्हा पासूनच आम्ही हा विचार केला जितकी शक्य तितकी मदत माझ्या सासऱ्यांनी केली आम्ही अशा लोकांची माहिती गोळा केली की त्यांना मदत करायची आहे उगाच काळा पैसा गुंतवणाऱ्या लोकांची मदत आम्हाला नको होती आमच्याकडे असे देयक आहेत की ते जे कमावतात त्यातील काही रक्कम त्यांच्या पगारातून थेट आमच्या खात्यात जमा होते आणि हो इथून थोडं पुढे गेलं की आमचा छोटा कारखाना आहे तिथे आम्ही गृह उद्योग करणाऱ्या महिलांना एकत्र आणून त्यांच्याकडून पापड लोणची कुरडया पापड्या गोधड्या दिवे कंदील अशा गोष्टी बनवून घेतो आणि बाजारात विकून त्यातून जो नफा येतो तो त्या काम करतात त्यांना आणि उरलेला नफा आश्रमाला जातो थोड्यावेळाने जाऊया आपण तिथे.

अबोली :- बर पण एवढ्यातच भागत का तुमच्या आश्रमाच?

श्रीमणी :-नाही या सगळ्यात आमचं लाईट बिल पाणी बिल भागतं पण खाणं नाही यासाठी आमच्याकडे शहरातले व्यापारी आम्हाला मदत करतात ते आम्हाला पोती पोती धान्य पाठवतात शिक्षणासाठी लागतं ते शाळा मदत करतात काही काही मोठ्या संस्था आम्हाला मदत करतात आणि कधी काही अडचण आली तर सासरे जिंदाबाद त्यांनी काही ठेवी अशा ठेवल्या आहेत की त्याचा उपयोग आम्ही करू शकतो तसं बघायला गेलं तर आमच्या दोघांचा काहीच खर्च नाही आमचं घर पण आम्ही आता या महिलांना राहायला दिलेलं आहे आम्ही तर इथेच राहतो आश्रमात.

अबोली :- मला आज एवढी माहिती मिळाली आहे की यावर एक पुस्तक लिहू शकेन अजून बाकी आहेच म्हणा

श्रीमणी :- आता तू विषय काढला म्हणून सांगते आमच्या दोघांची कल्पना पण तीच आहे खरं तर मी तुला यासाठी  इथं बोलावलं माफ कर मला की मी तुला हे आधी सांगितलं नाही

अबोली :- काही हरकत नाही पण आता मला सांग काय म्हणून मी हे पुस्तक लिहू? मी तर म्हणते तू हे पुस्तक लिहि आणि एखादा प्रकाशक पकडून दे त्याला प्रकाशन करायला

श्रीमणी :- अगं हीच तर गोम आहे मला शब्दरचना करता येत नाही आणि मला अशी व्यक्ती हवी होती जिला मी सगळं नीट सांगून ती ते लिहू शकेल

अजून तुला खूप काही दाखवायचे आहे चल आता आपण जाऊया आता अंधार होत आहे बाकी मी उद्या सकाळी तुला सगळे दाखवीन.

अबोली :- काही हरकत नाही. मला थोडं ऑफिसचं कामही करायचे आहे.

रात्री जेवण झाल्यावर अबोली आईशी बोलून शांत झोपी जाते

सकाळी उठल्यावर अबोली श्रीमणीच्या ऑफिस मध्ये येते

श्रीमणी :- तू आज फार छान दिसतेस

अबोली :- तुझी ही साडी तू मावशी बरोबर पाठवून मला हक्काने नेसायला सांगितली ती जास्त छान आहे

तेवढ्यात गाडीचा हॉर्न वाजतो.

श्री आले वाटतं असा म्हणत श्रीमणी दाराजवळ येऊन बघते श्रीकांत गाडीतून उतरत असतो.

श्रीमणी :- हे आलेच आहेत आता तुमची ओळख होईलच

अबोली :- हो

श्रीकांत दारातून आत येतो

श्रीमणी :- तुम्ही संध्याकाळी येणार होतात लवकर आटपलं का काम

श्रीकांत :- हो

श्रीकांत सोफ्यावर बसतो

श्रीमणी :- मी तुमची ओळख करून देते श्रीमणी अबोली जवळ येते

श्रीमणी :- ही अबोली प्रसिद्ध लेखिका अबोली पटवर्धन.

अबोली उठून मागे वळते आणि नमस्कार हातानेच करते

श्रीकांत पण नमस्कार म्हणतो

आणि दोघांची नजरानजर होते दोघेही  एकमेकांकडे बघून थक्क होतात त्यामुळे फक्त स्मितहास्य करतात

अबोलीच्या  मनात असंख्य प्रश्न असतात दोघांना काय बोलावं हे न कळल्यामुळे

अबोली :- मी जरा माझ्या रूम मध्ये जाते मला 1/2 फोन करायचे आहेत

श्रीमणी :- अगं पण तू म्हणाली होतीस यांना काही प्रश्न विचारायचे आहेत?

अबोली :- हो मी नंतर बोलते ना ते पण प्रवासातून दमून आलेले आहेत ना

असं म्हणून अबोली खोलीत निघून जाते खोलीत आल्यावर ती पाणी पिते आणि बेडवर आडवी होते तिच्या मनात असंख्य प्रश्नांनी गराडा घातलेला असतो इथे कसा? आपल्याला न सांगता मुंबईहून तो इथे आला? इतक्या वर्षानंतर देवाने आपली अशी परत भेट का घडवून दिली? आपल्या आयुष्यात जे घडून गेलं ते आता तो विचारेल का? मुख्य म्हणजे त्याने आपल्याला ओळखलं असेल का? इतकी वर्षात त्याला आपली एकदाही आठवण आली नाही का ?असे असंख्य प्रश्न त्यातच तिला डोळा कधी लागतो ते तिचं तिलाच समजत नाही दारावरची बेल वाजते तशी ती दचकून उठते दार उघडते नेमाडे ताई समोर असतात

नेमाडे ताई :- तुम्हाला ताईंनी ऑफिस मध्ये बोलावले आहे

अबोली :- हो येते.

अस म्हणून अबोली बाथरूम मध्ये जाऊन तोंडावर पाणी मारते साडी नीट करून खाली ऑफिस मध्ये येते.

अबोली :- मला बोलावलं

श्रीमणी :- हो तुझ्याशी थोडं बोलायचं आहे मला

अबोली :- बोल ना

श्रीमणी:- मी तुला काही प्रश्न विचारले तर तुला राग नाही ना येणार?

अबोली :-नाही नाही मुळीच नाही बिनधास्त विचार ?

श्रीमणी :- अगदी पर्सनल सुद्धा?

अबोली :- हो चालेल की?

श्रीमणी :- पहिला प्रश्न तू कोणत्या कॉलेजला होतीस?

अबोली :- N.G. केळकर. कॉलेज ऑफ आर्ट्स

श्रीमणी :- तुझ्या घरी आता कोण कोण आहे?

अबोली :- मी आणि माझी आई

श्रीमणी :- आईचं नाव?

अबोली :- सुलोचना भट

श्रीमणी :- आई भट आणि तू पटवर्धन?

अबोली :- माझं लग्न झालं आणि आडनाव बदललं जस प्रत्येक मुलीच बदल तसंच

श्रीमणी :- मग तुझे यजमान?

अबोली :- त्यांचं पाच वर्षांपूर्वी अपघाती निधन झालं

श्रीमणी :- ओ सो सॉरी

अबोली :- नो इट्स ओके

श्रीमणी :- मूलबाळ

अबोली :- मुलगी आहे ती पाचगणी असते शिकायला इथून तिथे जाणार आहे मी उद्या

श्रीमणी :- एक खर उत्तर देशील?

अबोली :- हो विचार की देते मी खर उत्तर

श्रीमणी :- तू कॉलेजला होतीस त्या कॉलेजमध्ये श्रीकांत जोशी नावाचा मुलगा होता का?
अबोली :- हो होता

अबोलीच्या डोळ्यात टचकन पाणी येते

तू आणि तो आज इतक्या वर्षांनी तुझ्या समोर आला होता ना ?अगं मग त्याच्याशी बोलायचं सोडून तू खोलीत का निघून गेलीस?

मला आत्ताच नाही आमचं लग्न ठरल्यावर यांनी तुझ्या बद्दल सांगितलं होतं आणि बघ इतक्या वर्षांनी आपली भेट होते आहे

अबोली श्रीमणी कडे  बघतच बसते काय बोलते आहे श्री ने हिला सगळ सांगितल

इतक्यात श्रीकांत मागून येतो.

श्रीकांत :- हो मी माझ्या बायकोला सगळं सांगितलं होतं आणि मगाशी इतक्या वर्षांनंतर तू दिसल्यानंतर मला काय बोलावं हे सुचत नव्हतं आणि तू खोलीत निघून गेलीस नंतर आम्ही आमच्या खोलीत गेल्यावर मी हिला आठवण करून दिली ती माझी पहिली मैत्रीण मग तिला सगळ आठवलं .

अबोली त्या दोघांकडे आश्चर्याने बघतच बसली.

श्रीमणी :- बरं तुम्ही गप्पा मारा मी चहा सांगते तुमच्यासाठी अबोली तू चहा घेशील की कॉफी?

श्रीकांत अबोली एकदम बोलतात कॉफी.

श्रीमणी :- बर तुम्ही इथेच गप्पा मारताय का गच्चीत जाऊन गप्पा मारता

श्रीकांत :- गच्चीत चालेल

अबोली फक्त होकारार्थी मान हलवते आणि दोघे गच्चीत जाऊन बसतात

अबोली ला अश्रू अनावर होतात

श्रीकांत :- रडू नकोस अबोली मी जेव्हा शेवटचा पेपर देऊन घरी आलो तर गावा हून   तार आली होती बाबांची तब्येत बिघडल्याची मी तडक निघालो घरी पोहोचल्यावर बघितलं तर बाबांना खूप ताप उलट्या त्यातच माझे काही दिवस केले तुला फोन करून सांगायचं राहूनच गेलं.

काही दिवसांनी आपला रिझल्ट लागला पहिल्या पाच मध्ये येणार हे माहिती होतं मी ही चांगल्या मार्कांनी पास झालो आई-बाबांनी इथेच राहण्याची गळ घातली मी नाही म्हणू शकलो नाही पुढे लग्नाचा विषय निघाला तुला तुझ्या घरी फोन केला होता तीन-चार वेळा. पण प्रत्येक वेळी आईच उचलत होती धीर करून एकदा विचारल .अबोली कुठे आहे?

तेव्हा समजलं की तुझं लग्न झालं आहे.

श्रीकांतला मध्ये तोडत अबोली बोलू लागली प्रशांत पटवर्धन बरोबर माझं लग्न झालं आपण सगळेच शेवटच्या पेपरच्या दिवशी संध्याकाळी सखी च्या घरी भेटणार होतो तिथे तू दिसला नाहीस आम्ही शिऱ्याला विचारल्यावर समजलं तू गावी गेला मी तुझ्या फोनची पत्राची सतत वाट पाहत होते रिझल्ट लागल्यावर चांगली नोकरी मिळाली नोकरी करता करता तीन वर्ष उलटून गेली तू गावाकडचा एक नंबर मला दिला होतास मी तिथे अनेक वेळा फोन केले पण दर वेळेस एकच उत्तर कि निरोप देतो बरेच दिवस गेले आई लग्नासाठी थांबायला तयार नव्हती प्रशांतच चालून आलेल स्थळ चांगलं होतं सरकारी नोकरी स्वतःचं घर कुठलीही जबाबदारी नाही फार नातेवाईक नाही मला पुढे शिकायचं होतं त्याची काहीच हरकत नव्हती आमचं लग्न झालं पुढे मी शिक्षण चालू ठेवलं पुढे हळूहळू लिखाण करायला सुरुवात केली वृत्तपत्र मासिकात लिहित गेले तिथूनच माझ्या लिखाणाची खरी सुरुवात झाली त्या दरम्यान आम्हाला एक गोंडस कन्यारत्न झालं देवयानी हळूहळू देवू मोठी होऊ लागली मला पुढील शिक्षणासाठी युनिव्हर्सिटीतून बोलावण आलं माझं एकच वर्ष बाकी होतं PHD च प्रशांतने त्याच्या ऑफिसमध्ये एक वर्षाची रजा घेतली प्रशांतला माझ्याबरोबर तिथे येणं भाग होतं कारण देवू फार लहान होती तिला माझी आणि प्रशांची दोघांची गरज होती आम्ही दीड वर्ष तिकडे होतो मला फार शिकायला मिळालं तिकडे . तिकडे मी माझं लिखाण करतच राहिले मला PHDमिळाली आमचा visa चा पण संपत आला होता आम्ही इंडिया मध्ये परत आलो मी एका कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून जॉईन झाले देवूला आईकडे ठेवून मी कॉलेजला जात होते सगळ सुरळीत चालू होतं मी लिखाणाच्या मोठमोठ्या स्पर्धांमध्ये भाग घेत होते बक्षीस मिळत होती मला काही जण विचारायला लागले आमचं हे लिखाण कराल का काही जण तर माझी ऑटोबायोग्रफी लिहायची आहे प्लीज लिहून द्याल का वगैर. देवू मोठी होत होती तिला चांगलं शिक्षण मिळावं म्हणून आम्ही तिला पाचगणीला ठेवलं आम्ही दोघांनी तिला भेटायला यायचो अत्यंत समजूतदार मुलगी आहे माझी कधी कुठला हट्ट करत नाही मी लेखिका व्हावी हे प्रशांतच स्वप्न होतं देव कृपेने पैशाची कधीच कमी नव्हती आम्हाला. आम्ही मे महिन्याच्या सुट्टीसाठी देवयानीला आणायला जात असताना घाटात समोरून भरधाव ट्रक आला आणि आमच्या गाडीला धडक दिली आणि त्यातच प्रशांत गेले पाच वर्ष झाली या गोष्टीला त्याची आठवण म्हणून मी भरपूर लिखाण करते त्यातूनच मी आज एक प्रसिद्ध लेखिका आहे देवयानीला मधून मधून मी तिला भेटायला येते कधी एकटी येते कधी आई पण येते माझ्या बरोबर

अशी आहे माझी कहाणी.

श्रीकांत :- तुला कधी माझी आठवण नाही आली?

अबोली :- थोडे दिवस त्रास झाला पण खरंच संसारात पडल्यावर देवयानी झाल्यानंतर नाही आली तुझी आठवण कधीतरी म्हणजे एक जून तुझ्या वाढदिवसाच्या दिवशी आठवण येते हमखास पण मी मन वळवते.

हे सगळं श्रीमणी पण हातात कॉफीचा ट्रे तसाच धरून ऐकत होती हे दोघांच्याही लक्षात आलं नाही.

श्रीमणी :- बरं झालं का तुमचं बोलणं मी कधीच इथेच उभी आहे आणि सॉरी हा मी सगळं ऐकलं बर का तुझं बोलणं

अबोली :- अगं काहीच हरकत नाही मिळाला जे घडलं ते सगळे सांगत होते.

श्रीकांत :- कोणी भेटतं का ग ग्रुप मधलं?

अबोली :- तसं तर कोणी भेटत नाही पण शिऱ्या सखी हे भेटतात त्यांना एक मुलगी आहे आणि मुलगा ही आहे देवयानी एवढाच मुलगा आहे त्यांचा

श्रीकांत :- अग शिऱ्या म्हणजे शिंदे ना सखी म्हणजे जोशी ना मग त्यांना एक मुलगी मुलगा समजलं नाही

अबोली :- अरे लग्न झालं दोघांचं घरातून खूप विरोध झाला पहिल्यांदा पण मी आणि आईने लग्न लावून दिलं दोघांचं पण आता सगळे छान सुरळीत चालू आहे . शिऱ्या महिंद्रा अँड महिंद्रा मध्ये आहे आणि सखी कॉलेज मध्ये प्रोफेसर ते पण सायकोलॉजीची अबोली हसू लागली

श्रीकांत :- तु अजुनही मोठांदा हसतेस अजून तुझी सवय गेली नाही.

अबोली :- मग काय मनातल्या मनात हसू?

दिलखुलास हसावे माणसाने म्हणजे समोरच्याला आपलं दुःख कळत नाही

सगळे कॉफी घेतात

अबोली :- बर आता आपण थोडं आश्रमा बद्दल बोलूया का?

श्रीकांत :- हो हो चालेल ना तुला काही प्रश्न विचारायचे आहेत म्हणे मला?

अबोली :- हो पण आपल्याला ऑफिसमध्ये जावं लागेल माझा टॅब तिथेच आहे मी सगळं त्यावरच नोंदवुन घेतलेलं बरं

अबोली श्रीकांत ला काही प्रश्न विचारते त्याची सविस्तर माहिती घेते.

अबोली :- आता सगळी माहिती मी माझ्याकडे घेतलेली आहे काही आश्रमाचे आणि आजूबाजूचे फोटो घेते अजून. मला उद्या सकाळी निघावे लागेल आपण भेटायचं आहे मुंबईला गेल्यावर लगेच मी कुठे कुठे कशी माहिती पोचवता येईल आणि तुम्हाला त्याचा कसा जास्तीत जास्त फायदा होईल ते बघते पुढच्या वेळेला आपण भेटू तेव्हा सगळं मी सांगेन

रात्री जेवण झाल्यावर अबोली तिच्या रूम मध्ये जाते झोपण्याचा प्रयत्न करूनही तिला खूप वेळ झोप येतच नाही आज सारखी तिला प्रशांतची आठवण येत असते ती उठून बाहेर येते फेऱ्या मारत असते

तेवढ्यात श्रीकांत:- का ग झोपली नाहीस अजून?

अबोली :- नाही आज झोपच येत नाहीये

श्रीकांत :- मग गप्पा मारत बसुया का?

अबोली :- बर

श्रीकांत:- मग तुझ्याच खोलीत बसुया का तू मनात असं काही आणू नकोस तुझ्याबद्दल फक्त आता माझ्या मनात मैत्रीची भावना आहे

अबोली :- अरे नाही नाही माझ्या मनात पण आले नाही असे काही आधी पण आपले मन स्वच्छ होते आता कशाची भीती?

दोघेजण अबोली च्या खोलीत जाऊन गप्पा मारत बसतात पुर्वीच्या कॉलेजच्या गप्पा होता होता एक-दीड कधी वाजून जातो हे त्यांना समजतही नाही अबोली अचानक घड्याळाकडे बघते

अबोली :- बापरे दीड वाजत आलाय मला आता झोपायला हव.उद्या प्रवास करायचा आहे देवयांनी कडे जायचे आहे मी झोपते आता

अबोली उठते आणि झोपायला जाते. श्रीकांत कडे वळून

अबोली :- पुन्हा भेटशील वाटल नव्हत.

आणि गोड स्मित करून गुड नाईट म्हणते.

श्रीकांत गुड नाईट म्हणून त्याच्या खोलीत निघून जातो

सकाळी सहा वाजता उठून साडेसहाला सामान घेऊन अबोली खाली येते

श्रीमणी चहा नाष्टा आणायला सांगते

नाश्ता करता करता

अबोली :- मी निघते आता लवकरच भेटू तुम्ही मुंबईला या मी माझा पत्ता पाठवून ठेवते माझं लिहून पूर्ण झालं की भेट होईलच आपली मी एकदा मेल वर सगळं पाठवते तुला पण आपण कसं करणार आहोत हे मग बोलूच चल नाश्ता झाला की लगेच निघतेच मी

अबोली सगळ्यांचा निरोप घेऊन गाडीपाशी येते श्रीमणी तिच्या हातात एक पिशवी देते देवयानी साठी थोडा खाऊ दिला आहे

तेवढ्यात अबोलीचा फोन वाजतो

अबोली :- हॅलो बाळा मी निघाले आहे येतेच एक दीड तासात .

ती दोन-तीन दिवस देवयानी बरोबर राहून मुंबईला यायला निघते तिच्या आणि श्रीकांत च्या आठवणीत ती रमून जाते. खरचं तिला कधीच तो पुन्हा भेटेल अस वाटलही नव्हत. मुंबईत कधी पोहोचली हे तिचं तिलाच कळत नाही. ऑफिस मध्ये जाऊन आश्रमची माहिती फोटो याचे संकलन करून छान पुस्तक तयार करून ती श्रीमणी ला ते पुस्तक देते.श्रीमणी व श्रीकांत खूप आनंदित होतात. अबोली मुळे आश्रमाला आर्थिक मदत पण मिळते.

श्रीकांत अबोलीशी बोलतो पण ती आता पूर्वीचा कोणताच विषय त्याच्याशी बोलताना काढत नाही. ते आता एक मित्र मॆत्रिण म्हणूनच एकेमेकांकडे बघत असतात.

*****



## सीमोल्लंघन - धनश्री सचिन देसाई

स्वरा आई ने आवाज दिला उठतेस का आज पासून परीक्षा सुरू होतीये, रात्री उशिरापर्यंत अभ्यास केल्यामुळे स्वराला जरा डोळा लागला.

नवरात्र आज पासून सुरू होणार त्यामुळे आई-बाबा पहाटेस लवकर उठून सगळे आवरत होते दर वेळेस असच होतं, नवरात्र आणि सामाही परीक्षा का बर एकदाच येतात एकीकडे अभ्यास आणि दुसरीकडे दांडिया गरबा रास.

स्वरा आता नववीत होती अभ्यास वाढतच होता दिवसं दिवस अभ्यास करुन देखील वेळ पुरतच नव्हता

स्वराssssss आईची हाक कानी आली तशीच वरात ताडकन उठली सगळ आवरून पूर्वतयारीला बसली.

करोना च्या काळामुळे शाळा ऑनलाईनच त्यामुळे मुलांच्या हातात मोबाईल लॅपटॉप हे देणे आलेच तिकडे परीक्षा सुरू झाली आणि घरात आईची नवरात्राची धावपळ त्यामुळे तिला फारसा वेळ मिळत नव्हता स्वरा कडे लक्ष द्यायला.

दोन-तीन पेपर झाले आणि चौथा पेपरच्या दिवशी निम्म्या मुलांची तोंडी परीक्षा झाली आणि निम्म्या ची बाकी होती, पण तेव्हाच व्हाट्सअप वर मेसेज रिंग वाजायला लागले होते, म्हणून स्वराने व्हाट्सअप ओपन करून पाहिले तर त्यात शाळेतल्या मुला मुलींचा ग्रुप तयार केला होता आणि चॅटिंग सुरू होतं त्यात अनेक हुशार मुला मुलींची नावं होती .निरर्थक गप्पा, परीक्षा सोडून तेथे सुरू होत्या.

गप्पा मारणं मैत्री करणं वाईट मुळीच नाही पण केव्हा कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यायचं हे लक्षात आलं पाहिजे.

आई-वडिलांचा खूप विश्वास आपल्या मुलांवर असतो काही जण तर वर्किंग असतात या ऑनलाइन एज्युकेशन सिस्टीम मध्ये मुलांवर कसं लक्ष ठेवणार हा एक मोठा प्रश्न आहे? नुकतीच वयात आलेली ही मुलं यांना पण या गोष्टी लगेच भुरळ पाडणाऱ्या ,एखाद्या विषयाकडे वाहत जाण्यास वेळ लागत नाही मुलांकडे बहाने तर काय तयारच असतात स्टडी ग्रुप आहे चर्चेसाठी तयार केला आईला काय कळतंय, मेमरी फुल;, म्हणून चॅट क्लिअर केला असे एक ना अनेक कारणाने या मुलांकडे तयार असतात. हे वयच नाजूक असतं पंखांमध्ये उडण्यासाठी अजून हवं तेवढं बळ आलेलं नसतं.

पण स्वराने क्षणाचाही विचार न करता ताबडतोब तो ग्रुप लेफ्ट केला होता आणि पेपर झाल्यावर तिने आईला सगळ्या चाट सकट त्या ग्रुप बद्दल सगळं सांगितलं आणि ग्रुप डिलीट केला.

आईचं हृदय भरून पावलं होतं आईच्या डोळ्यात स्वरा बद्दल एक वेगळीच चमक दिसत होती आज पर्यंत जे संस्काराचे बीज तिने पेरलं होतं त्याचे अंकुर तिला तिच्या जाणवत होते आईच्या विश्वासाला म्हणण्यापेक्षा तिने स्वतःला जिंकले होते.

पंधरा सोळा वर्षांची स्वरा तिने पण ग्रुप जॉईन करून चॅटींग केली असती तर कुणाला कळला असतं आणि याच वयात स्वतःला अजमवायचं असतं.

नरत्वं दुर्लभं लोके विद्या तत्र दुर्लभ
शीलच् दुर्लभ तत्र विनस्तत्र दुर्लभः

अर्थात या जगात मनुष्य जन्म मिळणे दुर्लभ आहे ज्ञान मिळणे तर त्याहून दुर्लभ आहे,
चरित्र तर त्याहून दुर्लब आहे
तर नम्रपणे विनय त्याहून दुर्लभ आहे

हे तिला उमगलं होतं, आणि आज खऱ्या अर्थाने स्वराने "सीमोल्लंघन" केलं होतं हे आईच्या डोळ्यात आपसूकच दिसत होतं.

*****



## हृता - अस्मिता

आज मला तोच दिवस आठवतोयं ज्यादिवशी तुला , तुझी आई व मी पहिल्यांदा 'देवी अहिल्याबाई होळकर' अनाथाश्रमात पहायला आलो होतो. तीन साडे तीन वर्षांची असशील, भेदरलेल्या डोळ्यांनी इकडेतिकडे बघत लाईनमधे एका ताईचा हात धरून टुकूटुकू बघत होतीस. तुझ्या आईला एक मिनिटही लागला नाही ओळखायला. तिने सरळ मिठीच मारली तुला. तुला बघताक्षणी तुझ्या प्रतिक्षेत काढलेली प्रदीर्घ वर्षे कुठे गळून पडली काय माहिती , काही आठवेनासं झालं. आईने व मी मिळून केलेले सगळे पेपरवर्क देऊन उरलेल्या औपचारिकता पूर्ण केल्या. आता दोन आठवडे ट्रान्झिशन मधे तुला घेऊन सगळे शहर फिरत तुझे तीन वर्षातले सगळे कौतुक करत फिरत होतो. नाही म्हणायला धाकधूकही होतच होती, तुला फक्त गुजराती यायचं तेही भीत भीत काहीसं अस्पष्ट बोलायचीस. छोटा शब्दकोश ताबडतोब घेऊन टाकला. पण तिथल्या संचालिका मालतीताईंच्या मते दत्तक मुलांपेक्षा आईवडील जास्त घाबरतात. त्यांच्यामते सगळ्यात अशक्त आणि किरकिरे मूल तू होतीस. आता तू थोडीच विश्वास ठेवणारेस, फार फोटोही नाहीत दाखवायला. तिथे तुला सगळे मिनी म्हणायचे , आईला ते नावच वाटले नाही म्हणून तिने 'हृता' निवडले, निवडले काय तिच्यामते तू 'हृता'च होतीच. ईश्वराने दिलेली भेट जी फक्त आमचीच होणार होती. मलाही हे नाव फार आवडले, तू त्याहीपेक्षा जास्त आवडलीस. बोलक्या डोळ्यांनी मला डोळ्यांची भाषा शिकवायला लागलीस. काही आवडलं की डोळे मोठे करायचीस, नाही आवडलं की संशयी नजरेने डोळ्यांच्या कडा दुमडून घ्यायचीस. शेवटी सगळे सोपस्कार पार पाडून , तुला आमचीच करून आपण न्यु यॉर्कला येणाऱ्या विमानात बसलो. थकव्यामुळे तू झोपूनच होतीस आम्ही मात्र नवमातापिता असल्याने आळीपाळीने जणू पहाराच देत होतो.

तू इथे आलीस , तुझ्या घरी... तो दिवस होता बावीस सप्टेंबर, शिशिर ऋतूचा पहिला दिवस. ते पहिले दोन तीन महिने तू अजिबात हट्ट करायची नाहीस, तुला आणलेल्या खेळण्यांशी खेळत काही तरी गुणगुणत असायचीस. मला वाटलं आपली लेक अगदी गुणाची आहे , पण कसंच काय !! जेव्हा आम्ही तुझे हक्काचे आईबाबा आहोत हे तुला लक्षात आलं, तू बालहट्ट सुरू केलेस. खरं सांगु ! जीव भांड्यात पडला , तोपर्यंत काही तरी चुकतयं वाटायचे. हळूहळू तुला थोडं मराठी थोडं, इंग्रजी आलं आणि आपला तिघांचा कौटुंबिक संवाद सुरू झाला. दुसऱ्या मुलांना बघून तू पहिल्यांदा मला" Dad, let's go swing" म्हणालीस, तेव्हा मी आईला

अभिमानाने सांगायला गेलो तर ती चिडवत म्हणाली, "मला 'मॉम कँडी दे' ऐकून पंधरा दिवस झालेत, तू हरलास." तुझी आई पण तुझीच आई आहे, हृते !! तुझं हे मतवादी आणि हटवादी असणं व स्वतःला पटल्याशिवाय एखादी गोष्ट न करनं हे गुण अगदी तंतोतंत तिच्यातून आले आहेत.

शाळेत जाऊन नवीन मित्रमैत्रिणी गोळा करायचा केवढा तो छंद तुझा, पुन्हा जिच्याशी जास्त मेतकूट तिच्या छंदांचा छंद. कधी सोंगट्या गोळा केल्या कधी तू आणि आईने रंगीत दगडं गोळा केले, कधी बाटल्यांची झाकणं गोळा केली , अजूनही असेल एखादे सोफ्याच्या वळकटीत. तू रूळलीस आणि आम्हालाही रूळवलंस !! एकदा तर लांब केसांच्या राजकन्येवरचा सिनेमा बघून केस वाढवायचे ठरवले , रोज चिंचेच्या बोटकांएवढ्या वेण्या घालून शाळेत जायचीस, सकाळी बस पकडायची घाई , माझा टर्न असला की मी घातलेल्या वेण्या तुला पटायच्या नाहीत परत आल्यावर दोन गोट्यांएवढे बुचडे दिसायचे. एकदा तू आणि मी एका दुकानात हिंडत असताना एका लांबकेसांच्या मुलीला बघून मी तिच्या आईलाही बोलून आलो,तिने सुचवलेले तेल शाम्पू काही बाही घेऊन आलो तर दोनच दिवसात आईच्या मागे लागून मासिकात बघितलेली पिक्सी का काय कट करून आलीस. वर मलाच म्हणालीस "बाबुडी , तुझेही केस गळतातच नं, तूच लाव आता ते तेल आणि शाम्पू!" असंच वर्षभर एकॉनॉमिक्स ध्यास घेऊन अचानक ग्राफिक डिझायनिंग मधे जायचे ठरवून मोकळी झालीस, अर्थात मेहनत करायचीस व परिणाम भोगायची तयारीही दाखवाचीस म्हणून खूप वाद व्हावेत असं काही घडलंच नाही.

आईचा व्यवसाय वाढायला लागला तसे मी माझ्या कामाचे तास कमी केले , तुझ्या टीनेज वयात तुझ्यासाठी वेळ द्यायचा असं आम्ही दोघांनी ठरवलं होतं. ते तुझं रनिंग , track practices साठी होणारी पळापळ म्हणजे तू तर धावायचीस, पण पळवायचीस आम्हाला !! बघता बघता उत्तम मार्क घेऊन कॉलेजला निघूनही गेलीस, स्वतःचे सगळे स्वतः करायचा तुझा कल होताच ,आता तर पंखातही बळ यायला लागलं होतं. मगं बऱ्याच ठिकाणी स्वयंसेवक होऊन दर शनिवारी, रविवारी फॉस्टर केअरला जायचीस. आईला वाटायचं तू स्वतःचं कनेक्शन शोधतेयंस , कदाचित तू भारतात जाऊन खरे आईवडीलही शोधशील. मला काही तसे वाटले नाही पण या वयात काय सांगता येते असे तिने म्हटल्यावर माझ्याकडे

काही उत्तर नसायचं. नवीन जॉब लागल्यावर तू हे वेळेअभावी बंद करशील वाटलं होतं.दर शनिवारी धावतपळत फोन करायचीस ते तेवढं एक समाधान. एकेदिवशी बुधवारी तुझा फोन आला तर आम्ही घाबरलो चक्क ! तेव्हा तू अपघातात गेलेल्या एका स्त्रीबद्दल आम्हाला सांगितले, किती दुर्दैवी खरंच. तिची मुलगी अशीच दोन अडीच वर्षाची तुमच्या फॉस्टर मधे आली आहे हे सांगताना तुझा आवाज थरथरत होता. तुला आईने समजावून कसेबसे शांत केले. काही प्रश्नांची उत्तरं नसतात आपल्यापाशी शोधावी लागतात, नाही तर आहे त्यालाच आयुष्य समजून पुढे जावे लागते.

रोजच फोन करायला लागलीस मगं, एवढी हळवी तू कधी झाली नव्हतीस. एकेदिवशी सरळ त्या अनाथ मुलीला दत्तक घेण्याचा विचार तू बोलून दाखवलास, त्या संस्थेत इतकी वर्षे स्वयंसेवक म्हणून काम केल्याने व आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याने ती लोकं तुला प्राधान्य देणार होती. आईला हे अजिबात पटले नाही कारण तू एकटी हे मूल कसे वाढवणार तेही वेगळ्या वंशाचं , तुझ्या भावी आयुष्यात याने अडचणी येतील , तुझे लग्न कसे होणार ना ना चिंता तिला भेडसावत होत्या. शिवाय तुझ्या आईचे शरीर मायटोकॉन्ड्रिअल डिसॉर्डरमुळे गर्भधारणेसाठी सक्षम नव्हते, पण तुला असा कसलाही त्रास नव्हता मगं हे पाऊल तू का उचलावेस हे तिला स्त्री म्हणून लक्षात येत नव्हते. मलाही तिचं म्हणणं पटत होतं तरी तुझंही चूक वाटत नव्हतं. पण तुझी तळमळ इतकी खरी होती नं ह्रते की नाही म्हणायला जीवावर आलं गं ! तू आम्हाला पटवून देत होतीस, दर शनिवार रविवार त्या मुलीसोबत तिची आई बनण्याचा प्रयत्न करत होतीस. किती धावपळ झाली तुझी, शेवटी तुझे समर्पण बघून मी व आईने तुझ्या निर्णयात साथ द्यायची ठरवली. कारण तुझ्या मते सर्व प्रकारची कुटुंबं असतात, लग्न जेव्हा होईल तेव्हा होईल मुल आधी असले तरी काय हरकत आहे. तीच आणि तशीच क्रमिकता असली पाहिजे असे थोडीच आहे, प्रेमाने माणूस समृध्द होतो, समाजातील नियमांनी नाही. कधीकधी आयुष्य असे प्रश्न निर्माण करते की उत्तर बाहेर शोधण्यापेक्षा आपणच उत्तर होऊन जायचे. हे ऐकून खरोखरच जाणवलं की हे तुझे Passion नाही तर कॉलिंग होते. तुझ्यामुळे आमच्या आयुष्याचे रंगहीन इंद्रधनू चैतन्याच्या विविध रंगांनी उजळून निघाले. आता तशाच चैतन्याचा झरा तुलाही हवा आहे, यात त्या अनाथमुलीबद्दल असलेल्या सहानुभुती ऐवजी तुझी आई होण्याची इच्छा व समर्पण अधिक दिसले आणि पुन्हा

**तूच आम्हाला तुझ्या नवीन जबाबदारी च्या जाणीवेत, नव्या जीवनपद्धतीत व नव्या विचारसरणीत रूळवलेस.**

**आज तू पहिल्यांदा तुझ्या लेकीला , आमच्या नातीला 'ऑटमला' घेऊन येणारेस. मी तर रोजचाच पण चमचमीत स्वयंपाक करून ठेवलाय, तुझ्या आवडीची बासुंदी केलीये पण ऑटमला भारतीय जेवण आवडेल नं आवडेल म्हणून आईनेही नवीन प्रकारचा पास्ता केलाय. आता ऑटमने पास्ताच खाल्ला तर आई पुन्हा एकदा जिंकणार आणि तुम्ही दोघीही जेवलात की मी तृप्त होणार. हा चैतन्याचा सोहळा आहे, सोहळ्यात आपली माणसं लागतातच गं , योगायोग बघ, तूही ऑटमच्या पहिल्या दिवशी इथे तुझ्या घरी आलीस, नव्या ऋतुला घेऊन ... आयुष्याचा ऋतू, रंगांचा ऋतू, नव्या बदलाचा व सृजनाच्या सोहळ्याचा ऋतू !!!**

*********



## प्यारवाली लव्हस्टोरी - अक्षय दुधाळ

ही गोष्ट आहे इशाची. इशा कशी दिसते किंवा कशी आहे हे तुम्हाला हळूहळू कळेलच थोडक्यात सांगायचं तर ती एक टिपिकल मुंबई गर्ल होती आणि ही तिची प्यार वाली लव्हस्टोरी सिंपल आहे पण हटके आहे.

जय एक अप्पर मिडल क्लास मधील मुलगा. उंचापुरा गोरा रंग आणि कुरळे केस. कोणीही बघताच प्रेमात पडेल असं रूप होतं त्याचं. इशाला तो दोन वर्ष सिनिअर होता. कॉलेजच्या एका इव्हेंट ला त्यांची ओळख झाली आणि मैत्री आणि पुढे जाऊन मैत्री झाली. आज जयचा सेंड ऑफ होता आणि त्या नंतरच ते दोघे भेटणार होते. तो कधीचा आला होता पण नेहमी प्रमाणे इशाला उशीर झालेला, जय चिडला असेल पण इशा मनवेल त्याला.

"हाय आज पुन्हा एकदा लवकर आलात मॅडम",जय

" हा मग इशा अल्वेज इन टाइम ", ईशा

"सो हाउ वाज फंक्शन सेरेमनी"ईशा

"कूल" जय

सो व्हॉट यु डीसाईड अबाऊट फरदर जॉब करतोयस की समथिनग एल्स ",मी

"बिझनेस" जय

"म्हणजे आता आपलं भेटणं बंद बरोबर ना ??"ईशा

" नाही रे भेटू ना आपण, वेळ मिळेल तसं वेळ काढू आणि व्हाट्सअप आहेच की आपलं", जय

"म्हणजे तुझ्या इच्छेनुसार असाच ना" ईशा

" नाही ग राणी तुला वाटेल तेव्हा तूझी इच्छा असेल तेव्हा भेटू बस ",जय

"हा चल बस कर नौटंकी पार्टी दे आता मला इंजिनिअरिंग झाल्याची",ईशा

"ऍट युर सर्व्हिस मॅम आप खिदमत में बंदा हाजिर है",जय

"हो का चल ", ईशा

कॉलेज सुरू होतं तेव्हा सगळं व्यवस्थित होतं. रोज भेटणं बोलणं एकत्र प्रेमाचे क्षण घालवणे सगळं कसं सुरळीत चालू होतं. परफेक्ट हॅपी कपल पण म्हणतात ना प्रेमाची किंमत लॉंग डिस्टन्स मधेच करते असंच काहीसं झालंय त्यांच्यात. ईशाला डान्स खूप आवडायचा तिला अगदी त्यात करिअर वगैरे करायचं होतं. पण संधी मिळत नव्हती खूप ऑडिशन दिल्या पण पदरी अपयश. असंच एक दिवस टीव्ही बघत असताना ऍड लागली. नवीन रिऍलिटी शो येतोय डान्सचा, तिचे डोळे एकदम टीव्हीकडे फिरले. सगळी कामे बाजूला टाकून तिकडे लक्ष गेले. मन धडधडत होतं. समोर एक संधी दिसत होती. पण तिचा मूड ऑफ व्हायला जास्त वेळ नाही लागला. अँकर बडबडत होता सो फ्रेंड्स रेडी रहा तुमच्या पार्टनर सोबत घेऊन येत आहोत तुमच्यासाठी तुमच्या शहरात नवाकोरा डान्स रिअलिटी शो "डबल धमाल" असेल

कमाल तर करा धमाल. ऑडिशन डिटेल्स आर इन युवर टीव्ही स्क्रीन. ईशाला सगळा फ्लॅश बॅक आठवत होता. कानात हेडफोन घालून रूम मध्ये एकटीच नाचायची.आज पुन्हा एकदा तिच्याकडे संधी चालून आलेली. मनात कुठेतरी वाटत होतं काश जय को डान्स आता. पण नाही ते चान्सेस काही नशिबात नव्हते. मनात विचारांचं काहूर माजलं असताना फोनची रिंग वाजली. जय कॉलिंगsss

हाय डियर ऐक उद्या सकाळी नेहमीच्या ठिकाणी भेट खूप महत्त्वाचं बोलायचं आहे दहा वाजता बी ऑन  टाईम गडबड आहे लव यू अंड बाय, काही बोलायच्या आतच  जयने फोन कट केला

आज खुप दिवसानी ती जयला भेटणार होती. तिला त्याच्या साठी स्पेशल दिसायचं होतं. फिक्कट पिवळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस त्यावर मोरपंखी रंगाची ओढणी, मॅचिंग कानातले उजव्या हातात त्याने गिफ्ट दिलेलं घड्याळ आणि ओठावर फिकट गुलाबी रंगाची लिपस्टिक, अशी काहीशी तयार होऊन ती ठरलेल्या ठिकाणी पोचली. हीअर ही गोज जय बाईक शिव येत होता. Pulser 220nस, ब्ल्यू जीन्स डार्क पिंक कलरचा टी-शर्ट, डोळ्यावरती Raybean गॉगल आणि स्पार्क्सचे शूज पण आज तो एकटा आला नव्हता. थोडेसे कुरळे स्पार्कल केस कानात बाली, लूज व्हाईट टीशर्ट ब्ल्यू जीन्स हातात मन्या मन्याचं ब्रेसलेट, डाव्या हातात फास्टट्रॅकचं वॉच पाच फूट आठ इंच उंची कोण होता तो?

हाय, जय

हाय, इशा त्याच्याकडे चेहऱ्यावर प्रश्नार्थक भाव ठेवत बघत होती

Oopes मी विसरलोच तुमची ओळख करून द्यायची इशा मीट माय बेस्ट फ्रेंड शिव, आणि शिव ही इशा

हाय, शिव

हाय, इशा

मला माहिती आहे तुला खूप कन्फ्युजन झाला असेल, पण अजून कन्फ्युजन वाढायच्या आधी सांगतो. हा शिव माझा फ्रेंड आहे आणि ह्याला पण डान्स आवडतो आणि तो कोणता तरी नवीन शो आला आहे ना त्यात जोडी लागणार आहे, सो मला असं वाटतंय, म्हणजे तुला चालणार असेल तर तुम्ही दोघांनी मिळून ह्यात पार्टिसिपेट करावं, जय

मी सांगते तुला आपण बोलू यावर मला उशीर होतोय बाय बाय शिव नाईस टू मीट यू बाय, इशा

ओके बाय पण सांग काय ते मला बाय लव यू , जय

सेम नियर बाय, शिव

काय चाललं चाललं होतं हे तिचं तिला कळत नव्हतं.शिव, ही इज सो क्युट and हँडसम तिला तेच तेच आठवत होता त्याने केलेला शेक हॅन्ड, त्याची ती चार्मिंग स्माईल लव्ह अट फर्स्ट साईट म्हणतात ते हेच का, जय सोबत लास्ट टू इयर पासून जे होतं ते काय होतं? जर ते अट्रॅक्शन होतं तर कशावरून हे पण atracton नसेल. आणखी एका वर्षाने मला दुसरा कोणीतरी आवडेल सो शेम ऑन मी तिला काहीच कळत नव्हतं. ती टोटली कन्फ्युज झाली होती तेवढ्यात फोन वाजला जय कॉलिंगsss

हॅलो काय ठरवलेस, जय

कशाचं, इशा

डान्स कॉम्पिटिशनचं, कमॉन यार इट्स युवर ड्रीम, जय

हो पण आर यु शुअर अबाउट शिव, तुला चालेल मी त्याच्यासोबत डान्स केलेला

तू कर त्याच्या सोबत परफॉर्म चांगला डान्सर आहे माझ्या शेजारीच राहतो लहानपणापासून ओळखतो मी त्याला, जय

ओके देन आपण उद्यापासून रिहर्सल ला सुरुवात करू, इशा

आपण नाही तुम्ही मी उद्यापासून 1 मंथ साठी बिजनेस टूरवर जातोय, जय

व्हाट द हेल तू नसणार आहेस, मी नाही जाणार रिहर्सल अँड ऑल ला, इशा

असं काय करते राणी जा आणि दे ऑडिशन माय वेल विशेष ऑल्वेज विथ यु, जय

जाणं गरजेच आहे का?, इशा

हो रे जावं लागेल बट ऑल द बेस्ट अँड लव यू, जय

लव यु टू बाय, इशा

बाय आय सेंड यू शिव नंबर, जय

काय करू मेसेज करू का त्याला की नको तिच्या विचारात असताना तिच्या मोबाईल ला मेसेज आला

हाय शिव हिअर, शिव

खूप वेळ रिप्लाय न आल्याने शिव ने पुन्हा मेसेज केला

हे आर यु देअर, शिव

हाय, इशा

सो काय ठरवलंय तुम्ही आपण जातोय ना कॉम्पिटिशनला, शिव

Hmmm, इशा

ओके देन आपण उद्यापासून रिहर्सल ला सुरवात करू, शिव

ओके चालेल पण कुठे, इशा

तुझ्या घरा पासून जवळ माझ्या मित्राची एक डान्स अकादमी आहे तिथेच करू तू 10 वाजता भेट, शिव

ओके डन, इशा

आनंदात मित्र आठवो व न आठवो पण प्रॉब्लेम आला की मित्राची बरोबर आठवण येते. इशाला पण अली, प्रीतीची

प्रीती इशाची लहान पणापासूनची मैत्रीण. कोणत्याही प्रॉब्लेम वर तिच्या कडे सोल्युशन होतं. इशाने तिला कॉल केला

हाय डार्लिंग, प्रीती

घरी ये जान पटकन लोच्या झालाय एक, इशा

फोन कट केल्यानंतर बरोबर 15 मिनिटात प्रीती हातात एक थैली घेऊन ओरडतच आत आली

काय गं डुचके तुला काय फक्त प्रॉब्लेम आल्यावरच मी आठवते का ?, प्रीती

तसं नाही गं बर ते जाऊदे मी काय सांगतेय ते ऐक, इशा

वेट आधी मी खायला आणलंय ते ओव्हन मध्ये गरम करून आण आणि येताना कॉफी पण घेऊन ये, प्रीती.

प्रितीने आणलेलं त्यांचं ऑल टाइम फेवरेट macc aloo tikki विथ चीज बर्गर ओव्हन मध्ये गरम करून प्लेट मध्ये काढून सोबत कॉफी चे दोन मग घेऊन इशा आली

बर्गर खात इशाने जय पासून शिव पर्यंतची सगळी स्टोरी डिटेल मध्ये सांगितली.

हम्म, तो ये बात है, प्रीती

हो आणि आता मला कळत नाहीये काय करायचं ते, इशा

ओके तू डान्स प्रॅक्टिस सुरू कर वेळ जाईल तसं हळुहळू एकेक कोडं सुटत जाईल, प्रीती

ओ मिस सायकॉलॉजी स्टुडंन्ट, मी काय बोलतेय आणि तुझं काय चाललंय, इशा

ऐक माझं आता हो बोललीयस तर जा प्रॅक्टिस ला बाकी विचार नको करू होईल सगळं चांगलं, ऑल द बेस्ट, प्रीती

ओके ठिकाय, इशा

आणि कळव मला काय होतंय ते, प्रीती

Hmm, इशा

कधी आहे ऑडिशन, प्रीती

फ्रायडे ला, इशा

म्हणजे तीन दिवसांनी, प्रीती

हो, इशा

ओके जमके प्रॅक्टिस कर इस बार सिलेक्शन होणा चाहीये, ऑल द बेस्ट डार्लिंग, प्रीती

थँक्स डिअर, इशा
चल पळते मी मला अपडेट देत रहा, बाssssय, प्रीती
बरं वाटलं तुझ्याशी बोलून, बाssssय, इशा
प्रीती म्हणतेय ते इशाला पटत होतं. उगाच मनात किंतू आणण्यापेक्षा सध्या डान्स वर लक्ष केंद्रित करू. तिने घरी ऑडिशन बद्दल सांगितलं. नाही नको काय गरज आहे म्हणत त्यांनीही परवानगी दिली. दुसऱ्या दिवशी ती ठरल्या प्रमाणे स्टुडिओ ला पोचली. शिव ऑलरेडी तिथे पोचला होता. हाय हॅलो मध्ये वेळ न घालवता त्यानी बेसिक वॉर्म ला सुरवात केली.
1 2 3 4 काउन्ट वरती ते थिरकत होते 5 6 7 8 ला रिटर्न साधारण 10 मिनिट्स बेसिक वॉर्म झाल्यावर त्यांनी ब्रेक घेतला.
शिव ने तिला वॉटर बॉटल दिली
थँक्स, इशा
आपल्याला एक ट्रॅक ठरवून त्यानुसार प्रॅक्टिस केली पाहिजे आपल्याकडे वेळ खूप कमी आहे, शिव
हम्म, मला ही असंच वाटतंय, इशा
तुमच्याकडे आहेत का ट्रॅक, इशा
प्लिज तुम्ही वगैरे नको आपण डान्स पार्टनर आहोत केमिस्ट्री जुळली पाहिजे, तूच म्हण, शिव
ओके आहेत का ट्रॅक तुझ्याकडे, इशा
साऊंड्स गुड, हो आहेत, शिव
पुढे 15 मिनिट्स वेगवेगळे ट्रॅक ऐकण्यात गेले. त्यातूनच एक ट्रॅक सिलेक्ट करून त्यांनी प्रॅक्टिस सुरू केली.
आजचा दिवस खूप स्पेशल होता इशासाठी, पहिल्यांदा तिने जय सोडून कोणत्या तरी दुसऱ्या मुला सोबत दिवस घालवलेला. इशाने प्रीतीला फोन करून आज काय घडलं ते सगळं सांगितलं त्यावर प्रितीने फक्त ठिकाय म्हणून फोन ठेऊन दिला. प्रीतीच्या अश्या वागण्याचा राग आलेला पण आज ती भलतीच खूष होती. थोडा वेळ जयशी बोलून ती झोपी गेली.
पुढचे दोन दिवस प्रॅक्टिस मध्ये भुर्रकन उडून गेले. कमी झोप आणि जास्त प्रॅक्टिस करून फक्त दोन दिवसात त्यांनी डान्स बसवला होता. बघता बघता ऑडिशन चा दिवस उगवला. आज सकाळी सकाळीच प्रीती इशाच्या घरी आलेली. मम्मीने हातावर दिलेलं दहीसाखर खात इशा प्रीतीला म्हणाली, चल निघुया पटकन खूप उशीर झालाय.
ओये मिस मी काकुकडे आलीय जेवण बनवायला शिकायला, तू जा ऑल द बेस्ट, प्रीती
यू आर जस्ट इम्पोसीबील, ओके बाय निघते मी, इशा

बाय डार्लिंग ऑल द बेस्ट किल इट, प्रीती
थँक्स डिअर, इशा
इशा ऑडिशन च्या ठिकाणी पोचली. शिव ऑलरेडी गेटवर येऊन उभा होता. ठरल्या प्रमाणे तो costume सोबत घेऊन आला होता. इशा ते घेऊन पटकन चेंजिग रूम मध्ये चेंज करायला गेली. ती येईपर्यंत शिव ने फॉर्म भरून ठेवला
2 वाजेपर्यंत नंबर येईल आपला, शिव
हम्म, इशा
नर्व्हस?, शिव
हो, पहिल्यांदा एवढी मोठी ऑडिशन देतीय, टेन्शन तर येणारच, इशा
ओके रिलॅक्स, काही खाणार, शिव
नको ऑडिशन नंतर खाऊ आता नको प्लिज, इशा
बिस्कीट खायला प्रॉब्लेम नसेल, शिव बॅगेतलं बिस्कीट काढून तिच्या समोर धरत म्हणाला
तिनेही हसत त्यातली दोन तीन बिस्किटे खाल्ली.
ऑडिशन त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त चांगली झाली. जजेसनी दोघांचं खूप कौतुक केलं. केवळ दोन दिवसात हा डान्स बसवलाय ह्यावर त्यांचा विश्वास बसत न्हवता. दोघांची केमिस्ट्री जजेस ना खूप आवडली आणि परिणामी दोघे नेक्स्ट राऊंड साठी सिलेक्ट झाले. त्यांची मेहनत आता फळाला आली होती. हो पण एवढ्याने हुरळून जाऊन त्यांना चालणार नव्हतं. त्यांना लांबचा म्हणजे ग्रँड फिनले पर्यंत चा प्रवास गाठायचा होता. त्यासाठी ते जोरदार मेहनत करत होते. मेहनतीचे फळ म्हणून ते एकेक राऊंड पुढे जात होते. त्या दोघांची मैत्री पण आता खुलत चालली होती. शिव पटकन स्टेप शिकायचा आणि मग तिलाही शिकवायचा. तिला तर जणू जगाचा विसरच पडला होता. सेमिफायनल राउंडला त्यांना एक रोमँटिक गाणं मिळालेलं. खूप इंटन्स कोरिओग्राफी होती ती. एक्सप्रेशन डान्स moves सगळंच स्मूथ होतं त्यात. असाच एक स्टेप करताना ती 1 2 3 4 ला हात पकडून पुढे जाणार आणि 5 6 7 8 ला गिरकी घेत त्याच्या मिठीत येणार. पहिल्यांदाच असं काहीसं ते अनुभवत होते. दोघेही एकमेकांच्या डोळ्यात बुडाले होते. ओठ ओठांजवळ सरकत होते पण अचानक विजेचा झटका बसावा तसं दोघांच्या लक्षात आलं आणि ते झटकन वेगळे झाले. दोघाणीही त्यावर न बोलता पुन्हा प्रॅक्टिस सुरू ठेवली.ह्यानंतर शिवच्या मनात ही फिलिंगस जाग्या झाल्या. त्याच्या प्रत्येक स्पर्शात तीला ते जाणवत होतं. फायनली तो दिवस आला. सेमिफायनल बघायला जय आणि प्रीती दोघेही आलेले. त्या एपिसोड मध्ये शिव आणि इशा परफॉर्मर ऑफ द वीक ठरून फायनलमध्ये पोचले. इशा आणि शिव आता सेलिब्रिटी झालेले. इशाचं स्वप्न जवळपास पूर्ण झालेलं. शिव आणि ती आज पहिल्यांदाच घरी आलेले. त्यात त्यांचं जंगी स्वागत झालं.

आणि मग दोघेही आपापल्या घरी गेले. आजचा दिवस आराम करून उद्या पासून ते पुन्हा रविवारी होणाऱ्या ग्रँड फिनालेच्या परफॉर्मन्स च्या तयारीला जाणार होते. जय ने फोन करून तिचं मन भरून कौतुक करत होता. पण तीने थकलीय म्हणत फोन ठेवला. तिला राहून राहून शिव ची आठवण येत होती. म्हणतात ना खाली दिमाग शैतान का घर. असंच झालं होतं तिचं. तिने प्रीतीला फोन केला आणि पुढच्या काही मिनिटात प्रीती वडापाव आणि फंटा घेऊन इशाच्या घरी आली. इथे वेळ काय आणि हे बावळट करतंय काय असं मनातल्या मनात म्हणत इशाने प्रीतीला तिच्या मनाच्या होणाऱ्या घालमेली बद्दल सगळं सांगितलं. सगळं शांतपणे ऐकून घेऊन प्रीती किचन मध्ये गेली आणि दोन ग्लास घेऊन आली त्यात दोघीसाठी फंटा ओतला. इशा वैतागून काही बोलणार इतक्यात तिला थांबवत

आर यू इन लव विथ शिव, प्रीती

हा काय प्रश्न आहे, इशा

हो की नाही, प्रीती

माहीत नाही म्हणजे जय, इशा पुढे बोलणार तेवढ्यात प्रीती म्हणाली

हे बघ जिथपर्यंत मला माहिती आहे, जय ने तुला कधीच प्रो केलं नाहीये. त्याने जस्ट फ्रेंडशिप विचारला आणि तुम्ही त्यानंतर एकमेकांना डेट करू लागला. हे प्रेम नाहीये डॅमीट, प्रीती

बावळट काय बदबडतेयस तुझं तुला तरी कळतंय का? इथे मी जय ला फसवतेय असं वाटून मला गिल्ट आलंय आणि तुझं काय मध्येच. त्याच्यामुळे मी आज फायनलला पोचतेय आणि शी काय होतंय हे, इशा

कूल, बघ उद्या जाऊन हा प्रश्न पुन्हा येणारच आहे. उद्या काहीतरी प्रॉब्लेम होण्यापेक्षा आज आर या पार करून टाक, प्रीती

मला जयला फसवायला नाही जमणार, इशा

बघ तुझ्या हातात तीन आयुष्य आहेत. शिव त्याच्या मित्राला काहीही झालं तरी फसवणार नाही कारण त्याला फसवायचं असतं तर एवढ्या दिवसात सहज शक्य होतं. जय चा काही प्रश्न नाही म्हणजे राहिली तूच आता तूच ठरव काय करायचंय ते, प्रीती

एकदा फायनल झाली की परत शिव ला भेटणारच नाही म्हणजे हा विषय संपेल, इशा

भेट तर होईल आणि शोज साठी एकत्र पण यावं लागेल भविष्यात तुम्हाला, तू आता योग्य वेळी योग्य निर्णय घे, प्रीती.

एवढं बोलून प्रीती निघून गेली. ऑडिशन पासूनचं इशाला सगळं आता फ्लॅशबॅक सारख तिला आठवत होतं. इशा आणि शिव ने एकत्र स्पेण्ड केलेला टाइम, त्याचा फस्ट टच. तो तिला इशू म्हणायचा. तिला ते जाम क्युट वाटू लागलेलं. जय तिला कधीच असं काही म्हणाला न्हवता.

नकळत तिचं मन कंम्पेअर करू लागला होतं दोघांना. विचारांच्या तंद्रीत तिला कधी झोप लागली कळलेच नाही

शेवटी इशाने कधीच एक्सपेक्ट केलं नव्हतं ते झालं. शिव आणि इशा डबल धमाल ची ट्रॉफी जिंकले. अनबिलिवेबल मोमेंट होती ती दोघीसाठीही. इशाच्या डोळ्यातून पाणी येत होतं. विजेत्या जोडीचं नाव अनौन्स करताच शिव ने इशा ला मिठी मारली. कितीतरी वेळ दोघे एकमेकांच्या मिठीत होते. त्या फायनल नंतर इशा आणि शिव दोघांनीही एकमेकांशी कॉन्टॅक्ट बंद केला. ठरवून किंवा बोलून नाही न बोलता. दोघांनीही परस्पर ठरवलं. जयचं भेटणं पण कमी झालेलं. क्लाइंट इशू सांगून सतत बिझी असायचा. एक दिवस अचानक जय ने इशाला फोन करून अर्जंट भेटायला बोलवलं. भेटल्यावर बोलू म्हणून त्याने फोन कट केला आणि ऍड्रेस टेक्स्ट केला.

फायनल नंतर आजच ती बाहेर पडली होती. पत्ता bandstand चा असल्याने तिला फार शोधावा लागला नाही. जय आणि ती नेहमी इथेच भेटायचे. साधारण तासाभराचा प्रवास करून ती तिथे पोहचली. ती ठरल्याप्रमाणे वरती फोर्ट वर जाऊन उभी राहिली. समोर वरळी सी लिंक, त्यावरून धावणाऱ्या गाड्या खाली समुद्र आणि संध्याकाळ असल्याने किंचित गार वारा. सूर्य मावळतीला झुकलेला. रोमँटिक वातावरण होतं. ती तिच्या विचारात गुंग असताना अचानक पाठून आवाज आला,

बार बार दिन ये आये बार बार दिल ये गाये तू जिये हजारो साल ये मेरी है आरजू
हैप्पी बर्थडे टू यू  हैप्पी बर्थडे टू डिअर इशा

इशा आज तिचाच बड्डे विसरली होती. जय ने आणलेला केक तिने कापला. जायला भरवला. जय नेही तिला भरवला.इशा ला सरप्राईज द्यायला शिव आणि प्रीती पण आलेले. हा सगळा प्लॅन शिव नेच केलेला. हीच वेळ होती जयला तिच्या शिव बद्दलच्या फिलिंग्स जय ला सांगायची. ती जयला हे सांगणार एवढ्यात जय म्हणला वेट मला तुला काहीतरी सांगायचंय असं म्हणत त्याने खिशातून रिंग काढली गुडघ्यावर बसला आणि म्हणाला

आपण एवढे वर्ष एकत्र फिरतोय. Now we are good friends. Its time to move forward. Lets get married? विल यू मॅरी विथ मी? , जय

प्रितीने बरोबर नोट केलं होतं जय, इशा

काय नोट केलेलं, काय बडबडतेयस, जय

जय आपण फ्रेंडस होतो आहोत आणि राहू बट माझं तुझ्यावर प्रेम नाहीये. बघ आपण 2 वर्ष एकत्र होतो म्हणजे माझे बर्थडे दोन वेळा आले. पण सरप्राईज यावर्षी मिळालं ती पण आयडिया शिव ची होती. माझं ड्रीम पूर्ण झालं मान्य त्याचा वे तू होतास पण पूर्ण झालं शिवमुळे, इशा

काय बदबडतेयस तू जे काय बोलायचं आहे ते स्पष्ट बोल, जय
हेच की मी तुझ्यासाठी योग्य मुलगी नाहीये, माझं शिव वर प्रेम आहे आय लव्ह शिव नॉट यू, इशा
आलं लक्षात म्हणजे मी एक महिना टूर वर काय गेलो तुमचे हे चाळे सुरू झाले तर, आणि काय रे ये शिव लाज वाटते का असं करायला, मुतलास लेका तू मैत्रीवर, जय
स्टॉप इट जय इनफ इज इनफ, इशा
का सत्य बोललो म्हणून राग आला, जय
जय तू असा वागशील असं अजिबात वाटलं न्हवतं. आणि तू शिव ला काय बोलतोयस त्या बिचऱ्याने तर बेस्ट फ्रेंड शी दगाबाजी कशी करायची म्हणून कधीच फिलिंगस बाहेर नाही काढल्या. त्याने ठरवलं असतं तर आता कदाचित तू इथं आलाच नसतास आणि आम्ही कधीच एकत्र आलो असतो.
थोडावेळ कोणीच कोणाशी काहीच बोलला नाही. इशा रडत होती आणि प्रीती तिला समजावत होती. तिच्याही डोळ्यातून पाणी येत होतं
जय रागाने जायला निघाला पण 'जय आय एम सॉरी इफ आय हर्ट यू आय डजन्ट मिन that ऍक्युअली', इशाच्या ह्या वाक्याने थांबला.
जय परत आला, त्याने आणलेली रिंग तिला दिली. दोन्ही हात तिच्या खांद्यावर ठेवत म्हणाला, " ये वेडाबाई मी रडवलं ना तूला खरंच सॉरी मलाही असंच वाटतंय की शिव योग्य मुलगा आहे तुझ्यासाठी." सॉरी शिव, हो आणि माझ्या फ्रेंड ला नेहमी हॅपी ठेव, जय
सगळे एकदम हसले. इशाच्या तर हसताना पण डोळ्यातून पाणी येत होतं. दोघा मित्रांनी एकमेकांना मिठी मारली. जय जायला निघाला सोबत प्रीतीही निघाली।

हॅलो न्यू कपल म्हणत प्रीती इशा जवळ जाऊन तिच्या कानात म्हणाली तुझं फिक्स झालंय ना आता मी जय सोबत गेले तर तुला काही प्रॉब्लेम नाही ना त्यावर इशा काही बोलणार एवढ्यात प्रीती तिथून पळून गेली. ते दोघे गेल्यावर वरून इशाच्या समोर आला अलगद तिचा हात हातात घेतला दुसरा हात कंबरे भोवती वेढा घालून तिला जवळ ओढलं. तिच्या कानात आय लव्ह यू म्हणत प्रेमाची कबुली दिली. आणि लाजून तिने त्याच्या छातीवर डोके टेकवले तिला त्याच्या हृदयाचे ठोके स्पष्ट ऐकू येत होते. त्याने तिचं डोकं अलगद वर केले ओठाला ओठ मिळाले आणि प्रेमाच्या अध्यायला सुरवात झाली.

*****

## होते कुरूप वेडे पिल्लू... - सीमंतिनी

**'लिटल डान्सर एज्ड फॉर्टीन'**

सगळ्यांनी त्या शिल्पाकडे बघून नाके मुरडली. १८८१ साली फ्रेंच सलोन ह्या प्रसिद्ध कला प्रदर्शनात इम्प्रेशनिस्ट एक्झीबिशन विभागात एका लहान बॅलेरिनाचे शिल्प होते. ती नर्तिका वाटत नसून "गटारीतील लहानसे फूल" आहे असे 'जाणकारांचे' मत झाले. समीक्षकांचे म्हणणे होते की तिच्या कुरूप चेहऱ्यात सर्व अवगुण व्यक्त करण्याची क्षमता होती. असं स्वागत झाले एडगर देगाने बनवलेल्या- 'लिटल डान्सर एज्ड फॉर्टीन' - ह्या शिल्पाचे.

एडगर देगाचा जन्म एका सुसंपन्न घराण्यात झाला होता. त्याचे वडील एक बँकर होते. वडिलांच्या इच्छेनुसार तो वकील होणारही होता. मात्र त्याचा ओढा कलेकडे कायमच होता - चित्रकला, बॅले ह्या दोन्हीवर मनापासून प्रेम. देगा आणि त्याला गुरुस्थानी असणाऱ्या जॉ-अगस्ट-डॉमिनिक इंग्रेस यांची भेट झाली तेव्हा इंग्रेस यांनी देगाच्या चित्रकलेला उत्तेजन दिले. लगेच देगा कॉलेज सोडून 'इको दे बॉ आर्ट' ह्या प्रसिध्द कला महाविद्यालयात दाखल झाला. एडगरला 'पॅरीस ऑपेरा बॅले' बघायला आवडत असे. त्याच्या ह्या वेडापायी तेथील नर्तक ही त्याला रिहर्सल बघायला, विंगेत किंवा backstage वर येवू देत. तिथे बसून नर्तकांची हलचाल तो बारकाईने अभ्यासत असे. कधी कधी तो त्या नर्तकांना आपल्या स्टुडियोत बोलवून त्यांची स्केचेस काढत असे.

बॅले मध्ये आढळणार डौलदारपण, त्यातील वेग आणि शिस्त एडगरला भारून टाकत असे. त्याने केवळ स्केचेसच नव्हे तर बॅले ह्या विषयावर तैलचित्र, पेस्टलचित्र, शिल्प आणि कविता देखील केल्या आहेत. अनेक स्केचेस काढल्या नंतर त्याने बॅले कलाकारांची शिल्पं करायला सुरुवात केली. त्या काळात शिल्पांचा विषय देवता किंवा पऱ्या-अप्सरा ह्यासारख्या काल्पनिक स्त्रिया असत. साध्या मानवी नर्तिकेचे शिल्पं बनवणे हे तसे नवलाईचेच होते. शिवाय शिल्पे सामान्यपणे संगमरवर, किंवा इतर दगडात, किंवा धातूची बनवली जात. मात्र देगाने माती (क्ले), क्वचित प्लास्टर आणि प्रामुख्याने मेणाची (वॅक्स) शिल्पे बनवण्याचे धाडस दाखवले. त्याने मॉडेल म्हणून लहानग्या मारीची निवड केली. मारी जेनेविव्ह व्हान गथेचा जन्म अतिसामान्य कुटुंबात झाला होता. गरिबीशी झुंज देण्याचा बॅले स्कूल हा एक मार्ग होता. इतर अनेक मुलीं आणि आपल्या धाकट्या बहिणी सोबत मारी बॅले स्कूल मध्ये जात असे. ह्या मुलींची 'ऑपेरातील उंदीर' म्हणून संभावना व्हायची. जेव्हा एडगर देगाने मॉडेलिंगसाठी पैसे देवू केले तेव्हा अकरा वर्षाची मारी त्याला नाही म्हणू शकली नाही.

एडगरने मारीला बॅलेच्या पोषाखात - ट्युल स्कर्ट आणि टॉप घालून उजवा पाय पुढे, हात मागे, बोटे एकमेकात गुंफलेली, मान वर पण नजर झुकलेली अशा बॅलेच्या चौथ्या स्थितीत उभे रहायला सांगितले. तिचे शिल्पं बनवण्यासाठी आधी त्याने धातूच्या पट्ट्यांचा एक सांगाडा बनवला. मग

त्यावर कापडी पॅडींगचे तुकडे, लाकूड, दोऱ्या आणि तारा चढवून त्याला आकार दिला. क्लेचा एक थर देवून सर्व गुळगुळीत केले आणि शेवटी त्यावर मेणाचा थर दिला. अशाच पद्धतीने बनवलेले हात मूळ सांगाड्याला जोडले आणि मग पूर्ण शिल्पाला रंग दिला. शिल्पाला सिल्कचा ड्रेस, लिनेनचे बूट आणि केसांना रिबीन बांधण्यात आली. अडीच- तीन वर्षे ह्या शिल्पावर काम चालले. हे शिल्प खरे तर १८८० सालीच प्रदर्शनात मांडायचे होते. पण ते देगाच्या मनासारखे उतरत नव्हते. वास्तवदर्शी वाटावे म्हणून त्यावर अपार मेहनत घेण्यात आली. शेवटी १८८१ साली हे शिल्पं प्रदर्शनात मांडले.

त्याकाळी जरी कुणाला ते आवडलं नाही तरी हळूहळू जनमत बदलत गेले. तत्कालीन बेजान, थंड, पांढऱ्याफटक पुतळ्यांच्या ऐवजी ह्या शिल्पातील वास्तवदर्शी सौंदर्य लोकांना प्रभावित करू लागले. ह्या शिल्पातील नैसर्गिकताच शिल्पाला अधिक आकर्षक बनवते असे समीक्षकांचे मत बनू लागले. त्यातील कापड, माती, मेण अशा विविध माध्यमांचा वापर कलारसिकांना क्रांतिकारी वाटू लागला. आज सुमारे दिडशे वर्षानंतर हे शिल्प वास्तवतेचा उत्तम आविष्कार म्हणून गणले जाते. आज हे शिल्प इतर कलाकृतीना प्रेरणास्थान ठरत आहे. अमेरिकेतील पॉल मेलन हे केवळ धनाढ्य नव्हते तर कलेचे जाणकार होते. देगाच्या मृत्यूनंतर पॉल मेलन यांनी त्याची बरीचशी शिल्पे विकत घेतली आणि अमेरिकन म्युझियम्स मध्ये ती प्रदर्शनास खुली केली. वॉशिंग्टन डी. सी. मधील नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट इथे देगाची लिटल डान्सर बघण्याची संधी प्रेक्षकांना आहे.

शिल्पं नावाजल गेल पण मारीचे पुढे काय झालं? मारीची ह्या मॉडेलिंग पायी अनेक वेळा रिहर्सल बुडायची. दिड-दोन वर्षांनी शेवटी तिला स्कूल मधून काढून टाकण्यात आले. आपल्या जीवनाच्या मार्गावर निष्ठा न दाखवण्याची कदाचित ती किंमत असावी. तिचे डान्सर होण्याचे स्वप्न संपले आणि ती काळाच्या ओघात लुप्त झाली. तिची लहान बहीण नर्तिका म्हणून नावारूपास आली पण मारीबद्दल इतिहासाला काहीच माहित नाही. मात्र विरोधाभास असा की देगाच्या कलाकृतीमुळे आज मारी जगातील सर्वात सुपरिचित बॅलेरिना म्हणून गणली जाते.

संदर्भ

१)http://www.nga.gov/content/ngaweb/Collection/art-object-page.110292.html?opensection=overview

२)http://www.nga.gov/collection/gallery/gg89/gg89-over1.html#jump

३) http://www.smithsonianmag.com/smithsonian-institution/true-story-little-ballerina-who-influenced-degas-little-dancer-180953201/?no-ist

*****

## कातरवेळ - सिद्धी चव्हाण

'तांबूस तपकिरी सुर्यकिरणे काचेच्या तावदानावरती पसरली होती. झिरपून गेलेल्या जलसरींचे थेंब त्यावर पाझरू लागले. त्याबरोबर आतल्या गडद निळ्या पडद्याची लवलवं सुरू झाली. एखादा चुकार कवडसा आत डोकावू पहात होता. त्याचा एक तिरकस कटाक्ष पडताच तो पडदा स्वतःच्या जागी निश्चल झाला आणि किरणांनी आपली दिशा बदलली. कोणीही आतमध्ये डोकावून पाहणे त्याला मान्य नव्हते, अगदी वार्यानेही...

कारण त्याची ती, ती त्याच्या बाजूला उजव्या कुशीवर पडून शांत निवांत साखर झोपेत होती. हो त्याचीच 'ती' आणि तिचा 'तो'. कालच तर त्यांनी पळून जाऊन लग्न केले. परत तिच्या भोवती आपले तुटके दोन हात गुंफून तो ही निद्रेच्या अधीन झाला. ना कोणाची भीती, ना जगाची तमा.'

थोड्याच वेळात काही तरी तुटण्या-फुटण्याचा मोठा आवाज झाला आणि त्या दोघांचीही झोप उडाली. धडामsss दाराचे कुलूप तोडून पोलिस इन्स्पेक्टर आत शिरले. अर्थातच त्यांचा लावाजमा सोबतीला होता. नाकाशी रुमाल बांधून कोनस्टेबलने दोन्ही बोडीज ताब्यात घेतल्या.

" गळफास लावून आत्महत्या केली आहे, आत्महत्या की खून झाला म्हणायचं? हे समजेल लवकरचं." वेटर आपापसात कुजबुज करत होते.

" बाजुच्या गावातल्या सावकाराचा पोरंगा आहे साहेब, आणि ही त्या कलावंतांनीची पोरगी. नुसतंच लग्न झालेलं दिसतं होत, त्यात कातरवेळी आले, नाही म्हणणं बरं दिसत नाही, म्हणून मी त्यांना इथे राहू दिल, नाहीतर अशा लोकांना मी नाही ठेवून घेत." होटेलचे मालक गयावया करतं पोलिसांना माहिती देत होते.

'जास्त वेळ खर्च करण्याची गरज नव्हती त्यामुळे ठरल्याप्रमाणे पोलिस त्या रुमची पाहाणी आणि काही जुजबी चोकशी करून तेथील निरुपद्रवी टाकाऊ सामान सोबत घेऊन निघून गेले, निघताना एक पोलिस फोनवर बोलत होता, " हो साहेब. आत्महत्या केली त्यांनी. आत्महत्याच ती. तुम्ही अगदी निर्धास्त रहा. उद्या येईल रिपोर्ट, तेवढ आमच्यावर कृपा दृष्टी ठेवा, म्हणजे झालं."

'तो' छद्मीपणाने हसला आणि त्याची 'ती' ही. " या साल्याने फक्त एका रात्री इथे राहण्याचे चांगले ५००० घेऊन लपायला परवानगी दिली, गद्दारी केली ती गोष्ट वेगळीच. आणि आता दाखवण्यापुरती गयावया करतोय." तो पलंगावरून उठत म्हणाला.

" या जगात सगळेच स्वार्थी. तो पोलिसपण लाचट. मग कशाला उगाच हा शोधाशोधीचा खेळ? जगाला दाखवण्यापुरता? " ती देखील उठून तयारीला लागली.

" असो, कुठून सुरुवात करायची म्हणतेस?" उभ्या जागेवरून कपाटाखाली हात घालून त्याने एक अंगठी बाहेर काढली. त्याच्या वडिलांची, पोलीस डेडबॉडी घेऊन गेले तेव्हा घरंगळत जाऊन खाली पडलेली. एवढा मोठा पुरावा सोबत घेऊन जाण्याची त्यांना तरी काय गरज म्हणा.

" माझ्या माय पासून सुरुवात. म्हणजे एक पार्टी संपते. मंग तुझं खानदान उडवू! " ती अंगठी डस्टबिन मध्ये टाकत उद्गारली.

" तुझ्या म्हणण्याप्रमाणे." तो ही तिच्यामागे बंद दारातून आरपार बाहेर पडला.

***

" काय रे! कश्टमर आहेत का?"

"सायेब, ते आपले नेहीचं जोडपं, बाजुच्या गावातल्या सावकाराचा पोरं हाय, आणि ही त्या कलावंतांनीची पोरगी. तेच हायत." वेटर गुपचुप येऊन होटेल मालकांच्या कानात पुटपुटला.

" सदा काय वेडा झाला काय? ते दोघं काल गेले ना ढगात. माहित नाही का रे? मालक दुसऱ्या वेटरला विचारु लागले.

" सायेब, हा गावाला गेला होता, सकाळी माझ्या आधी हित हजर झालाय, आणि आल्यापासून सारखं तेच बडबडतोय." चावीचा गुच्छ घेऊन गडबडीत वरच्या रुमकडे वळत तो वेटर उद्गारला.

" तू का पळतो, काय झालं?" मालकही त्याच्या मागून निघाले.

" तो रुम नंबर ५ उघडत नाय सकाळ पासन." तो मागून मोठमोठ्याने बोलत होता.

" भावा ५ नंबर मध्येच ते दोघं हायत ना." वेटर सदा ओरडून सांगत होता. पण मालक चावी घेऊन त्या रूम कडे एकटेच निघाले. चालताना हातात वाजलेला फोन त्यानी कानाशी लावला.

"दादा काय बोलता काय? सावकारासकट सगळ खानदान गळफास लावून गेलं. कोणीही शिल्लक नाही. त्याला पर्वा रात्री मदत केली होती, पोराला उडवायला, आता माझे पैसे कोण देणार? " बोलत बोलत दरवाजा उघडून ते रुम नंबर ५ मध्ये शिरले.

"आणि कलावंतीण बी गायब झाली हाय." पलिकडून कोणीतरी माहिती देत होते, पण या बाजूने ऐकणारे कोणीही शिल्लक नव्हते. हॉटेल मालकाला कैद रुम नंबर ५ चा दरवाजा कायमचा बंद झाला, पुन्हा कधीही न उघडण्यासाठी. दिवस मावळतीकडे झुकला होता. सरता सरता न सरणारी वेळ म्हणजेच कातरवेळ सुरु झाली होती. ती वेळ, जी उगीच अधांतरी लटकावून ठेवते ती कातर वेळ सुरु झाली होती. संधीकालच्या सूर्यास्ताची पिंगट-केशरी किरणे खिडकीतून आत डोकावू पहात होती, त्याने एक कोरडा कटाक्ष टाकला आणि किरणांनी आपली दिशा बदलली. कोणीही आतमध्ये डोकावून पाहणे त्याला मान्य नव्हते अगदी वार्यालाही.

## नमन - मेघना आंबेकर

बरोब्बर मागच्या वर्षीच्या एप्रिल मधली गोष्ट आहे. दि.२९ एप्रिल,२०१९ ची लोकसभेच्या मतदानाचा दिवस होता. हक्काचे मतदान तर करायचेच होते पण म्हणून अगदी सक्काळी सक्काळी जायची गरज नाही आणि साधारण १०.३० - ११ च्या दरम्यान जाऊ असा फतवा घरातून निघाला. त्याप्रमाणे आम्ही दोघे ११ च्या दरम्यान मतदान केंद्रावर पोचलो. तिथे पोचताच बघतो तर आमच्या पण खूप आधीपासून लोकांनी येऊन रांगा लावलेल्या होत्या. त्या रांगा बघून अजून १ ते १.३० तासाची निश्चिंती झाली. अर्थात हा वेळ कसा काढायचा हा प्रश्न आमच्या समोर नव्हताच कारण बरेच ओळखीचे, कधी फारशी गाठभेट न होणारे लोकहि तिथे भेटत होते. शिवाय एकुणच वातावरण वेगळे असल्याने त्या परिस्थितीचे निरीक्षण करण्यात पण एक मजा येत होती.

पहिल्यांदा रांगेत उभे राहिलो तेंव्हा रांग मैदानात होती त्यामुळे टळटळीत उन्हात उभे राहण्याशिवाय काही गत्यंतर नव्हते. अशा वेळेस जवळ असणारी पाण्याची बाटली एवढाच काय तो आधार होता. आमच्या रांगेत माझ्या पुढे एक साधारण ३०-३२ च्या वयोगटातला मनुष्य त्याच्या २ ते २.५ वर्षाच्या मुलीला घेऊन रांगेत उभा होता. त्याच्या एकुण बोलण्यातून आणि त्याला येणाऱ्या फोन कॉल्स वरून तो आय.टी. क्षेत्रात नोकरी करणारा वाटला. मुलीशी एकदम छान गप्पा मारत होता. मी मनात म्हटलं एवढ्या उन्हातान्हात इथे लहान मुलांना घेऊन येण्याच याचं धाडस कसं होत? बर तिला इकडे घेऊन येण्याचा उद्देश काय? एवढ्याशा चिमुरडीला यातल काय कळणार? शिवाय ह्या मुलीची आई पण कुठे दिसत नव्हती. जर घरात आई, बाबा दोघेच असतील तर आधी एकाने यावं मग दुसर्याने.. उगाच या उन्हातान्हात छोटीची वरात कशाला ना? असे एक ना अनेक प्रश्न माझ्या मनात येऊन गेले त्यावर सचिनचं नेहमीचच म्हणणे होते " don't jump to conclusions" आणि " दुसऱ्या माणसाने कसं वागावे हे आपण ठरवू शकत नाही आणि आपल्याला तो हक्क देखील नाही." असं असलं तरी माझ्या मनातली प्रश्नमालिका काही संपत नव्हती. ती मुलगी मात्र कोणताही त्रास न देता तिच्या बाबां बरोबर छान वेळ घालवत होती. आणि तिचा बाबा पण घामाघूम होऊन सुध्दा तिला अंगाखांद्यावर खेळवत होता. नंतर मधेच ती बाबाला म्हणाली मला वडापाव खायचा आहे. हे ऐकल्यावर माझ्या मनात आले हि काय वेळ आहे का वडापाव खायची?? इतक्या उन्हात अस तेलकट खाण्यापेक्षा घरी गेल्यावर नीट जेवावं ना तिने. काहीतरी गरज होती का मला असे विचार मनात आणण्याची.... पण सवय... तिच्या ह्या हट्टावर कडी म्हणजे तिच्या बाबाच उत्तर होते. तिचा बाबा म्हणाला कि इथले काम झाले ना कि घरी जाताना आपण वडापाव घेऊ हां.. मग तू निवांत खा. हे उत्तर ऐकून मी तर थक्कच झाले.

कमाल वाटत होत्ती ते त्या बाबाच्या शांतपणाची अन कौतुक वाटत होत ते त्या मुलीचं तिच्या बाबावर असणाऱ्या गाढ विश्वासाचं. बाबाने सांगितल्यावर तिला पटल आणि पुन्हा अजिबात तिने वडापावचा हट्ट धरला नाही. पण मनात आलं कि, हिच्या आईची खरी कमाल आहे नाही; बिचारा बाबा उन्हातान्हात सांभाळतो आहे लेकीला.

असे सगळे विचारचक्र चालु असतानाच हळू हळू रांग पुढे सरकत होती आणि आम्ही आमच्या रुमच्या कोरीडोर मध्ये पोहोचलो. तिथे वृध्द मंडळीना बसायला बाक ठेवले होते. त्या बाकावर साधारण सत्तरीतल्या एक आज्जी बसलेल्या होत्या. त्यांनी बसल्या बसल्याच त्या छोटीला हाक मारली. आणि त्या तिच्या बाबाशी बोलायला लागल्या. त्यांनी छोटीच्या बाबाला प्रश्न विचारायला सुरुवात केली. "काय रे, कशी आहे आता हिच्या आईची तब्येत?" त्यावर तो म्हणाला काही फरक नाही जैसे थे. फार सुधारणा नाही. तो म्हणाला इथे यायच्या आधीच तिला औषधांचा डोस देऊन आलोय. एकदा औषध दिलं कि ती पूर्ण ग्लानीत जाते आणि मग झोपुनच असते. त्यामुळे तिच्या भरवशावर छोटीला घरात ठेवूच शकत नाही. ह्या सगळ्या बोलण्यावरून मला कळले कि त्या छोटीच्या आईला काहीतरी दुर्धर आजार झालेला आहे. नंतर त्या दोघांच्या गप्पा चालू होत्या त्या आज्जी त्याला म्हणाल्या तुझी खरच कमाल आहे रे; आई असे पर्यंत तिची आजारपणात तू मनापासुन सेवाशुश्रुषा केलीस आणि आता तिच्यानंतर बायकोच करावं लागतय. त्या म्हणाल्या कि, कीव येते ती त्या छोटीची; त्या निरागस मनाला काही कळत देखील नसेल. आई, बाबांचं भरभरून प्रेम मिळण्याचं , त्यांच्या कडून हक्काने लाड करवून घेण्याचं हे कोवळं वय पण सध्या तरी तिच्या करता तुच आई आणि तुच बाबा. त्यावर तो म्हणाला अहो आज्जी शेवटी दोघी माझ्याच ना. आपल्या माणसांच करताना कसला आलाय त्रास. फक्त ती ह्या आजारातून लवकरात लवकर बरी झालेली मला बघायचंय आणि मी मनापासून त्याच क्षणाची वाट बघतोय. नंतर आज्जीनी त्याला ऑफिसच्या चौकशी केली. त्यावर तो म्हणाला कि मी आता work from home करतो. साधारण २ आठवड्यानंतर एकदाच ५-६ तासांकरिता ऑफिसला जातो तेंव्हा मात्र छोटीला शेजारच्या काकूंकडे ठेवून जातो. त्यांना घरातली सगळी परिस्थिती माहिती आहे आणि छोटी त्यांच्याकडे विनातक्रार थांबते त्यामुळे बरं पडतं. पण आज सगळयांचा सुट्टीचा दिवस आणि फार काही वेळ जाणार नाही असं वाटलं म्हणून छोटीला घेऊन आलो. तेवढ्यात त्याचा नंबर आला आणि तो रूम मध्ये गेला. मी मात्र फार ओशाळले. मला आज एका माणसात त्याच्या आईच्या प्रती असलेली नितांत श्रद्धा,आदर. बायकोप्रती असलेलं प्रेम अन लेकी करता ओसंडून वाहणारी माया आणि वात्सल्य. पण ह्यापलीकडे जाऊन देशाच्या प्रती असणारी कर्तव्य भावना ह्या सगळ्याचा मिलाफ त्या अजब रसायनात मला दिसत होता. तेवढ्यात माझा नंबर आला आणि ह्या सगळ्या विचारांची साखळी तुटली. मी मतदान करून

आले पण त्या बाबाची प्रतिमा काही मनातून जात नव्हती कारण गेल्या एक दीड तासात मी जे ऐकलं आणि अनुभवलं होतं ते शब्दांच्या हि पलीकडलं होतं.

एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवली कि, आपण कधीकधी नव्हे बऱ्याचदा कोणाला भेटलो किंवा कोणाशी बोललो कि उगाच आपले काही तर्क, अंदाज बांधतो आणि नकळत त्या व्यक्तीच्या बाबतीत आपलं ठाम मत बनवतो. पण हे किती चुकीच आहे ते आत्ता पटतंय.

पण एक मात्र खरं कि आज काही फुटकळ कारणामुळे आणि फालतू ईगो मुळे कित्येक जोडपी घटस्फोटापर्यंत जाण्याच टोकांच पाउल उचलतात. पण आज बघितलेला हा बाबा त्याच्या बायकोच्या आजारपणात खंबीरपणे साथ देऊन ती बरी होणार आहे या आशेवर त्याच्या मुलीचा व्यवस्थित सांभाळ देखील करतोय. सगळ्यात महत्वाचे म्हणजे अशा कौटुंबिक जबाबदार्या पार पाडत असताना आपल्या लोकशाहीच्या देशात मत देण्याचा आपला अधिकार आणि कर्तव्य दोन्ही चोखपणे बजावतोय याचं मात्र खूप कौतुक वाटलं आणि मनोमन मी त्या बाबाला शतश: नमन केलं.

*****



# कविता



*उटण्याचा नाजूक सुगंध घेऊन,*
*आली आज पहिली पहाट,*
*पणतीतल्या दिव्याच्या तेजानी,*
*उजळेल आयुष्याची वहिवाट !!*

## प्रश्न... - आशिष निनगुरकर

*जाणिवा बोथट झाल्या कि*
*कल्पनांचे विस्तारपक्षी उडतात*
*आक्रमण होत असतं कायम*
*आपल्या आपल्यातच,....*
*कधी कुणी सूड उगवेल सांगता येत नाही*
*कुणाच्या गाभाऱ्याचा सहसा पत्ता लागत नाही*
*साध्या,सोज्वळ शब्दांमध्ये काहीतरी*
*दडलेलं असतं*
*कुणाला काहीतरी नक्कीच हवं असतं*
*भावनांचा विस्फोट होत जातो*
*स्वप्नांचे आभाळ तुटत जाते*
*आधाराचे भार वाढत जातात*
*खरचं आपण आपल्यालाच विसरलो आहोत का?*
*नात्यांची खाण थिजली आहे का?*
*पूर्वीसारखं सण,उत्सव लोपले आहेत का?*
*आता संस्कृतीचं दर्शन होत नाही*
*थांग लागत नाही कुणाचा*
*नेमकं काय झालंय कळत नाही*
*वेळ बदलली का काळ?*
*पण आपण तर तेच आहोत ना...*
*मग कशाला हा गुंता*
*तरी पुन्हा पुन्हा तेच प्रश्न पडत राहतात*
*माहित नसलेल्या उत्तरांचे गोंद तळात साचत जातात*
*विखरून काढावं सगळे मात्र ते शक्य होत नाही*
*भांबाळून उठतो मी आतल्या आत*
*सावरायला हक्काचं कुणी भेटत नाही*
*हल्ली सगळं विकत मिळतं*
*पण माणुसकी कुठे दिसत नाही*
*सत्वाचा विचार करतांना फार दूरवर जातो आपण*
*आपुलकीची नाते जपायला घराबाहेर पडत नाही*
*बस झालं आता... कितीदा तेच बोलत राहणार*
*प्रत्येकातला माणुसकीचा देव कधी प्रसन्न होणार?*

*****

## बळीचे राज्य येऊ दे.. - रामकृष्ण पांडुरंग पाटील

*निसर्ग कसा खेळतो*
*बळीराजाशी हा खेळ*
*कसं जगावं जीवन*
*नाही बसत ताळमेळ*

*बळीराजाच्या आयुष्यात*
*कधी दुष्काळाचा सूर*
*कधी शेतात त्याच्या*
*वाही पाण्याचा महापूर*

*कधी फिरवतोस वणवण*
*तू घोटभर पाण्यासाठी*
*कधी बरसतो एवढा की*
*संसार नेतो नदीच्या काठी*

*देवा नको रे आता आमची*
*एवढी सत्वपरीक्षा पाहू*
*तूच जर असा वागला तर*
*मी कुणाच्या भरोशी राहू*

*देवा आता तरी रे तू*
*आमची ईडापीडा टळू दे*
*चरणी तुझ्या ठेवितो माथा*
*आम्हा बळींचे राज्य येऊ दे*

*****

## तू म्हणजे... - सुनील दौलत खोडके

*तू म्हणजे...*
*विविधतेने नटलेल्या या सर्वांग सुंदर भूमीवर पडलेलं*
*सूर्यीचं पहीलं कोवळं*
*किरण...*

*तू म्हणजे...*
*ऋणझुण निनादत शीतलतेने शांत वाहणारी*
*नितळ सरिता...*

*तू म्हणजे...*
*प्रसन्नतेचा दरबार अन् नेहमीच बहरलेली*
*सदाफुली...*

*तू म्हणजे...*
*उर्जा माझी आणि श्वास*
*तुच आहेस माझा*
*विश्वास...*

*तू म्हणजे...*
*मंदिरातील ईश्वर आरती*
*विहारातील बुद्ध वंदना*
*तू मस्जिदीतला अल्लाह नमाज*
*तू चर्च मधील येशूची पवित्र*
*प्रार्थना...*

*****

## आरसा - माधवी मिलींद खडक्कार

*वेगवेगळे आकार आहेत माझे जरी*
*तुम्हास तुमची प्रतिमा दिसते खरी*

*जसे तुमचे सर्वांचे बाह्यरूप असे*
*प्रतिबिंब तेच तुम्हास माझ्यामध्ये दिसे*

*आला विचार सहज तेव्हा माझ्यामनी*
*कळावी समोरच्याच्या मनातील कहाणी*

*पारदर्शकतेचे वरदान मलाही असावे*
*गुपीत तुमच्या मनीचे मला पण दिसावे*

*अंतर्मन बाह्यमन यातील कळावा मला संघर्ष*
*त्यावरून मी काढू शकावा तुमच्या स्वभावाचा*
*निष्कर्ष..*

*****

## परतीचा पाऊस - दत्ता वालेकर

*वर्षभर शेतावरी*
*सेवा मातीची करून*
*केली मृगाला पेरणी*
*धान आले तरारून*

*आल आभाळ दाटून*
*काळकुट्ट पावसानं*
*मनी झाला गलबला*
*गेल सार आवसानं*

*परतीच्या पावसानं*
*सोयाबीन हे भिजले*
*पीक सारे गेले माझे*
*सारे  रानात कुजले*

*उभे डोलणारे पीक*
*पीक झोपलं रानात*
*झाली पीकाची नासाडी*
*काय देवाच्या मनात*

*फाटलेल्या आभाळाला*
*कसं लावू मी ठिगळं*
*पाहू मी स्वप्न कसले*
*गेलं वाहून सगळं*

*आला दिवाळीचा सण*
*काय सांगू लेकरानां*
*सुगी गेलीय वाहून*
*कसं सांगू पाखरानां.*

*****

## माझी कविता...! - ज्योत्स्ना देवराम गवारी

*सुकलेला माझ्या मनीचा मोगरा*
*तुझ्या सहवासाने फुलवशील ना*
*कोमेजून चाललेल्या रोपाला*
*प्रेमाचं खत-पाणी घालशील ना*

*आयुष्याचे चुकले कधी गणित*
*हिशोब तू मांडशील ना*
*विस्कटलेल्या आयुष्याच्या घडीला*
*भावनेची सांगड घालशील ना*

*सुरुवात तर केलीय जगायला*
*साथ तू देशील ना*
*भिरभिरणाऱ्या वादळात*
*प्रीतीची झुळूक बनून येशील ना*

*वाढणारी गोड हुरहूर*
*जाणून तू घेशील ना*
*खट्याळ मनास*
*समजावून सांगशील ना*

*वाट जरी असली वाकडी*
*तोल सावरून घेशील ना*
*बेभान या क्षणी*
*सांभाळून मज घेशील ना*

*नजरेतील प्रेम भाव*
*निरखून बघशील ना*
*लेखणी घेता हाती*
*माझी कविता तू बनशील ना...!*

*****

## डस्टबिन - अमोल पाटील

*लग्नाळू मुलगा असताना*
*कांताबाईचं ठीक नव्हतं अवधान*
*योग जुळून आल्यावर झालं शुभमंगल सावधान*

*वाजंत्री फटाके झळकले फेटे*
*अन् फिरली बुंदी,गोरीगोमटी सून बघून*
*कांताबाई ची झाली चांदी*

*नव्याचे नऊ दिवस सरले*
*आणि नवरीचा मेकअप चे रंग उतरले*
*अन् खऱ्या रूपाचे दर्शन झाले*

*असंच एकदा सून नवऱ्याला म्हणाली*
*आपल्या शहरातल्या या फ्लॅटमध्ये*
*ही डस्टबिन नको*

*रोख आपल्याकडेच आहे*
*हे कांताबाई ला कळलं,अन् ऐकल्या ऐकल्या*
*तिचं पित्त खवळलं*

*मला आणि माझ्या नवऱ्याला डस्टबिन म्हणतीस*
*मग तुला डजबिन मधून निघालेलं*
*प्रॉडक्ट कसं चालतं गं ?*
*जायाचं असल तर तुम्ही दोघं जावा*
*या फ्लॅटचा कागुद माह्या नावावर हाये...*

*सुनेनं केली आदळआपट*
*तिच्या माहेरचे आले घेऊन एक वकील*
*म्हणाले द्या घटस्फोट*

*हे रागरंग बघून*
*शेजारी-पाजारी अन् नातलगांनी कांताबाईला म्हटलं*
*पोराच्या संसारासाठी नमतं घे*

*कांताबाई म्हटली : अज्याबात नाही*
*सुनांनी ललिता पवार वानी वागल्यावर*
*सासवांनी सुलोचनादीदी चा रोल का करावा ?*

*****

## वार्धक्य - निशा सचिन भोसले

*आताच एखाद्या मंदिरात त्यांना न्या,*
*कीर्तनाचे मधुर बोल आताच त्यांना ऐकवा*
*टाळाच्या तालावर विठू नामाचा गजर करा*
*कारण नंतर तुम्ही घातलेल्या दशक्रियेच्या*
*भजनात मनसोक्त गायला ते कधीच नसतात.......*

*आताच जेवणाचे ताट वाढून घेऊन जा,*
*जेवले की नाही ते ही नक्की बघा,*
*कधीतरी प्रेमाचा एक घासही भरा*
*कारण नंतर तुम्ही घातलेल्या दशक्रियेच्या जेवणावळीत*
*दोन घास जेवायला ते कधीच नसतात.......*

*आताच दुखण्याखुपण्यासाठी दवाखान्यात घेऊन जा,*
*औषधा बरोबर मनाची ही उभारी त्यांना दया*
*दोन क्षण त्या दुखऱ्या मनाला ही शांत करा*
*कारण नंतर तुम्ही घातलेल्या दशक्रियेच्या दानधर्मात*
*दाता म्हणून ते कधीच उभे नसतात.....*

*आताच एखाद्या दिवशी त्यांचा हात हातात घ्या,*
*सुरकतलेल्या कपाळावर हळूच ओठ टेकवा*
*प्रेमाचा ओलावा एकमेकांना स्पर्शू द्या*
*कारण नंतर तुम्ही घातलेल्या दशक्रियेच्या पूजेत तुम्हाला*
*आधार द्यायला ते कधीच नसतात....*

*आताच एखाद्या दिवशी वेळ काढून त्यांच्याशी बोला*
*सुखदुःखाची गणिते त्यांच्या समोर मांडा*
*समाधानाच्या बेरजा आनंदाने त्यांना सांगा*
*कारण नंतर तुम्ही घातलेल्या दशक्रियेच्या श्राद्धात*
*माणसांची गोळाबेरीज बघायला ते कधीच नसतात*

*आताच एखाद्या दिवशी अशक्त मांडीवर त्या निजा,*
*आयुष्यभराची पुंजी मनी साठवून घ्या*
*अशक्त शरीराबरोबर, कपड्यांची ही ऊब घ्या*
*कारण नंतर तुम्ही घातलेल्या दशक्रियेच्या मांडवात*
*मायेची सावली द्यायला ते कधीच नसतात.*

*****

## हे डोंगरकड्या - बिपीन सांगळे

हे डोंगरकड्या ,
गड्या , काय डौलात उभा आहेस तू !
छाती पुढे काढून

हे डोंगरकड्या ,
तुझ्या उन्नत छातीवर
बरसत असतील मेघ
अन त्यांच्या मोतियांची माळही
रुळत असेल तिच्यावर
अन तूही ते मोती
अलगद सोडत असशील
तुझ्या पायागती
भरभरून

हे डोंगरकड्या ,
हिवाळ्यात धुक्याची शाल लपेटत असशील
तुझ्या त्या छातीभोवती
तरुणीच्या धवल अवगुंठनासारखी
अन गार वारंही गपगुमान
बाजूबाजूने वाहून निघून जात असेल
तुझ्या पोलादी छातीला नमून

हे डोंगरकड्या ,
ग्रीष्मात तुझ्या कड्यावरचं गवत
पिवळं - पिवळं पडत असेल
एखाद्या बुजुर्गाच्या छातीवरचे
केस न केस पांढरे झाल्यासारखं
अनुभवी अन पोक्त बुजूर्गच तूही
खरंतर आतून

पण गड्या ,
आजकाल जमाना बदललाय
किरकोळ माणसंही छाती फुगवून चालतात
त्यांच्या छातीच्या पिंजऱ्यात हृदय नाही रे
तर फत्तर भरले आहेत
ज्यांना पाझर फुटत नाही काळजातून

ते कधी तुझी उन्नत छाती फोडतील
माहिती नाही
कधी तुला सपाट करतील
जमीनदोस्त करतील
वणवा लावतील तुझ्यावरच्या फुलोऱ्याला
माहिती नाही
घेतील सातबारा बदलून
अरे , गायबही करून टाकतील
एखाद्यावेळी नकाशातून

आमच्याही छातीत धडधडतं रे
पण मजेत रहा
त्यांची नजर तुझ्यावर पडेपर्यंत
तगून रहा
यांचं पाप यांनाच फेडायचं आहे - मागून !
हे डोंगरकड्या ...

*****

## तूर - शाम लाटकर

तूर बहरली आज
उभ्या रानात रानात
दिसे वावर सोनेरी
आली तूर फुलोऱ्यात

धुके पडे थंडी मध्ये
पडे रोग किडी त्यावर
करा औषध फवारणी
उभ्या तूर पिकावर

शेंगा लागल्या झाडाला
झाडं ओझ्यान वाकली
मोतिया चे भरले दाने
शेंग पोसली पोसली
.
देवा भरूदे उतारा
रास पडूदेखळ्यात
मन झुले आनंदाने
पैका येईल हातात.

## श्रावण - अदिती काळमेख

हळदुलं ऊन पसरावं तशी
क्षणात खळखळून हसतेस..

झाकोळून जावं नभ तशी
क्षणात रुसून बसतेस..

जसे भरून येतात मेघ
तशी तूही येतेस दाटून
जणू दिड. मूढ होतेस
अन जातेस आतल्या आत
घट्ट मिटून..

डोळे क्षणात भरून येतात
कुण्या जन्मीचं दुःख घेऊन
आणि बरसत राहतो पाऊस
हमसून हमसून आवेगाने..

जसे दूर व्हावे धुक्याचे पटल
आणि लख्ख निरभ्र व्हावे आकाश

तशी तूही नितळ
मोकळी होतेस
उन्हात चांदणं बिखरावं
तशी हास्यमौक्तिकं उधळतेस...

तुझ्या निरभ्र नेत्रात
आता असतो
पिसारा फुलवलेला,
धुंद नाचणारा मोर

अन मी अनिमिष नेत्रांनी
पाहत राहतो श्रावण
बाहेरचाही आणि तुझ्या आतलाही...

## गझल - सांगा एक सुत्र - यतीन शशिकांत कुलकर्णी

*शत्रुला करायचे मित्र !*
*सांगाल का एक तरी सुत्र !!*

*उजळून आल्या आठवणी !*
*भरून आले निळेशार नेत्र !!*
*भरलेल्या नेत्रांना पुसायला*
*मिळेल का एक तरी सुत्र !!*

*तोंडी कराराच्या केल्या बाता !*
*त्याचे धाडू का त्याला पत्र !!*
*करार मदारांच्या ओझ्यात*
*सापडेल का सुटायचे सुत्र !!*

*गोड गप्पांचा बंद झाला कप्पा !*
*कोंडवाड्यात झालो गिळीतगात्र !!*
*या बंदिस्त ओठांच्या मुखाला*
*उघडण्याचा मिळेल नवीन मंत्र !!*

*मैत्रीला घाव लागले लोखंडाचे !*
*कसे होतील कोणी एक पात्र !!*
*जीत झाली, ती तुझी का माझी*
*कोणी सोडायला देईल का मंत्र !!*

*पारडे तुझे की माझे का जड झाले !*
*कोडे सोडवेल का? शंका आहे तिळमात्र !!*
*शत्रुला करायचे मित्र*
*सांगाल का एक तरी सुत्र !!*

# ललितलेखन



*दिवाळीचा पहिला दिवा लागता दारी,*
*सुखाचे किरण येती घरी,*
*पुर्ण होवोत तुमच्या सर्व ईच्छा,*
*आमच्याकडुन दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !*

## एक पाऊल टाकू 'मी माझा' च्या पलीकडे... - आशिष निनगुरकर

सध्या सगळीकडे 'करोनो' व्हायरसने थैमान घातले आहे.संपूर्ण देश लॉकडाऊन कडून आता अनलॉकच्या दिशेने पाऊल टाकत आहे.कोरोनाच्या दोन लाटा येऊन गेल्या आहेत आणि आता तिसरी लाट येते कि काय? असे तर्कवितर्क सुरु आहेत. काहीजणांचे तर अजूनही 'वर्क फ्रॉम होम' सुरु आहे. अशावेळी काय करायचे? हा सगळ्यांना भेडसावणारा प्रश्न आहे.तेव्हा किती सिनेमे बघणार? किती पुस्तके वाचणार? मोबाईलवर किती गेम खेळणार? अशा सर्व गोष्टींचा कंटाळा हा कधी ना कधी येणारच. परंतु जर आपण हा वेळ आपल्या स्वतःसाठी दिला,तर किती उत्तम होईल. या धावपळीच्या जगात कुठेतरी आपल्याला ब्रेक मिळणे गरजेचे होते. स्वतःचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे होते.त्यासाठी ही वेळ योग्य आहे,असे मला वाटते. या काळात आपण आपले अनेक जवळचे अनेक मित्र,नातेवाईक गमावले आहेत. त्यामुळे जवळची व्यक्ती अश्या कुठल्या आजाराने गेल्यानंतर काय होते? हे आपण अनुभवले असेलच. या काळात मानसिक आधाराची जास्त गरज असते.

एरवी आपण आपल्याच कामात म्हणजे नोकरीत किंवा व्यवसायात व्यस्त असतो. स्वतःला द्यायला आपल्याकडे जरासुद्धा वेळ नसतो. त्यामुळे मिळालेला हा वेळ सत्कारणी लावणे गरजेचे आहे. मी जेव्हा माझ्या भूतकाळात जातो, तेव्हा माझ्या कॉलेजचे ते मोरपंखी दिवस मला आठवतात.ते दिवस खरंच खूप भारी होते. त्यावेळी मी 'कमवा आणि शिकवा' या योजनेत सहभाग घेतला होता.कॉलेजचे लेक्चर्स झाले कि,आम्ही सगळा ग्रुप कॉलेजमधील काम करत असू.त्याचे आम्हाला काही पैसे मिळायचे.पण त्या पैशांपेक्षा जास्त मनोभावे आनंद त्या कामातून मिळायचा.पैशातून बसच्या पासची निकड भागायची.त्यामुळे घरच्यांवरचा थोडासा भार हलका व्हायचा.त्या वयात पैशाची किंमत कळली,म्हणून आजच्या महागाईच्या जगात सर्व गोष्टींना तोंड देता येते.पण याउलट आजच्या तरुणाईबद्दल बोलायचे ठरले तर फारच चित्र-विचित्र अवस्था आहे.कॉलेज कॅम्पसमध्ये शिरलं,की मन अगदी प्रसन्न होऊन जातं.या तरुणाईत फेरफटका मारल्यानंतर,नवीन पंख घेऊन उडू पाहणारी ही पाखरं वेगवेगळ्या कल्पनेत रमतांना दिसतात.नवनवीन फॅशन करू पाहणारी ही तरुणाई कट्ट्यावर आल्यानंतर त्यांच्या विविध विषयांवरील चर्चा,प्रसंग व मतं मांडतांना पाहून बरं वाटतं.प्रत्येक जण आपल्या देहबोलीतून जो स्मार्टनेस दाखवीत असतो,तो वाखाणण्याजोगा असतो.

परंतु,याच वातावरणात व्यसनाधीन,निराशमय पिढीचं चित्रही मला दिसतं,तेव्हा मन चिंताग्रस्त होतं आणि नकळत वाईट वाटतं.अशी दोन्ही टोके दिसल्याने मन भावविभोर होते.

तरुणाई म्हटलं,की सळसळता उत्साह,कट्ट्यावरच्या गप्पा,मित्रांबरोबर एन्जॉय केलेला प्रत्येक क्षण,हेच आठवतं.पण बदलत्या परिस्थितीनुसार भान येतंच असं नाही.मी नेमका कोण आणि बदलत्या परिस्थितीत माझं खरं स्थान काय आहे, हा प्रश्न आपल्यापैकी किती तरुणांना पडतो? शिक्षण,उच्च शिक्षण,रोजगार,लग्न आणि सेटल होणं या मार्गानं सुरु असलेला आपला सरधोपट प्रवास उमेदीची १५ वर्षं तरी खातो. इतकी वर्ष घालवल्यांनंतर आणि 'दोनाचे चार' झाल्यानंतर संसाराची काळजी घेण्याची जबाबदारी पडते. चाळीशीपर्यंतचा माणूस तरुण मानला जात असला तरी तरुणाईत अपेक्षित असलेला जोश,संस्कारांचं उपयोजन आणि समाजभिमुखता खरोखरच कितपत जपता येते,असा प्रश्न आजघडीला पडतो आहे.आक्रमक,अतिरेकी विचारांचं तांडव बाहेर सुरु असतांना आत्मपरीक्षण करतांना असा प्रश्न हटकून पडतो.

तरुणाईच्या हातात देश सुरक्षित राहायला हवा,अशी जगाची अपेक्षा असते.परंतु,देशाच्या सुरक्षिततेआधी आपली,आपल्या नोकरीची आणि परिवाराची सुरक्षितता महत्वाची मानून 'आपण बरं आणि आपलं काम बरं' अशा भावनेतून आपल्यापैकी अनेक जण आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत पुढे सरकत राहतात.दिवस पुढे जात राहतात आणि मग एखाद्या ताज्या आदोंलनाच्या निमित्तानं आपल्याला सत्व तपासून पाहण्याची संधी मिळते.गेल्या काही वर्षांत आपल्याला अशा अनेक संधी मिळत आहेत.कधी भाषिक अस्मिता,तर कधी कडवी आक्रमक भूमिका घेणाऱ्यांच्या निमित्तानं आपण कोड्यात पडतो. खरोखरचं आपली म्हणून काही भूमिका आहे काय,तशी ती असल्यास जाहीरपणे आपण ती मांडू शकतो का,आणि तशी भूमिका मांडल्यानंतर होणारी टीका स्वीकारायची आपली तयारी आहे काय ? नोकरीत तणाव,आवराआवरीची धावपळ आणि थकून जाणारं मन आणि शरीर याला आपल्यातला प्रत्येक जण सभ्य,सुशिक्षित असतांना संघर्षापासून भूमिका घेण्यापासून दूर राहू लागलो,तर नेमकी समजोपयोगी भूमिका घेणार कोण? आवर्जून काही सांगायची तीव्र गरज असतांनाही गप्प बसून राहिल्यामुळे समाजात पसरत राहणारे चुकीचे विचार अधिक टोकदार बनले तर येणारा भविष्यकाळ आपल्याला क्षमा करेल काय,या

प्रश्नांचा विचार करायला हवा.रस्त्यावर उतरून संघर्ष करता येत नसला,तरी पुढे येऊन विचार मांडणं आवश्यक आहे.मनमोकळेपणाने व्यक्त होणे गरजेचे आहे.
नाहीतर आपल्या भावनांचा एकत्र उद्रेक झाला कि त्याचा काय उपयोग? तेव्हा वेळ हातातून निघून गेलेली असते.त्यापेक्षा योग्य वेळी बोलता यायला हवे.आजच्या काळात नुसते शांत बसणे किंवा बघ्याची भूमिका घेणे हा गुन्हा आहे.

समान विचारांचे काही मित्र उभे करणं आणि पुढल्या पिढीला या प्रागतिक आणि संस्कारी विचारांचं बाळकडू देणं गरजेचं आहे.वाद कुठल्याही गोष्टींनी उभा राहिला,तरी आपलं सत्व न गमावता,समाजाभिमुख विचार मांडत आत्मपरीक्षण करता यायला हवं. रोजच्या दगदगीतून वेळ काढत 'मी माझा' च्या पलीकडे जाऊन इतरांसाठी,समाजासाठी काहीतरी करायला हवं.एक सुरुवात कुणीतरी करायला हवी,तरच कदाचित त्यातून उद्याची रम्य पहाट उगवेल.सध्या जी आपल्यावर परिस्थिती ओढवली आहे,त्याचा नेमकेपणाने अभ्यास करून स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.त्याबरोबर इतरांचा विचार करणेही तितकेच गरजेचे आहे.सध्या हे संकट किंवा ही लढाई कुण्या एकट्याची नसून आपल्या सर्वांची आहे.ही लढाई आपल्याला मैदानावर न लढता घरात बसून जिंकायची आहे. त्यामुळे सध्याच्या कोरोनामय परिस्थितीमध्ये,आतातरी आपण आपले आत्मचिंतन करायला हवे आणि एक पाऊल 'मी माझा' च्या पलीकडे टाकायला हवे.

*****

## कोरोना आणि मुंबई - भूषण सहदेव तांबे

मुंबई शहरासह संपूर्ण महाराष्ट्राचे सध्याचे वातावरण कोरोना या रोगाने फार भयभीत झालेले आहे. अनेकांच्या नोकऱ्या, व्यवसाय, आणि उद्योगधंदे ठप्प होऊन फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे. इतकेच नव्हे तर या सर्वांचा परिणाम राज्याच्या महसूल खात्यावर देखील झालेला आहे. त्यामुळे राज्याची आर्थिक परिस्थिती देखील संकटात असून मोठ्या प्रमाणावर ढासाळलेली आहे. काही दिवसांपूर्वी कोरोना या रोगाचे संक्रमण एवढ्या पटीने वाढले होते की याचे नाव जरी काढले तरी ग्लानी (चक्कर) यायची वेळ येत होती. या रोगाने अक्षरशा: मुंबईसारख्या प्रमुख शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घालून फार मोठ्या प्रमाणावर दहशत माजवून भयंकर परिस्थिती निर्माण केली. या परिस्थितीशी सामना करताना संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाने खंबीररित्या त्याला आव्हान दिले आणि सरकारच्या नियमांचे काटेकोर पद्धतीने पालन करून सरकारला योग्यत्यारीत्या सहकार्य सुद्धा केलेत.

पुढील गोष्टींचा सध्याचा आढावा घेतला असता महाराष्ट्र राज्य सरकारने तसेच नागरिकांच्या सहकार्यामुळे कोरोना सारख्या भयंकर रोगाला मोठ्या प्रमाणावर प्रसार होण्यापासून रोखण्यात महाराष्ट्र राज्याला यश आलेले आहे आणि या महामारीला संपुष्टात आणण्यासाठी सध्या फार मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करण्यात येत आहे. अशा वेळी दुष्काळात तेरावा महिना म्हणजेच "तौक्ते चक्रवादळ". तौक्ते चक्रवादळाने मुंबईसह कोकण किनारपट्टीवर एवढा धुमाकूळ घातला की यातच हजारो झाडांची पडझड झाली, काही झाडे रस्त्यावर पडली, घरांवर पडली, दुकानांवर पडली, काही ठिकाणी नागरिक मोठ्या प्रमाणावर जखमी होऊन जीवितहानी ही देखील झालेली आहे. मच्छिमार लोकांना त्यांचा व्यवसाय करण्यास एक आठवडा तरी बंदी घालण्यात आली. तसेच बंदरा नजीकच्या काही होड्या या वादळामुळे वाहून गेल्या तर काही किनारपट्टीलगतच्या होड्या उसाळलेल्या मोठ्या लाटांमुळे एकमेकांवर आदळून त्यांचे देखील नुकसान झालेले आहे.

शेतकऱ्यांना शेती करण्यासही फार मोठ्या अडचणी भासू लागल्या आणि त्यांचे देखील नुकसान फार मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. बागायतदारांच्या व्यवसायाला देखील या चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान पत्करावे लागले.

स्थानिक रहिवाशांना शासनाने वेळोवेळी प्रसारमाध्यमांतून सूचना देऊन घराबाहेर पडण्यास प्रतिबंध केला त्यामुळे त्यांनादेखील घराबाहेर पडण्यास आणि जीवनावश्यक वस्तू विकत घेण्यास कठीण होऊ लागले. सर्व ठिकाणच्या बाजारपेठा, छोटी-मोठी दुकाने आणि इतर व्यवसाय अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्यात आले. या सर्व कारणांमुळे स्थानिक रहिवाशांपासून ते मोठ्या व्यवसायिक उद्योजकांपर्यंत तौक्ते चक्रवादळामूळे फार मोठे नुकसान पत्करावे लागले.

मुंबईसह कोकण किनारपट्टीवर स्थानिक रहिवासी तसेच व्यापारी लोकांना फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. अशावेळी सरकारकडून मोठ्या मदतीची अपेक्षा नक्कीच असेल. किमान झालेल्या नुकसानाची भरपाई ही महाराष्ट्र राज्य तसेच केंद्र सरकारच्या निधीतून करण्यात यावी ही लोकांकडून फार मोठी अपेक्षा नक्कीच असेल.

मुंबईत लॉकडाऊनमध्ये पदपथावरील अतिक्रमणे वाढली यास प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या सरकार जबाबदार आहे. याचे मूळ कारण म्हणजे सरकारची नियमावली आणि लॉकडाऊनच्या नियमावलींचे अयोग्य नियोजन. सरकारने जरी ही परिस्थिती सावधगिरीने हाताळली असली तरीही सरकार अजूनही निर्णय घेण्यास फार उशीर करत आहे आणि याच उशिराचा फटका सर्वसामान्य जनतेला भोगावा लागत आहे.

सरकारने रेल्वे प्रवास करण्यासाठी सर्वसामान्य जनतेला प्रतिबंध दर्शवला आहे तर फक्त सरकारी कर्मचारीवर्गाला त्यात मुभा देण्यात आलेली आहे. हे एक प्रकारचे पक्षपात झाल्यासारखे आहे आणि या गोष्टींमुळेच महाराष्ट्र राज्यातील बहुतांश नागरिक हे महाराष्ट्र राज्य सरकारवर फार नाराज झालेले दिसतात. सर्वसामान्यांना रेल्वेचा प्रवास करता येत नसल्याने त्यांना बस किंवा इतर वाहतूकीच्या साधनांनी प्रवास करावा लागत आहे. पण हा प्रवास फार खर्चिक असून यास वेळही खूप द्यावा लागत आहे. रेल्वे बंद असल्याने वाहतुकीचा सर्व भार हा बस आणि इतर वाहतुकीच्या साधनांवर आलेला आहे, त्यामुळे फिसिकल डिस्टन्सला मागे टाकत या वाहतुकीच्या साधनांवर मोठ्या प्रमाणावर गर्दी सुद्धा पहावयास मिळत आहे.

जर नियम करावयाचे असल्यास सर्व लोकांसाठी ते सारखेच असावे आणि त्यात कोणत्याच प्रकारचा पक्षपात नसावा.

लॉकडाऊन ही अशी एक गोष्ट आहे ज्यामूळे संपूर्ण देशातील लोकांना आर्थिक प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. अनेक जणांचे व्यापार-उद्योगधंदे बुडाले, अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, अनेकांना अर्ध्या पगारात काम करावे लागले, अनेक लोक कर्जबाजारी झालेत. तसेच गरीबी, उपासमारी आणि बेरोजगारीची लाट संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणावर वाढली. महाराष्ट्र राज्याला याचा फटका फार तीव्र बसला आणि राज्याची आर्थिक परिस्थिती संपूर्णपणे कोलमडून गेली.

जर लोकांना त्यांचे दैनंदिन जीवन उपभोगायचे असल्यास त्यांना छोटा मोठा धंदा किंवा व्यवसाय करणे हाच एक मुबलक मार्ग उपलब्ध आहे. त्यामुळे अनेक लोकांनी घरात रीकामे राहण्यापेक्षा या मार्गाचा विचार केला आणि तो आत्मसातही केला. त्याचाच परिणाम म्हणजे आज लॉकडाऊन कार्यरीत असले तरीही पद पथावर अतिक्रमणे खूप वाढली आहेत. अनेक लोकांनी छोटे मोठे धंदा-व्यवसाय चालू केले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे पालिका प्रशासन तसेच पोलीस या गोष्टींवर कार्यवाही करताना फार कमी प्रमाणात दिसतं आहेत. लोकप्रतिनिधी सुद्धा या गोष्टींवर दुर्लक्ष करून स्वतःच्या कामकाजत व्यस्त करून घेत आहे. त्यामुळे सध्या राज्यात सर्वत्र लॉकडाऊन असूनही अनलॉक सारखी परिस्थिती पहावयास मिळत आहे.

लोकलबंदीमूळे मुंबईचा चाकरमानी होरपळला. सामाजिक दृष्टिकोनातून हे चुकीचे आहे. पण वैज्ञानिक दृष्टिकोनातून हे बरोबर आहे. मुंबई रेल्वेच्या ज्या तिन लाईफ लाईन आहेत त्या म्हणजेच हार्बर लाईन, सेंट्रल लाईन, आणि वेस्टर्न लाईन. या तिन लाईफ लाईनवर संपूर्ण मुंबई चालत असते. म्हणूनच लोकल ही मुंबईकरांसाठी जीवनवाहिनी आहे. मुंबईतील जास्तीत जास्त नागरिक रेल्वे सेवेला प्रथम प्राधान्य देतात. कारण कमीत कमी खर्चात आणि जलद प्रवास करण्यास रेल्वे सेवा फार उपयुक्त असते. म्हणूनच भरपूर प्रमाणावर मुंबईचा नोकरदारवर्ग इथल्या लोकलवर अवलंबून आहे

मुंबईचा बहुतेक चाकरमानी रेल्वेने प्रवास करत असतो. पण गेल्या काही दिवसांपासून कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे जन सामान्यांना रेल्वे सेवा पुन्हा बंद करण्यात आली आणि पुन्हा एकदा कडक निर्बंध लादण्यात आलेत. वैज्ञानिक दृष्टिकोन पाहता हा निर्णय योग्य आहे. कारण जर लोकल प्रवास सर्वांसाठी खुला केला तर सर्वजण मुंबई लोकलने प्रवास करतील आणि फिसीकलं डिस्टन्सचा वापर न केल्यामुळे आपणास पुन्हा एकदा गर्दी पाहायला मिळेल आणि यातूनच या कोरोना रोगाचे पुन्हा एकदा संक्रमण होण्याची दाट शक्यता आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांना नियम वेगळे आणि जाणसामान्यांना नियम वेगळे हे जरा चुकीचेचं वाटते. जर आपल्याला सामाजिक बांधिलकी जोपासायची असल्यास हे चुकीचे आहे कारण सरकारी नोकरदार वर्गातील कर्मचाऱ्यांना रेल्वे प्रवास करण्यास मुभा आहे तर दुसरीकडे जनसामान्यांना प्रवास करण्यास बंदी आहे. म्हणजेच जनसामान्यांवर हा एक प्रकारे अन्यायचं आहे. लॉकडाऊनमुळे सामान्यांसाठी लोकल प्रवास बंद असल्यामुळे मुंबईकरांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत.

कोरोनाचा प्रादुर्भाव व्हायचा असल्यास तो सरकारी लोकांनासुद्धा कधीही टार्गेट करू शकतो आणि सर्व ठिकाणी कोरोना रोगाचा प्रसार होण्यास मुख्य कारण ठरू शकतो. माझ्या मते जर रेल्वे प्रवास करण्यास नियमावली बनवायची असेल, तर सर्व प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रवास करण्यास मुभा द्यायला हवी किंवा तो सर्वचं नोकरदार वर्गासाठी बंधनकारक असावा अपवाद अत्यावश्यक सेवा वर्ग. यामुळे सर्वांसाठी एकच कायदा तयार होईल आणि तो वास्तवात अंमलात आणून त्याचे पालन आणि सहकार्य करण्यासठी सर्व नागरिक नक्कीचं सहकार्य करतील.

मुंबई मॉडेल खरंच कौतुकास्पद आहे. मुंबईची सध्याची लोकसंख्या २०,६६८,००० एवढी आहे आणि क्षेत्रफळ सुमारे १,४९,१०० एकर्स एवढे आहे. या दोन्ही संख्येचा आपण जर सखोल विचार केला असता आपल्याला हे कळते की, कमीत कमी जागेमध्ये जास्तीत जास्त लोकसंख्येचा वावर हा मुंबईसारख्या गजबजलेल्या आणि मोठ्या उलाढाली होणाऱ्या शहरात होत आहे.

कोरोना हा असा संसर्गजन्य रोग आहे जो हवेमार्फत सर्वच ठिकाणी प्रसारित होऊ शकतो. याआधीच म्हणजे गेल्या (2020) वर्षीपासून लॉकडाऊन काळ हा खूप वेळ मुंबईसारख्या ठिकाणी राबविण्यात आला होता आणि याच कारणामुळे अनेक लोकांचे उद्योगधंदे तसेच नोकऱ्या यांना फार धोका निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात नुकसानही पत्कारावे लागले.

हीच परिस्थिती म्हणजे यावर्षी (२०२१ ला) पुन्हा एकदा कोरोनाच्या दुसऱ्या लाटेला मुंबई या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आणि यामध्ये कोरोना बाधित रुग्णांची संख्या तसेच मृतांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली होती.

पण मुंबई महानगर पालिकेने आणि महाराष्ट्र राज्य सरकारने तात्काळ यावर निर्बंध बसण्यासाठी काही नियमावली आखल्या आणि लॉकडाऊन सारखा धाडसी निर्णय घेतला.

मुंबई शहरात सर्वत्र ठिकाणी कडक निर्बंध लादण्यात आले आणि नियमावली अमंलात आणण्यात आली. या सर्व गोष्टींना मुंबईच्या सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन खूप मोलाचे सहकार्य केले. सोबतच रुग्णालये आणि कोविड सेंटरमध्ये रुग्णांच्या कोविड चाचण्या करून त्यांच्यावर योग्य उपचार पद्धती देऊन त्यांना लवकरात लवकर बरे करून घरी पाठवण्यात आले. काही ठिकाणी अपुऱ्या उपचार पद्धतीमुळे रुग्णांना त्यांच्या जीवास मुकावे लागले पण शासनाने आता या गोष्टीवर लक्षकेंद्रित करून त्या सुधारण्यासाठी प्रयत्नही चालू केलेत. सध्याच्या कोविड रुग्ण बरे होण्याची टक्केवारी ही ८५ टक्क्यांपर्यंत पोहचली आहे. मुंबईसाठी ही आनंददायी आणि सकारात्मक गोष्ट आहे. म्हणूनच मुंबई मॉडेल खरंच कौतुकास्पद आहे.

*****

## "सह्याद्रीच्या माळरानाची स्वप्ननगरी" - वैशाली चाटे

"आकाशीच्या घुमटात पाऊसभरल्या मेघांचे झुंबर विहरू लागले की वेध लागतात पावसाळी भटकंतीचे. पाऊसभरल्या ओथंबलेल्या श्यामल घनांसारखेच मनही सह्याद्रीत विहरू लागते".मग काय या वेळेस ' मौका भी था और दस्तुर भी'. निमित्त होते अहोंची बदली साताऱ्याला झाल्याचे.........

सिंधुदुर्ग, अलिबाग, खोपोली अशी समुद्रकिनारीची पोस्टिंग संपून घाटावर सह्याद्रीच्या कुशीतच पोस्टिंग मिळाली, अन् तीही ऑगस्ट महिन्यातच आणि साताऱ्यातील कासपठार (valley of flowers)चा हंगामही ऑगस्ट ते ऑक्टोबर . मग काय ,बदलीच्या ठिकाणी अहो जॉईन झाले व दुसऱ्याच दिवशी कासपठारसाठी बुकींग केली. सकाळी आठ वाजता रूमवरून आम्ही कासला जाण्यासाठी आमच्या गाडीने निघालो. साताऱ्यापासून २३ की.मी. अंतरावर जैवविविधतेने नटलेलं कासपठार होतं. सुंदर अशा सह्याद्रीच्या कुशीतील वेडीवाकडी वळणे घेत दाट धुक्याने आमचा प्रवास सुरु झाला. आजूबाजूला चारही बाजूने डोंगररांगा आणि त्या डोंगररांगांमध्ये कोयनेच्या बॅकवॉटरचे तलाव होते एका वळणावर गाडी थांबवून कोयनेचे अथांग पाणी व डोंगर-दऱ्यांच निसर्गरम्य दृश्य डोळ्यात आणि कॅमेऱ्यात टिपून घेतलं. मग पुढे जाऊन वनसंरक्षण विभागाच्या गाडीत बसून दोन किलोमटरवर कास पठारावर पोचलो. गाडीतून उतरल्या उतरल्या समोरचे नयनरम्य दृश्य पाहून मी तर आऽ वासला होता. पळत जाऊन त्या रानफुलाच्या कुशीत जाऊन झोपायची माझी इच्छा झाली. पण कास वनसंरक्षन विभागाने तशी अनुमती दिली नसती. झुडपे, रानफुले पायाने तुडविली जाऊ नये म्हणून चिऱ्यांच्या पायवाटा केल्या होत्या त्या पायवाटेनेच पूर्ण पठार फिरायचे होते आणि या वनसंरक्षनाच्या जोपासने मुळेच आज पर्यंत कासपठार फुलांनी बहरेले आहे. नाहीतर माझ्या सारखे वेडे त्या रान फुलांवर नक्कीच झोपून ते तुडवलं असतं. त्यामुळेच जवळ जवळ ३०-४० संरक्षक तिथे नेमलेले होते.

निसर्गपण किती चमत्कारिक आहे ना काही विशिष्ट भागातच त्यांचं सौंदर्य बहरून येतं. मी विचार करत होते की कासपठारवरच का निसर्गाने त्याचे रंग उधळले होते. आमचे गाईड भोसले काका यांनी दिलेल्या माहितीमुळे या प्रश्नाचे निरसन झाले. कासपठार समुद्रसपाटीपासून १२०० ते १३०० फीट उंच आहे. पूर्ण पठार बेसाल्ट खडकाने बनलेले आहे. त्या खडकावर १मिमी ते २मिमी एवढाचं मातीचा थर आहे त्यावरच फुलं उगवतात. कास पठारावर इतरत्र पडतो तसा धो-धो पाऊस पडत नाही, तर फक्त पावसाचा फवारा इथे पडतो म्हणून ही रान फुले इथे एकत्र बहरू शकतात.जवळजवळ २०० पेक्षा जास्त रानफुले इथे

**बहरतात म्हणूनच २०१२ साली युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांमध्ये कास पठाराचा समावेश केला आहे.एवढी माहिती सांगून गाईड काकांनी फुलांची नावासकट ओळख करून दिली. सीतेची आसवे,कंदील पुष्प,सोनकी,आभाळी,मंजिरी,चांदणी,भामन,धावड ,रान हळद,हळदी कुंकु.....असे बरेच, त्यातील धनगरी पागोटं मिकिमाऊस(कावळा)अगदी नावाला साजेल अशीच फुलं होती.आम्ही पठारावर गेलेलो तेव्हा रान हळदी मोठ्या प्रमाणात बहरलेली होती म्हणून सफेद रंगाची उधळण कास पठारावर झाली होती, असे प्रत्येक आठवड्याला पठारावर रंगबिरंगी फुलांचे पट्टे बहरतात.निळ्या,जांभळ्या,पिवळया,गुलाबी,पांढऱ्या रंगाच्या फुलांची आरास इथे पाहायला मिळते.थोडं पुढे चालत जाऊन कुमुदिनी तलाव होता त्या तलावात कुमुदिनी च्या पांढऱ्या रंगाच्या फुलांची चादर आंथरलेली होती,दूरदूर पर्यंत तलावाच टोक दिसत नव्हतं.काही फुले तर इतकी नाजूक होती की ती कॅमेऱ्यात टिपता येत नव्हती ,फक्त डोळ्यांनीच दिसत होती Thanks to God की त्याने एवढे सुंदर डोळे आपल्याला दिले,फुलं पाहताना वेगवेगळे पक्षी आणि सरपटणारे प्राणीपण दिसले .पूर्ण कास पठार फिरून झाल्यावर परतीचा प्रवास नकोसा वाटत होता, कास पठारावरून पायच निघत नव्हता ,४ तासापासून फिरूनही आम्हाला तहान-भुकेच भानच नव्हत, असं हे विलोभनीय ठिकाण होत.सुखद ,मनाला स्पर्श करणारं,आकर्षक.... निसर्गापुढे माझे शब्दही फिके पडतील त्याची तुलना अगणितच........ अविस्मरणीय असे जैवविविधतेने नटलेले कास पठार या सुंदर क्षणांसहित नेहमी आठवणीत राहील.**




पानेर
लिंडल
केना
हालूंडा
निसुर्डी
बहावा


सोनकी
तेरडा
आभाळी
रानसुपारी
कंदील पुष्प
दवबिंदू
नाल
धावड
शिकेकाई

*****

## प्रामाणिकपणा - माधवी मिलींद खडक्कार

वर्तमानपत्रात टीव्हीवर भ्रष्टाचार,फसवणूक,दरोडे, पैशासाठी छळ या सारख्या बातम्या वाचून पाहून वाटते की प्रेम आपुलकीने प्रामाणिकपणा कोठे शिल्लकच नाही की काय? पण काही अनुभव समाजात चांगल्या गोष्टी घडत असतात ह्याचा प्रत्यय देतात.असाच माझा हा अनुभव .

सात वर्षांपूर्वीचा हा छोटासा प्रसंग....

डिसेंबर महिन्यात सुट्टी असल्याने रोजच्या दिनचर्यात थोडा बदल म्हणून आम्ही तीन चार दिवसांसाठी महाबळेश्वरला स्वतःच्याच गाडीने गेलो.त्यामुळे प्रवासात लागणारे सर्व सामान सोबत होतेच.तिथे पोहल्यावर हॉटेलवर जाऊन थोडा आराम करून तयार होऊन बाहेर पॉईटस पाहण्यासाठी निघालो..कॅमेरा, मोबाईल,पाण्याची बाटली वगैरे सामान सोबत घेतले.

गाडीतून जात असताना आजूबाजूचे निसर्ग सौंदर्य पाहून फोटो काढण्याचा मोह टाळताच आला नाही .आणि त्या घाई गडबडीत डिजिटल कॅमेरा बाजूला ठेवला. आणि पॉईट पाहण्यासाठी गाडीतून उतरलो.थोडे चालत गेलो.आणि महाबळेश्वरचे निसर्गसौंदर्य न्याहाळत होतो. फोटो काढण्याच्यावेळी कॅमेराची आठवण झाली तेव्हा शोधले पण सापडला नाही.कुठे विसरला असेल? काहीच आठवत नव्हते शेवटी निराश होऊन गाडीपाशी आलो.तर गाडीच्या समोरच्या काचेवर एक चिठ्ठी लावली होती तुमच्या गाडीच्या दारापाशी कॅमेरा पडला होता आम्ही तुमची येथे वाट पाहिली.पण आपली भेट झाली नाही.तुम्ही आलात की येथे नंबर देत आहे त्यावर फोन कराल. त्यानंतर आम्ही दहा मिनिटात पोहचू.त्याप्रमाणे त्या मोबाईल नंबर वर आम्ही फोन केला सांगितल्याप्रमाणे ते दोघे आले. ते तेथील स्थानिक नागरिक होते.त्यांनी आमचा कॅमेरा परत केला.

तसेच आम्ही देऊ केलेली कोणतीही भेट स्विकारली नाही.स्वताची ओळख सांगितली.आम्ही आमचा आवडीचा कॅमेरा मिळाल्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद दिले. आम्ही नवख्या ठिकाणी अनुभवलेली प्रामाणिकता

माझ्या कायम स्मरणात राहिला.😊

*****

## पंचम- तुषार शाम वैद्य

पंचम ४ जानेवारी २०२२ ला तुला जाऊन २८ वर्ष पूर्ण होतील, १९६१ सालच्या छोटे नबाब पासून करियरला सुरवात करून तू 1942 लव्ह स्टोरीपर्यंत 292 सिनेमांसाठी तू आम्हाला 1500 हुन अधिक गाणी दिलीस. त्यातील साधारण पन्नास एक वेस्टर्न टाइप ची बाकीची सर्व हिंदुस्थानी संगीतावर आधारित मेलडीयस, तुझ्या गाण्यांसारखा तू सुदधा चिरतरुण आहेस ह्याबद्दल दुमत नाही. तुझ्या संगीतामुळे आमचे जीवन समृद्ध झाले आहे. आम्ही खूप छोटे आहोत तुझ्या संगीतावर बोलायला पण तरी तू तुझ्या संगीतात केलेला पारंपारिक आणि अपारंपारिक वाद्यांचा परिणामकारक वापर, गायक गायिकेचा गाण्याप्रमाणे केलेला वापर ( आवो ट्विस्ट करे हे गाणे मन्नाडेसारख्या शास्त्रीय गायकाकडून), शास्त्रीय संगीत (ज्यात मालगुंजी,शिवरंजनी, बिलासखानी तोडी, खमाज, ललत, कलावती, यमन, सारंग, भैरवी असे किती तरी राग) फोक, क्लब सॉंग्स (दम मारो दम – ह्यातील आशा ताईने लावलेल्या कोमल निषादासाठी पंडित कुमार गंधर्वांसारखे दिग्गज हे गाणे वारंवार ऐकायचे), कॅब्रे, वेस्टर्न अशा कित्येक प्रकारे तू आम्हाला गाणी दिलीस. तुझे कुठलेही गाणे प्रत्येक वेळी ऐकताना नवीन नवीन गोष्टी त्यातून उलगडत जातात. माझ्या मते मी तुझ्या दिल पडोसी हे ह्या अल्बम ला Crown In The Jewell म्हणेन. बाकी संगीतकारांना तू त्यांच्या प्रचलित पद्धती बदलायला लावल्यास, वेगवेगळ्या गोष्टी वापरून तू संगीत निर्माण केलेस ( ग्लास वर चमचा आपटणे – चुरा लिया है, पोलिश पेपर घासणे, violin उलट्या पद्धतीने वाजवणे – शोलेत जेव्हा जेव्हा गब्बर पडद्यावर दिसतो, टीचक्या वाजविणे, उघड्या पाठीवर थापट्या मारणे, पाण्याने भरलेल्या तसेच रिकाम्या बाटलीत फुंकर मारणे, पाण्याच्या गुळण्या करणे – सत्ते पे सत्ता मध्ये बाबू च्या बॅकग्राऊंड ला, असे कितीतरी..... ह्यातून हे च कळते की जगातील सर्व गोष्टीत तुला संगीत ऐकू येत होते, पण आम्हीच करंटे कि तू काय होतास आणि काळाच्या किती पुढे होतास हे आम्हाला तू गेल्यावर जास्त उमजले, असो पण आता आम्ही जाईपर्यंत तरी आम्ही तुला विसरणार नाही हे नक्की,

ईश्वरापुढे एव्हडीच प्रार्थना कि पुढील जन्मी सुद्धा आम्हाला पंचम ऐकायला मिळो कारण पंचम काय होता हे एका जन्मात कळणे अशक्य !!!!!

*****

## पोलिसदादा - लता अनिल बहाकर(तळोकार)

कोरोना विषाणूच्या संकटकाळात आपण बजावत असलेल्या कर्तव्याप्रती माझ्याकडून आपणास एक रुणनिर्देष...🙏
जगभरात कोरोनासारख्या विषाणूने थैमान घातले होते..हा जीवघेणा विषाणू हळूच आपल्या भारतात पण शिरला आणि अतिशय अल्पशा कालावधीत त्याने संपूर्ण भारतभर त्याचे पाय पसरले...परिस्थिती आणिबाणिची निर्माण झाली..अफाट लोकसंख्येची घनता असलेला आपला देश..लोकांना त्याची गंभीरता कळायच्या आत तो विषाणू वणव्यासारखा पसरु लागला..मग देश बंद करण्याची वेळ आली आणि तरीही काही स्वजबाबदारी झुगारलेल्या नागरीकांना शिस्त लावण्याची जबाबदारी आली तुमच्या खांद्यावर...अशा कितीतरी जबाबदाऱ्या तुम्ही यशस्वीपणे तुमच्या खांद्यावर घेतल्या..देव खरच आहे का माहीत नाही पण...महापूर..भुकंप..दंगल..या आणि आशा कित्येक आपत्तीच्या वेळेस आमच्यासारख्या सामान्य जनतेला वाचवण्यासाठी तुम्ही लगेच धाऊन आलात तेव्हा दादा आम्हाला खरचं *"वर्दीमधला जिवंत देव दिसला.."*

कोरोना आपत्ती काळात अख्खं जगं भेदरलेलं आहे आणि घरात बसून आहे...तुम्ही मात्र आमच्या संरक्षणासाठी घराबाहेर आहात...क्षणभर तुमचे पाय पण डगमगले असतील..तुमच्या मनाला सुद्धा कंप फुटले असतील..कुटुंबाच्या काळजीपोटी  घराबाहेर पडतांना तुमचं पाऊल सुद्धा अडखडलं असेल...पण ते क्षणभरच हे कळतय आम्हाला...आम्हाला माहीत आहे देशसेवेचं जे व्रत तुम्ही घेतलय ते तुम्ही प्राणपणानं जपताय...यात आपल्या कुटुंबाचा वाटा लाख मोलाचा...कर्तव्यावर जाताना तुमच्या कुटुंबानं तुमच्या पायात भावनेच्या बेड्या टाकल्या नाहीत... *"त्या माऊलीचे, त्या चिमुकल्यांचे आम्ही मानावे तेवढे आभार कमीच.."*
हे देशसेवेचं व्रत स्विकारताना तुम्ही जी शपथ घेतली होती आणि तुमचं जे ब्रिद आहे.. *"सदरक्षणाय खलनिग्रणाय"* म्हणजेच.. *"सामान्यांचे रक्षण आणि वाईटाचे निर्मूलन"* ती शपथ तुम्ही प्राणपणाने पाळत आहात...कोरोनाचा राक्षस भारतात पसरतच आहे अशावेळेस आमच्याच काळजीपोटी कधी तुम्ही *"रुद्रावतार"* धारण केला तर काही असहाय लोकांना मदत करतांना तुम्ही शांतस्वरुप *"विष्णूअवतार"* धारण केला...कोरोना आपत्तीकाळात तुम्ही जो देशसेवेचा गोवर्धन उचलला तेव्हा खरोखर तुमच्यात आम्हाला भगवान *"श्रीकृष्ण"* दिसले..सगळीकडे हाहाकार पसरलेला असताना..कित्येक मजूर,कामगार जीवाच्या भीतीने

अनवानी पायानेच घरी चालले होते...तेव्हा त्यांच्या निरागस लेकरांना जेव्हा तुम्ही खांद्यावर☆ घेतलं तेव्हा साक्षात *"पांडूरंगाला"* आम्ही बघितलं...  तळहातावर भाकरी खाताना तुम्हाला बघून दादा असं वाटलं भगवान *"येशू"* पुन्हा अवतरले..कोरोनापिडीत व्यक्तींची काळजी घेताना आम्हाला तुमच्यात शांती आणि सेवेची शिकवण देणारे *"मोहम्मद पैगंबरही"* दिसले...

पण हे सर्व करताना तुमची तळमळ,तुमची तगमग आणि तुमच्या मनाची घालमेल वेळोवेळी आम्हाला जाणवली..
कोरोनामुळे कुठे कुठे मृत व्यक्तीचे अंत्यसंस्कार करायला नातेवाईकांनी नाकारलं तिथे तुम्ही मुलगा,वडील आणि भाऊ बनून त्यांचे अंत्यसंस्कार केलेत...क्षणभर तो *विषाणू* सुद्धा स्तंभीत झाला असेल तेव्हा..

तुम्हाला वाटली नसेल का त्या विषाणूची भीती..?का तुम्हाला त्या मृत्युंजय कर्णाप्रमाणे कुठलं कवच प्राप्त आहे..?? कोरोनामुळे जिथे माणूस माणसाचा वैरी झालाय तिथे तुम्ही अलौकिक माणुसकीचं दर्शन घडवलतं...मृत्यूच्या छायेत जाऊन तुम्ही सामान्य जनतेची सेवा करत आहात...
जी मुलं रोज तुमच्या अंगाखांद्यावर खेळायची त्यांना लांबून बघताना तुम्हाला किती यातना झाल्या असतील हे ही आम्हाला दिसतयं..दादा तुम्ही आहात म्हणून आम्ही घरात सुरक्षित आहोत..
कोरोनामुळे कुणाचे आधीच ठरलेले विवाह अडचणीत आले तेव्हा तुम्ही धावून गेलात आणि अशांचे विवाह तुम्ही लावून दिले..तर कुठे लहान मुलांचे वाढदिवस सुद्धा साजरे केले..कर्तव्याच्या परीघाबाहेर जाऊन तुम्ही अगम्य अशा माणुसकीचं दर्शन घडवलत...

या कोरोनाच्या राक्षसाने तुमच्याच काही सहकारी बांधवांचे प्राण घेतले...तेव्हा तुम्ही लपवलेले पापणीआडचे अश्रू आम्हाला दिसले...त्यांचं ते *बलिदान* आम्ही कधीच विसरणार नाही..तुम्ही करत असलेल्या कामाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा भावनिक प्रयत्न...

*"एका बहिणीची कृतज्ञ भावनेने ओतप्रोत असलेली ही शब्दिक राखी आपणास अर्पण...."

*****

## आठवणीतला दसरा - शिवानी मेहेत्रे

आपल्या भारतीय संस्कृती मध्ये प्रत्येक सणाला एक वेगळे महत्त्व आहे. सगळीकडे खूप उत्साहाने सण साजरे केले जातात, त्यापैकी दसरा आणि दिवाळी हे मुख्य सन मानले जातात.

'दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा' या काव्यातच ह्या सणाची महती गौरवलेली आहे. दसरा हा पराक्रमाचा, पौरुषाचा सण आहे. या सणात चातुर्वर्ण एकत्र आलेले दिसतात. या दिवशी सरस्वतीपूजन व शस्त्रपूजन केले जाते. प्रभु रामचंद्रांनी रावणासारख्या बलाढय योध्याचा वध करून शत्रुवर विजय प्राप्त केला तो याच दिवशी!

देवी दुर्गेने महिषासुर राक्षसाला युध्द करून संपविले ते याच दिवशी! आणि त्यामुळेच तिला महिषासुरमर्दिनी असे म्हंटल्या जाऊ लागले. अज्ञानावर ज्ञानाने.... वैऱ्यावर प्रेमाने आणि शत्रुवर पराक्रम गाजवित विजय प्राप्त करण्याचा हा दिवस विजयादशमी अतिशय शुभ समजल्या जातो. साडेतिन मुहुर्तांपैकी एक असा हा दिवस कोणत्याही कार्याचा शुभारंभ करण्याकरीता अत्यंत शुभ समजल्या जातो.

एकमेकांमधले परस्परांमधले प्रेम व्यक्त करण्याचा हा शुभदिन दसरा अत्यंत सुंदर असा सण आहे. वर्षातील हाच एकमेव असा दिवस आहे ज्या दिवशी आपण आवर्जून एकमेकांची भेट घेण्याचा प्रयत्न करतो. सोशल मिडीयाच्या माध्यमातुन एकमेकांना शुभेच्छा देतो व सद्भावना व्यक्त करतो.
अशाच एका गावातील दसऱ्याचे वर्णन मी करणार आहे.

"तामसा" गाव आमचं छोटंसं पण आमचं कुटुंब मोठं, त्यामुळे सण खूप छान साजरे व्हायचे. दसऱ्याच्या दिवशी सकाळी लवकर उठून घरातील सर्व दार आंब्याच्या पानांनी आणि झेंडूच्या फुलांनी सजवायचं. सगळे नवीन कपडे घालून पूजा करत. गावातील बालाजी मंदिर मध्ये रावणाचा पुतळा दहनासाठी बनवत असत.रावण दहनासाठी गावातील मंडळींची मिरवणूक निघत असत, गावापासून दूर जिथे वस्ती नसेल तिथे आम्ही जायचो

आणि रावण दहन करायचं. रावण दहन नंतर आम्ही आपट्याची पाने घरी घेऊन यायचो. घरी आल्यावरआमची आई औक्षण करायाची आणि मनायची "दैत्य मारून कैद केले सोने लुटून घरी आले".

त्यानंतर आम्ही नातेवाईकांकडे, मित्र मैत्रिणी कडे, शिक्षकांकडे आपट्याची पाने द्यायला जायचो आणि आशीर्वाद घ्यायचो.

आमच्या घराण्यातील खास गोष्ट म्हणजे त्यादिवशी रात्री बारा वाजता लक्ष्मीपूजन केले जात असत. पूजनाच्या नैवेद्याची तयारी 5 ही वाड्यामध्ये होत असत. नैवेद्या मधे अपल पुरी, देवडांगर भाजी, कडी भात, खीर असायची. पूजा आरती झाल्यानंतर आम्ही सगळे घरचे एकत्र मिळून जेवत असत, खूप आनंद मिळायचा सगळ्यांसोबत बसून. 5 आजोबांचे भलेमोठे कुटुंब असल्यामुळे प्रत्येक सणाला एकमेकांना भेटून सण साजरे करण्यात एक वेगळीच मजा येत होती.

शिक्षण नोकरी यासाठी गाव पंधरा वर्षांपूर्वी सुटले पण आठवणी आज पण डोळ्यांसमोर आहेत. सोशल मीडियामुळे सगळे सण ऑनलाइन साजरे होतात. खरंच गावातले ते दिवस आठवले की खूप छान वाटतं.

*****



# पाककला

## साबुदाणा लाडू रेसिपी - संसारिका फूड्स

**साहित्य-**

साबुदाणा १ वाटी
शेंगदाणे १/२ वाटी
गुळ १ वाटी
साजुक तूप ४ चमचे
वेलची पूड

**कृती-** साबुदाणा भाजून घ्या नंतर मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या. साबुदाणा तुपावर छान भाजून घ्या. शेंगदाणे सुद्धा भाजून सालं काढून मिक्सरमध्ये बारीक करून घ्या. साबुदाणा पीठ आणि शेंगदाण्याच्या पिठात किसुन घेतलेला गुळ घालून वेलची पूड घाला. लाडू वळा . हे लाडू ८/१० दिवस छान राहतात.



## उपासाच्या शेवयांची खीर-पल्लवी कुलकर्णी

साहित्य:
उपासाच्या शेवया - दोन वेटोळे ,
दूध - साधारण ४ कप ,
साखर - चवीनुसार, ५-६ टे स्पून,
साजूक तूप - ३-४ टे स्पून,
वेलची पुड - चिमूटभर

शिंगाड्याच्या पिठाच्या शेवया विकत मिळतात, त्या आणाव्यात.

क्रमवार पाककृती:
१. शेवयांचे वेटोळे उकलून हातानेच चुरा करा. खूप कडक असतात. थेट भाजताना तोडायला गेल्यास इकडे तिकडे उडून पडतात. त्यामुळे आधीच शेवया एका टोपात उडणार नाहीत अशा बेताने काळजीपूर्वक तोडून घ्याव्यात.
2. ह्या तोडलेल्या शेवया खमंग मंद आचेवर जाड बुडाच्या भांड्यात तुपावर भाजून घ्या.

३. एकीकडे दूध तापण्यासाठी ठेवून द्या, कमी आचेवर.

४. भाजताना शेवया फुलतील. लगेच लाल होऊन काळ्या पडू शकतात. त्यामुळे सतत हलवत राहून भाजायचे आहे. साधारण लालसर झाल्या की आच बंद करा.

५. भाजलेल्या शेवयांवर हळूहळू गरम दूध ओता.
६. आता त्यावर साखर घाला.
७. खिरीचे मिश्रण नीट ढवळून घ्या. झाकण ठेवा.
८. जरा वाफ आली की त्यावर वेलचीपूड व तुमच्या आवडीचा सुकमेवा घालू शकता.

ही खीर गरम किंवा थंड कशीही छानच लागते. एवढंच की थंड झाल्यावर लगेच आळते आणि घट्ट होते.
टीप : संपूर्ण पाककृती मंद आचेवर करायची आहे.






# कलाकौशल्य

## शरयू नाईक - हस्तचित्र











## स्नेहा ढगे- हस्तचित्र






**प्रीती कुलकर्णी – हस्तचित्र**






**वैभव अनिल सारंग - छायाचित्र**





**अक्षय विजय मलमकार - छायाचित्र**



**पार्थ चाटे- छायाचित्र**






**उज्वला म्हस्के - डुबे- छायाचित्र**



**वैशाली चाटे - मांडला आर्ट**



**श्वेता चिन्नपुरकर - मांडला आर्टस**






**शिवानी मेहेत्रे - रंगकाम**





**स्नेहल देशपांडे – रांगोळी**




**रश्मी देशपांडे - रांगोळी**




**ज्योती दिंडकर - मेहेंदी - रांगोळी**





# साहित्य अभिवाचन

*पुस्तकाचे नाव : आहे मनोहर तरीही*
*परिचय लेखिका व सादरकर्ती : मंजुषा कुलकर्णी*
*पुस्तकाची लेखिका : सुनीताबाई देशपांडे*
***https://youtu.be/PHc-kpUeIh0***

*सादरकर्ती : अक्षता नारायण दुधाळ*
*कथा : विरह मोड ऑन*
*लेखिका : किल्ली / पल्लवी कुलकर्णी सुकळीकर*
***https://youtu.be/2Kgo7b-ESwg***

*साहित्य अभिवाचन: डॉ प्राची दामले*
*मितव्ययाचे फायदे*
***https://youtu.be/8Ido6KX9S2o***

*साहित्य अभिवाचन : डॉ प्राची दामले*
*महाराष्ट्र महिला: विजयाबाई मणेरीकर*
***https://youtu.be/kEd46VpQeBE***

*रांगोळी: रेश्मा दुधाळ*
***https://youtu.be/YPAMVIpz0-4***

---

## मागील स्पंदन दिवाळी अंकाच्या लिंक -

### स्पंदन दिवाळी अंक २०१९

https://drive.google.com/file/d/1CtQYOAE8SFtDX-NuNpT1bqCGJ49yc_qF/view?usp=sharing

### स्पंदन दिवाळी अंक २०२०

https://drive.google.com/file/d/1uQ-JAgtehZN4fglqBOGIGO59nHZ7mp7Z/view?usp=sharing

# संपादक मंडळ

**पल्लवी कुलकर्णी**

https://Killicorner.in

**सिद्धी चव्हाण**

https://siddhic.blogspot.com

**अर्चना चौधरी**

https://www.facebook.com/rangmantale

**वैशाली चाटे**

---

# आभार

अंक लोगो - पद्मनाभ हरीहर

मुखपृष्ठ छायाचित्र - अनिता राठोड
मीसेस साऊथ आफ्रिका जागतीक सुंदरी २०१९
निर्माती :- शांतीदूत उत्पादन
दिग्दर्शक :- ईडीयन कोहीणूर सौंदर्य स्पर्धा
दिग्दर्शक :-बंजारा जागतिक चॅनल
सचिव :- कला-क्रिडा साहित्य शांतीदूत परीवार
संस्थापक :- PVR हस्तनिर्मित उद्योग

पृष्ठ लिंक सहकार्य -मिलिंद टंकसाळे

**{ ©लिखाणाचे सर्व हक्क संपादक मंडळाच्या स्वाधीन आहेत.}**

sevasahitya@gmail.com